इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष -४१ ▸ अंक -३४३ ▸ शुक्रवार,ता.१७ एप्रिल २०२६ ▸ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

**टीसीएस धर्मांतरण रॅकेट;दोघांना कोठडी**

नाशिक,ता.१६–

नाशिकमधील टाटा टन्स्टंन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीतील धर्मांतरण प्रकरणाचे २ आरोपी शफी शेख आणि मेनन यांना २ दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे. शफी शेख आणि इतर आरोपी टीसीएसची एचआर मॅनेजर निदा खान हिच्या मार्गदर्शनात टीसीएसमधील हिंदू युवतींचे लैंगिक शोषण, मानसिक छळ करून धर्मांतरणासाठी दबाव टाकत होते. याप्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान गेल्या २० दिवसांपासून फरार आहे. याप्रकरणी पोलिसांनी ९ एफआयआर दाखल केले असून ७ आरोपींना अटक केली आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव




www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००



## अकोला जगातील सर्वाधिक उष्ण शहर

■ मुंबई,ता.१६–

सध्या देशभरातील हवामानात मोठे बदल होत आहेत. काही भागांमध्ये वादळी वारे आणि मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर इतर भागांमध्ये उष्णतेची लाट आणि दमट हवामानाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने २१ एप्रिलपर्यंतचा हवामानाचा अंदाज जारी केला आहे. या अंदाजानुसार, महाराष्ट्रासह १३ राज्यांत उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) अंदाजानुसार, १९ एप्रिलपर्यंत पूर्व (पान २ वर)

# मतदारसंघ फेरबदल विधेयकावरून घमासान

## महिला आरक्षण दुरुस्तीसह तीन विधेयक संसदेत सादर



■ नवी दिल्ली,ता.१६(प्रतिनिधी)

देशाच्या निवडणूक आणि प्रशासकीय प्रणालीमध्ये मोठे बदल करू पाहणाऱ्या संविधान विधेयक आणि परिसीमन विधेयक २०२६ वरून संसदेतील राजकीय गदारोळ तीव्र झाला आहे.

संसदेच्या विशेष अधिवेशनाचे कामकाज गदारोळात सुरू झाले. अधिवेशनाच्या अगदी सुरुवातीलाच, सरकारने तीन प्रमुख विधेयके सादर केली. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, आणि परिसीमन विधेयक सादर करण्याचा प्रस्ताव मांडला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२६ सादर करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावांमुळे संसदेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष आमनेसामने आले. विरोधी पक्षाने या प्रस्तावांना आक्षेप घेतला, तर सरकारने म्हटले की देशाची निवडणूक (पान २ वर)

### विरोध करणाऱ्यांना किंमत मोजावी लागेल–मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षण विधेयकाला विरोधी खासदारांचा पाठिंबा मागितला. ते म्हणाले कि, विरोध करणाऱ्याला त्याची किंमत मोजावी लागेल. जर आपण सगळे एकत्र आलो, तर इतिहास साक्षी आहे की याचा फायदा कुठल्याही एका राजकीय पक्षाला होणार नाही. याचा फायदा देशाच्या लोकशाहीला होईल. त्यामुळे याला राजकीय रंग देण्याची गरज नाही.

# पंचगंगा प्रदुषण मुक्तीसाठी अकरा गावांचा आज बंद

## आंदोलन अकुंशचा एल्गार

■ बुबनाळ,ता.१६(वार्ताहर)–

**शिरोळ तालुक्यात पंचगंगा पुर्णपणे प्रदूषित झाली आहे. याला कारणीभूत असलेला काळा ओढा, टाकवडे वेस इचलकरंजी येथे आंदोलन अंकुशतर्फे आज शुक्रवारी दुपारी बारा वाजता आंदोलन करण्यात येणार आहे.**



या आंदोलनात पंचगंगा काठावरील शिरोळसह धरणगुत्ती, नांदणी, शिरढोण, टाकवडे, शिरदवाड, अब्दुल लाट, हेरवाड,तेरवाड, कुरुंदवाड, नृसिंहवाडी या अकरा गावातील ग्रामस्थ, विविध संघटना गाव बंद ठेवून आंदोलनात सहभागी होणार आहेत. यामुळे आजच्या आंदोलनाची तिव्रता वाढली आहे.

याबाबत माहीती देताना आंदोलन अंकुशचे धनाजी चुंडमुंगे म्हणाले की, शिरोळ तालुक्यात सर्वच नद्या नद्या बारमाही वाहतात. यामुळे शेती सुजलाम सुफलाम होऊन आपण सधन झालो. मात्र पंचगंगा नदीच्या पाणी प्रदुषणामुळे तालुक्यातील जनतेला काही वर्षापासुन मोठ्या दुष्परिणामाला सामोरे जावे लागत आहे.

पंचगंगा प्रदुषित झाल्यामुळे हजारो मासे, जलचर प्राणी मृत होत आहेत. इतकेच नव्हे तर या नदीच्या काठावरील जनतेला अक्षरशः काळ्या पाण्याची शिक्षा भोगावी लागत आहे. तसेच या प्रदुषित पाण्याचा पिकपाण्यासाठी (पान २ वर)

# विधानपरिषदेच्या नऊ जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार

मुंबई,ता.१६–

**आगामी मे महिन्यात विधान परिषदेच्या ९ जागा रिक्त होत आहेत. त्यासाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मंगळवार, १२ मे रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी सायंकाळी निकाल लागणार आहे. सोबतच काँग्रेसच्या डॉ. प्रज्ञा सातव यांनी विधानपरिषद आमदारकीचा राजीनामा दिला होता.त्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर देखील निवडणूक होणार आहे.**



रिक्त/निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये उध्दव ठाकरे (शिवसेना-उबाठा),निलम गोऱ्हे (शिवसेना), शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी-शप गट),अमोल मिटकरी (राष्ट्रवादी-अप गट), गोपीचंद पडळकर (भाजप),रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप), राजेश राठोड (काँग्रेस), प्रवीण दटके (भाजप) आणि रमेश कराड (भाजप) अशा ९ जणांचा समावेश आहे. या जागांसाठी निवडणूक (पान २ वर)

### ठाकरे,गोऱ्हे,पडळकर, मिटकरी आदि होणार निवृत्त

## दिल्ली विमानतळावर दोन विमानाची टक्कर

■ नवी दिल्ली,ता.१६–

**दिल्ली विमानतळावर अकासा एअरचे विमान आणि स्पाईसजेट विमानाची टक्कर झाली. फ्लाइटराडार २४ च्या माहितीनुसार, लेहहून आलेले स्पाईसजेटचे विमान गेटकडे टॅक्सी करत असताना आणि अकासा एअरचे विमान हैदराबादला जाण्याच्या तयारीत असताना ही घटना घडली.**

या घटनेबाबत अकासा एअरने एक निवेदन जारी केले आहे, ज्यात म्हटले आहे की, दिल्ली ते हैदराबादला जाणारे अकासा एअरचे विमान १४०६, १६ एप्रिल २०२६ रोजी परत येणार होते. प्राथमिक (पान २ वर)

# मुलाकडून आईचा गळा दाबून खून

## मानमोडीत घरगुती वादातून प्रकार

■ कुपवाड,ता.१६(प्रतिनिधी)–



संगिता झेंडे

**घरगुती वादातून मुलाने स्वत:च्या आईची हत्या केल्याची धक्कादायक घटना मिरज तालुक्यातील मानमोडी येथील झेंडे मळा परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी कुपवाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी मुलाला अटक करण्यात आली आहे.**

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, बजरंग तुकाराम काशीद (वय ४८, रा.कवठेएकंद, ता.तासगाव) यांनी फिर्याद दिली आहे. मयत संगिता जीवन झेंडे (वय ५१) या फिर्यादीची सख्खी बहिणी असून त्या मानमोडी येथील झेंडे मळा येथे वास्तव्यास होत्या.

दि.१६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. आरोपी जगदीश जीवन झेंडे (वय २८) याने पत्नीला घरात ठेवण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचा राग मनात धरून, घरात कोणी नसल्याची संधी साधून आई संगिता झेंडे यांचा तोंड, नाक व गळा दाबून खून केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये गुन्हा क्रमांक ९२/२०२६ नोंद करण्यात आला



आहे. घटनेचा पुढील तपास प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक घाडगे करीत आहेत.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, नातेसंबंधातील वाढत्या तणावाचे गंभीर चित्र पुन्हे एकदा समोर आले आहे.

## अनिल अंबानींना दिलासा नाहीच

■ नवी दिल्ली,ता.१६–



**उद्योगपती अनिल अंबानी यांना सर्वोच्च न्यायालयाकडून पुन्हा धक्का बसला आहे. आरकॉमची बँक खाती बनावट घोषित करण्याच्या कारवाईला स्थगिती देण्याची मागणी करणारी अनिल अंबानी आणि त्यांच्या कंपनीची याचिका न्यायालयाने फेटाळून लावली.**

खाती बनावट घोषित करून दिलेला अंतरिम दिलासा न्यायालयाने रद्द केला आहे. या प्रकरणात ४०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या बँक फसवणूक (पान २ वर)

# क्रिकेट खेळताना युवकाचा मृत्यू

## हुपरीतील घटना

■ हुपरी,ता.१६(वार्ताहर)–




**येथील कुंभारमळा मैदानावर क्रिकेटचा सामना सुरू असताना धाव घेताना एका ३८ वर्षीय युवकाचा हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने जागीच मृत्यू झाला. राजू दिलीप शिरगुरे (सध्या रा.बोरगाव, मूळ रा.हुपरी) असे या दुर्दैवी युवकाचे नाव आहे.या घटनेमुळे हुपरी परिसरात मोठी शोककळा पसरली आहे.**

राजू हा व्यवसायानिमित्त कुटुंबासह बोरगाव येथे वास्तव्यास होता. बालपणीच्या मित्रांनी आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेसाठी तो आवर्जून हुपरीत आला होता. सामन्यात सलामीला फलंदाजीसाठी मैदानात उतरल्यानंतर, पहिल्याच षटकातील तिसऱ्या चेंडूवर एक धाव घेण्यासाठी तो धावला. मात्र, खेळपट्टीवर असतानाच त्याला अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि तो जागीच कोसळला. मित्रांना त्याला सावरण्याची किंवा वैद्यकीय मदत मिळण्याची संधी मिळण्यापूर्वीच त्याची प्राणज्योत मालवली. राजूच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. एका मनमिळावू खेळाडूच्या अशा अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# पोलीस महासंचालक दाते २१ रोजी कोल्हापूर दौऱ्यावर

■ कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)–



**महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते हे मंगळवार, दि. २१ एप्रिलपासून कोल्हापूर जिल्ह्याच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर येत आहेत.**

या दौऱ्यात ते कोल्हापूर पोलीस दलाच्या कामकाजाची वार्षिक तपासणी करणार आहेत. राज्याचे सर्वोच्च पोलीस अधिकारी येत असल्यामुळे कोल्हापूर पोलीस दलात मोठी लगबग सुरू झाली असून, पोलीस ठाण्यांमधील कागदपत्रे आणि कार्यालयीन कामे पूर्ण करण्यासाठी कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू आहे.

पोलीस महासंचालक दाते हे २१ एप्रिलला सकाळी विमानाने कोल्हापुरात येतील. पहिल्या दिवशी ते पोलीस अधीक्षक कार्यालय आणि शाहूपुरी पोलीस ठाण्याला भेट देऊन कामाचा (पान २ वर)

# नोकरीच्या अमिषाने महिलेची साडेचार लाखांची फसवणूक

## कोडोलीत गुन्हा दाखल, आरोपीस अटक

■ वारणानगर,ता.१६(प्रतिनिधी)–

**हातकणंगले तहसिलदार कार्यालयात कनिष्ठ लिपीक पदावर नियुक्ती झाल्याचे बनावट पत्र देवून नोकरीच्या अमिषाने महिलेची साडेचार लाख रुपयांची फसवणूक झाली. या प्रकरणी कोडोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

सौ.माधुरी आनंदराव आपटे (रा.कोडोली ता.पन्हाळा) यांनी कोडोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी चंद्रकांत यादव महापुरे (रा.कोडोली ता.पन्हाळा) या आरोपीस कोडोली पोलीसांनी अटक केली आहे.

सरकारी कार्यालयात कनिष्ठ लिपीक म्हणून नोकरी लावतो असा फिर्यादी आपटे यांचा विश्वास संपादन करून साडेचार लाख रुपये आरोपी महापुरे यांनी स्विकारून जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख पुणे यांच्या सहीचे बनावट नियुक्ती पत्र आपटे यांना देवून तहसिलदार कार्यालयात हजर व्हायला सांगितले. तिथे गेल्यावर हे पत्र बनावट असल्याचे सिद्ध झाले. (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १५३५०० रु. | २५५००० रु. |

अंडी ५९५ रुपये शेकडा

**हास्यतुषार –सुरेंद्र दास**



पाच राज्यात निवडणुकीचे वातावरण असताना महिला सशक्तीकरणाची आत्ताच गडबड का?

# शिवाजी विद्यापीठात कर्मचाऱ्यांना दमदाटी

■ कोल्हापूर,ता.१६ (प्रतिनिधी)–

**शिवाजी विद्यापीठ परिसरात सुरक्षा रक्षक आणि कर्मचाऱ्यांना दमदाटी करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी शाहू सेनेचा जिल्हाध्यक्ष शुभम शिरहट्टी (रा.मंगळवार पेठ) याच्यासह दोघांवर राजारामपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी, १५ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.वसंत ज्ञानू एकले (वय ५६, रा. कळंबा) यांनी याबाबत फिर्याद दिली.**



## शाहू सेनेच्या जिल्हाध्यक्षासह दोघांवर गुन्हा दाखल

पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी, फिर्यादी एकले हे शिवाजी विद्यापीठात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत (पान २ वर)

# रेंदाळमधील कापड चोरीचा छडा पाठलाग करून दोघांना पकडले

■ हुपरी,ता.१६(वार्ताहर)–

**रेंदाळ येथील कापड दुकानाच्या गोडावूनचे पत्रे उचकटून झालेल्या चोरीचा छडा लावण्यात हुपरी पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून कणेरी गावाजवळील उसाच्या शेतात लपून बसलेल्या दोन सराईत संशयित आरोपींना अटक केली आहे.**

प्रमोद विश्वास वडर (वय २५,रा.हुपरी) आणि हतीम इस्माईल मुल्लाणी (वय ३०,मूळ रा.हुपरी,सध्या रा.कणेरी) अशी अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून चोरीतील कापड आणि गुन्ह्यासाठी वापरलेली दुचाकी असा एकूण ७० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



प्रमोद वडर



हतीम मुल्लाणी

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तुषार आण्णासो पुजारी यांचे झेंडा चौक रेंदाळ येथे तात्या मेन्स वेअर नावाचे दुकान व गोडावून आहे. दि.८ फेब्रुवारी रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी गोडावूनचे पत्रे उचकटून तब्बल ८८ हजार २०० रुपये किमतीचा कापड माल लंपास केला होता. (पान २ वर)

# आदित्य ठाकरेंच्या मुद्यावरून गदारोळ

## उबाठा–भाजप खासदार आमने–सामने

नवी दिल्ली,ता.१६–

**नारी शक्ती वंदन विधेयकावर लोकसभेत चर्चा सुरू आहे. चर्चेदरम्यान भाजप विरुद्ध शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शप) यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. त्यामुळे सभागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**

भाजपाकडून महिलांचा सन्मान केला जातो का, असे म्हणत शिवसेना (उबाठा) खासदार अरविंद सावंत यांनी बलात्कार प्रकरणातील कुलदीप सेंगर आणि ब्रिजभूषण शरण सिंह यांचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी प्रत्युत्तर देताना ते म्हणाले, शिवसेना (उबाठा) नेते आदित्य ठाकरे यांनी तर अभिनेत्रीची हत्या केली आहे. त्यांच्या या विधानावर खा. अरविंद सावंत आणि खा. सुप्रिया सुळे यांनी (पान २ वर)

(पान १ वरून)

## अंबानीना दिलासा नाहीच

आणि मनी लाँडरिंगचा आरोप आहे.सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांचा समावेश असलेल्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने अनिल अंबानी यांची याचिका फेटाळून लावली आणि एकल खंडपीठाने दिलेला अंतरिम दिलासा रद्द करणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला कायम ठेवले. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे आता बँकांना खात्यांचे फसवणूक म्हणून वर्गीकरण करण्यास परवानगी देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायालयाने दिलासा कालावधी वाढवण्यासही नकार दिला आणि उच्च न्यायालयाला प्रलंबित दिवाणी खटल्याला गती देण्याचे निर्देश दिले.

अनिल अंबानींची कंपनी आरकॉम आणि तिच्या उपकंपन्यांवर बँकांविरुध्द ४०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक आणि मनी लाँडरिंग केल्याचा आरोप आहे.आपली कर्ज खाती फसवणुकीची म्हणून वर्गीकृत होऊ नयेत यासाठी अंबानींनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## १२ मे रोजी मतदान होणार

घोषित करण्यात आली आहे.निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे: निवडणुकीची अधिसूचना जारी करणे-२३ एप्रिल, उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस - ३० एप्रिल, उमेदवारी अर्जांची छाननी २ मे, उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस ४ मे, मतदानाचा दिनांक १२ मे, मतदानाची वेळ सकाळी ९:०० ते दुपारी ४:००, मतमोजणी (निकाल) १२ मे सायंकाळी ५:०० वाजता, निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक १३ मे.

विधानसभेतील सध्याच्या पक्षीय संख्या बळानुसार, भाजपला ५ जागा जाण्याची शक्यता तर शिवसेना २, राष्ट्रवादी १ आणि मविआ १ जागा जिंकू शकते.मात्र, राष्ट्रवादीकडे अतिरिक्त १३ मते असल्याने आणि महायुतीने अधिक उमेदवार दिल्यास ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता धुसर असून, चुरशीची लढत पहायला मिळू शकते.सोबतच काँग्रेसच्या डॉ. प्रज्ञा सातव यांनी विधान परिषद आमदारकीचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला होता. त्यांच्या आमदारकीची मुदत २७ जुलै २०३० पर्यंत आहे. या रिक्त जागेवरील पोटनिवडणूकही निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे.

## कर्मचाऱ्यांना दमदाटी

आहेत. शुभम शिरहट्टी हा आपल्या एका कार्यकर्त्यासह विद्यापीठाच्या आस्थापना विभागाजवळील चौकात आला होता.आम्हाला कुलगुरूंना भेटायचे आहे, असे म्हणत त्याने तेथे असलेल्या सुरक्षा रक्षकांशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली.

यावेळी शिरहट्टी याने गेटवर थांबून शिपाई कल्लाप्पा पोटले व इतर कर्मचाऱ्यांना आत जाण्यास मज्जाव केला. तसेच यापूर्वीही अनेकवेळा अशा प्रकारचे कृत्य केले आहे. मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारासमोर आपली गाडी आडवी लावून त्याने विद्यापीठाचे अधिकारी, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य आणि कर्मचाऱ्यांना आत येण्यास अडथळा निर्माण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.राजारामपुरी पोलीसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून, पोलीस हेड कॉन्स्टेबल कुंभार या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## दोन विमानांची टक्कर

माहितीनुसार, अकासा एअरचे विमान स्थिर असताना त्याची दुसऱ्या एअरलाइनच्या विमानाशी टक्कर झाली. सर्व प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले असून, आमचे ग्राउंड टीम्स प्रवाशांना शक्य तितक्या लवकर हैदराबादला पोहोचवण्यासाठी पर्यायी व्यवस्था करत आहेत.अकासा एअरने सांगितले की, स्थापित नियमांनुसार, संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली आहे आणि या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. अकासा एअरमध्ये, आमच्या प्रवाशांची आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. स्पाईसजेटने एक निवेदन जारी करून कळवले आहे की, १६ एप्रिल २०२६ रोजी दिल्ली विमानतळावर टॅक्सींग करत असताना त्यांच्या बी ७३७-७०० विमानाचा अपघात झाला. या अपघातामुळे स्पाईसजेट विमानाच्या उजव्या विंगलेटचे आणि दुसऱ्या एअरलाइनच्या विमानाच्या डाव्या हॉरिझॉन्टल स्टेबिलायझरचे नुकसान झाले. खबरदारीचा उपाय म्हणून, स्पाईसजेटचे विमान दिल्लीत जमिनीवर थांबवण्यात आले आहे.

## पाठलाग करून दोघांना पकडले

याप्रकरणी हुपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.हुपरी पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करत गोपनीय बातमीदारांमार्फत तपास सुरू केला. यादरम्यान, गुन्ह्यातील संशयित आरोपी कणेरी गावातील तळ्याच्या शेजारी थांबल्याची गोपनीय माहिति पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तिथे सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी जवळच्या उसाच्या शेतात धूम ठोकली व तिथेच लपून बसले. मात्र, पोलिसांच्या पथकाने उसाच्या शेतात शोध मोहीम राबवून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३० हजार ७०० रुपयांचा कापड माल आणि ४० हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

## जगातील उष्ण शहर

मध्य प्रदेश, विदर्भ आणि उत्तर अंतर्गत कर्नाटकच्या काही भागांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. छत्तीसगड, तेलंगणा, पश्चिम मध्य प्रदेश, ओडिशामध्ये १७ ते १९ एप्रिल, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि रायलसीमामध्ये १७ व १८ एप्रिल रोजी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.आयएमडीच्या मते, वायव्य भारतावर पश्चिमी वाऱ्यांसह एक पश्चिमी प्रणाली सक्रिय आहे. १६ एप्रिलच्या रात्रीपासून पश्चिम हिमालयीन प्रदेशावर एक नवीन परंतु कमकुवत पश्चिमी प्रणाली येण्याची शक्यता आहे. यामुळे वायव्य, मध्य आणि पूर्व भारतात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. मध्य, पूर्व, पश्चिम आणि दक्षिण भारतातील काही भागांमध्ये उष्णतेच्या लाटेसह दमट हवामानाची शक्यता आहे.राज्याच्या सर्व भागांमध्ये मुसळधार पावसासह गारपिटीचीही शक्यता आहे. पश्चिम भारतातील मध्य महाराष्ट्रात १८ ते २१ एप्रिल दरम्यान हलका पाऊस आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## अकरा गावांचा बंद

वापर होत असल्याने शेतीही धोक्यात आली आहे.नदी धरणापासून सुरु होते त्यावेळी पाणी एकदम स्वच्छ असते. पण पुढे आल्यावर तेच पाणी प्रदूषित होऊन विषात रूपांतर होते. विविध औद्योगिक धंद्याचे प्रक्रिया न केलेले, मळीमिश्रित, रासायनिक पाणी व शहरातील सांडपाणी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सरळ पंचगंगेत सोडले जात आहे. त्यामुळे पाणी प्रदूषण करणाऱ्या घटकावर कारवाई करून नदी प्रदूषण रोखावी. यासाठी कायदेशीर मागणीवर आधारित आपले हे प्रदूषणमुक्तीचे आंदोलन सुरु आहे. लोकांचा या आंदोलनात सहभाग आणि पाठींबा आहे. शुक्रवारचे आंदोलन हे निर्णायक करायचेच या उद्देशाने प्रत्येकाने यावे. येताना आपल्या बरोबर गावातील सर्वांना घेऊन यावे, असे आवाहन आंदोलन अंकुश तर्फे करण्यात आले आहे.

# मतदारसंघ फेरबदल विधेयकावरून घमासान

(पान १ वरून )

प्रणाली आणि प्रशासकीय रचना मजबूत करण्यासाठी हे बदल आवश्यक आहेत.सरकारने हे विधेयक सादर करताच, काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी या तीन विधेयकांना विरोध केला. त्यांनी सभागृहात संविधान विधेयक, केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक आणि सीमांकन विधेयक सादर करण्यास आक्षेप घेतला. यामुळे संसदेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यात तीव्र वादविवाद होण्याची शक्यता आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. अमित शहा म्हणाले की, के. सी. वेणुगोपाल विधेयकांच्या गुण-दोषांवर भाष्य करू शकत नाहीत आणि केवळ तांत्रिक आक्षेप घेऊ शकतात.चर्चेदरम्यान सरकार विरोधी पक्षाला सडेतोड उत्तर देईल.दरम्यान, सपा नेते अखिलेश यादव म्हणाले, आम्ही महिला विधेयकाच्या बाजूने आहोत. तुम्हाला एवढी घाई का आहे? तुम्हाला जनगणना का करायची नाही? तुम्हाला जनगणना करायची नाही कारण जनगणना होताच आम्ही सर्वजण जात जनगणनेची मागणी करू आणि जात जनगणनेनंतर आम्ही आरक्षणाची मागणी करू. म्हणूनच ते फसवणूक करून त्यांना यात ओढू इच्छितात.

**दक्षिण भारतातून जागा कमी होणार नाहीत-शहा**

**कोणत्याही राज्याच्या जागा कमी होणार नाहीत. मात्र विरोधी पक्ष दक्षिण भारताच्या जागा कमी होतील अशा वावड्या उठवत आहेत असे अमित शहा म्हणाले. आगामी लोकसभा निवडणुकीत सभागृहाची संख्या ५४३ वरून ८१६ होणार आहे. हा फेरबदल लोकसभा निवडणूक २०२९ मध्ये होणार आहे. त्या आधी हा बदल होणार नाही.**

**जनगणना सुरू आहे-शहा**

**अमित शहा म्हणाले, सध्या जनगणना होत आहे. ही जनगणना घराची होत आहे. घराला जात नसते. जातीनुसार जनगणना होणार आहे. ही जनगणना होण्यास आणखी काही महिन्याचा कालावधी लागणार आहे. काँग्रेस पक्षाने मतदार संघ फेररचना करण्यासाठी जो आयोग बनवला आहे. त्यानुसार मतदार संघाची फेर आखणी होईल. याबाबत प्रियांका गांधी यांनी निश्चित रहावे असे अमित शहा म्हणाले.**

सरकारच्या म्हणण्यानुसार, प्रस्तावित विधेयकामुळे लोकसभेच्या जागांची संख्या कमाल ८५० पर्यंत वाढू शकते, जेणेकरून २०२९ च्या निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण लागू करता येईल. २०११ च्या जनगणनेच्या आधारावर मतदारसंघ पुनर्रचना केली जाईल. या विधेयकात लोकसभा आणि विधानसभेतील ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद असून, या जागा आळीपाळीने दिल्या जातील. विरोधी पक्षांनी मतदारसंघ पुनर्रचनेच्या तरतुदींना संयुक्तपणे विरोध करण्याचा निर्णय घेतला होता, पण ते महिला आरक्षणाला पाठिंबा देत राहतील.

## तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-**

**जिल्हाधिकारी विजय राठोड यांनी श्री जोतिबा तसेच श्री अंबाबाई देवस्थान तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा आज जिल्हाधिकारी कार्यालयातील राजर्षी शाहू सभागृहात ऑनलाइन आढावा घेतला. यावेळी प्रामुख्याने निवासी उप जिल्हाधिकारी गजानन गुरव, करवीरच्या प्रांताधिकारी मोसमी बर्डे-चौगुले, जिल्हा नियोजन अधिकारी विक्रम देशमुख, देवस्थान समितीचे शिवराज नाईकवडे आदी उपस्थित होते.**



जिल्हाधिकारी विजय राठोड यांनी राजर्षी शाहू सभागृहात ऑनलाइन बैठक घेऊन आढावा घेतला.

या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, या विकास आराखड्यांतर्गत जी कामे सुरू आहेत, ती अतिशय दर्जेदार व गुणवत्तापूर्ण व्हावीत; तसेच सुरू असलेल्या कामांमध्ये स्थानिक लोकांना विश्वासात घेण्यात यावे. ज्योतिबा मंदिर परिसरात अतिक्रमण आहे का, तसेच त्या ठिकाणी रस्त्यांची कनेक्टिव्हिटी चांगली आहे का, याची माहितीही त्यांनी यावेळी जाणून घेतली. निवासी उपजिल्हाधिकारी गुरव यांनी येत्या १६ मे पासून जनगणनेचे काम सुरू होणार असल्याने, तत्पूर्वी अंबाबाई देवस्थान परिसरातील जागांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू करण्याच्या सूचना केल्या. तर प्रशासनाच्या वतीने अंबाबाई मंदिर परिसरातील भूसंपादनाबाबत दोन बैठका झाल्या असल्याची माहिती करवीरच्या प्रांताधिकारी श्रीमती बर्डे-चौगुले यांनी या बैठकीत दिली. जिल्हाधिकारी राठोड यांनी यावेळी तीर्थक्षेत्र आराखड्याच्या सद्यस्थितीचा बारकाईने आढावा घेतला. या बैठकीसाठी पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहणे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. यावेळी महानगरपालिकेचे शहर अभियंता मस्कर तसेच आर्किटेक्ट रेवा पेठे यांच्यासह संबंधित विभागांचे इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एमबीबीएस विद्यार्थ्यांच्या विकास शुल्कात बदल

**मुंबई,ता.१६(प्रतिनिधी)**

**राज्यातील एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांतील विकास शुल्कातील बदल तसेच एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर शैक्षणिक शुल्क सवलत देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.**

मंत्रालयामध्ये आज राज्यातील एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांतील विकास शुल्कातील बदल तसेच एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर शैक्षणिक शुल्क सवलत देण्याबाबत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त अनिल भंडारी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संबंधित अधिकारी आणि विद्यार्थी संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

मुश्रीफ म्हणाले, एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांवर वाढत्या आर्थिक ताणाचा विचार करून विकास शुल्कात आवश्यक ते बदल करण्याची गरज आहे. तसेच एसईबीसी (सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक शुल्कात सवलत देण्याबाबत चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल.

## कवठेपिरान येथे दोन दुचाकींची धडक

**सांगली,ता.१६(प्रतिनिधी)-**

**मिरज तालुक्यातील कवठेपिरान येथे दोन दुचाकींच्या धडकेत दोघे जखमी झाले. हा अपघात पाटील मळा रस्त्यावर गुरूवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास झाल्याचे सांगण्यात आले. याबाबत दुचाकी चालक अभिजीत धोंडिराम पवार (रा.कवठेपिरान) याच्याविरूद्ध सांगली ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रकाश ज्ञानू सुर्वे (रा.भाळवणी, ता.खानापूर) हे गुरूवारी सकाळी दुचाकी (केए ३२ ईपी १६५७) वरून कवठेपिरान मार्गे वडगावकडे निघाले होते. तेव्हा अभिजीत पवार याने दुचाकी (एमएच १० डीएस ००३६) वरून चुकीच्या दिशेने येऊन सुर्वे यांना धडक दिली.

धडकेत सुर्वे आणि पवार हे दोघे जखमी झाले. तसेच अपघातात दोन्ही दुचाकींचे नुकसान झाले. याबाबत सुर्वे यांचा मुलगा साहिल प्रकाश सुर्वे याने फिर्याद दिली आहे.

## आदित्य ठाकरेंच्या मुद्यावरून गदारोळ

(पान १ वरून )

आक्षेप घेतला. त्यामुळे लोकसभेत प्रचंड गोंधळ उडाला.

विधेयकावर बोलत असताना खासदार अरविंद सावंत म्हणाले, 'दिल्लीत कार्यक्रम झाला. आमच्या एका हुशार आयएएस अधिकाऱ्याने त्यात एक लेख लिहिला. यांचे (भाजप) सरकार महाराष्ट्रात आहे. त्या महिला अधिकाऱ्याने लिहिले की, सरकारमधील एका मंत्र्यांने सांगितले की, मला महिला अधिकारी नको. हे महिला अधिकाऱ्यांच्या सन्मानाची, अधिकाराची आणि सुरक्षेच्या चर्चा करतात?' 'कुलदीप सेंगर कोण आहे, कोणत्या पक्षाचा आहे? हे विसरू नका. ब्रिजभूषण शरण सिंह कोणत्या पक्षाचा आहे? हे महिलांच्या सन्मानाची गोष्ट करतात', असे अरविंद सावंत म्हणाले. बलात्कारी तुम्हाला खूप प्रिय आहेत का?', असा प्रश्नही विचारला.

त्यावर निशिकांत दुबे यांनी आक्षेप घेत बोलण्याची परवानगी मागितली. त्यावर तालिकाध्यक्षांनी खासदार निशिकांत दुबेंना बोलण्याची संधी दिली. निशिकांत दुबे म्हणाले, 'जर हे कुलदीप सेंगर आणि ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याबद्दल बोलणार असतील, तर आदित्य ठाकरेंबद्दलही बोलले जाईल. त्यांनीही अभिनेत्रीला मारले आहे. इथेच चर्चा करुयात. दुबे यांच्या वक्तव्यानंतर ठाकरे गटासह विरोधी बाकांवरील अन्य खासदार आक्रमक झाले आणि सभागृहात काही काळ गोंधळ उडाला.

अरविंद सावंत आणि विरोधकांनी दुबेंवर कारवाई करण्याची मागणी केली. त्यानंतर तालिकाध्यक्ष म्हणाले, ते जे बोलले आहेत. ते कामकाजातून वगळण्यात आले आहे. ते जे काही बोलतील ते कामकाजात घेतले जाणार नाही.

त्यानंतर अरविंद सावंत आणि सुप्रिया सुळे आग्रही मागणी केली की, दुबे यांनी माफी मागितली पाहिजे. त्यानंतर बराच वेळ गोंधळ सुरू राहिला. तालिकाध्यक्षांनी उभे राहून सदस्यांना शांतता राखण्यास सांगून सावंतांना बोलू द्या असे म्हणाले. त्यानंतर सावंत म्हणाले की, कुणाला बदनाम करायचे असेल, तर मी तडीपारचं नाव घेऊ का? कोण तडीपार होतं. एपस्टिन फाइल्सचं नाव घेऊ का? बोला ना, मला तोंड उघडायला लावू नका, असे सावंत म्हणाले.

## नोकरीच्या अमिषाने फसवणूक

(पान १ वरून )

आरोपी चंद्रकांत महापुरे याने फिर्यादी माधुरी आपटे यांच्याकडून २१ फेब्रुवारी २०२४ ते १४ ऑगष्ट २०२५ या कालावधीत रोख व ऑनलाईन बँकिंग प्रणालीद्वारे ४ लाख ५० हजार रुपये स्विकारले होते नियुक्ती पत्र बनावट असल्याचे सिद्ध झाले त्यावेळी स्विकारले रक्कमेतील १ लाख ६० हजार रुपये परत केले आहेत

**गुन्हा दाखल करण्याची धमकी**

फिर्यादी माधुरी आपटे यांनी नोकरी लावण्यासाठी घेतलेले पैसे परत मिळावेत यासाठी आरोपी चंद्रकांत महापुरे यांचेकडे तगादा लावल्यावर त्याने १५ टक्के व्याजाने पैसे देता म्हणून तुमच्यावर गुन्हा दाखल करण्याची धमकी फिर्यादी आपटे यांना दिली.

## पोलीस महासंचालक कोल्हापूर दौऱ्यावर

(पान १ वरून )

आढावा घेतील. २२ एप्रिलला पोलीस परेड, संमेलन आणि ड्रील होणार आहे. त्यानंतर ते मोटार वाहन विभाग आणि बॉम्ब शोधक पथकाची पाहणी करतील. याच दिवशी जिल्ह्यातील

गुन्ह्यांचा आढावा घेण्यासाठी क्राईम कॉन्फरन्सही घेतली जाणार आहे. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी, २३ एप्रिलला ते गडहिंग्लज येथील उपअधीक्षक कार्यालयाची तपासणी करून करणार आहेत.

महासंचालकांच्या या दौऱ्यात कोणतीही चूक राहू नये, यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कंबर कसली आहे. गेल्या काही दिवसांपासून पोलीस ठाण्यांची स्वच्छता, कागदपत्रांची जुळवाजुळव आणि रेकॉर्ड अद्ययावत करण्याचे काम रात्रंदिवस सुरू आहे. या दौऱ्यात होणाऱ्या पोलिस संमेलनमुळे कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी थेट महासंचालकांपर्यंत पोहोचणार आहेत.

## इराणने प्रस्ताव नाकारल्यास पुन्हा युध्द;अमेरिकेचा इशारा

■ वॉशिंग्टन,ता.१६-

**इराणने शांतता करार स्वीकारला नाही, तर पुन्हा युद्ध भडकू शकते, असा इशारा अमेरिकेने इराणला दिला आहे. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी सांगितले की, इराणकडे तडजोड करण्याची संधी आहे, परंतु जर त्यांनी ती नाकारली, तर अमेरिका लष्करी कारवाई पुन्हा सुरू करेल.**

त्यांनी सांगितले की, अमेरिकी सैन्य पूर्णपणे तयार आहे आणि कोणत्याही क्षणी लढाऊ कारवाई सुरू करू शकते. अमेरिकी सैन्य राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशांची वाट पाहत आहे आणि सूचना मिळताच कारवाई सुरू केली जाऊ शकते.

हेगसेथ यांनी सांगितले की, अमेरिका इराणवरील नौदल नाकेबंदी सुरूच ठेवेल. त्यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत अमेरिका आपली सामरिक उद्दिष्ट्ये साध्य करत नाही, तोपर्यंत ही कारवाई सुरू राहील.

दरम्यान, अमेरिकी जनरल डॅन केन यांनी सांगितले की, नाकेबंदीमुळे १३ जहाजे मागे फिरली आहेत. यापैकी बहुतेक जहाजे नाकेबंदीच्या सीमेवर पोहोचल्यानंतर परतली, तर एका जहाजाने त्यापूर्वीच आपला मार्ग बदलला.

अमेरिका आणि इराण २१ एप्रिल रोजी संपणाऱ्या युद्धविरामापूर्वी कराराच्या जवळ पोहोचत आहेत. अमेरिकन माध्यमांनुसार, दोन्ही बाजूंमधील चर्चा पुढे सरकली आहे, तरीही काही मतभेद अजूनही बाकी आहेत.

यादरम्यान तेहरानमध्ये इराणी अधिकारी आणि पाकिस्तानी लष्करप्रमुख आसिम मुनीर यांच्यात महत्त्वाची बैठक होईल. मुनीर यांनी यापूर्वीच इराणमध्ये पोहोचून परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांची भेट घेतली आहे आणि ते अमेरिकेचा संदेश घेऊन गेले आहेत.

पाकिस्तान, इजिप्त आणि तुर्की मध्यस्थाची भूमिका बजावत आहेत. तिकडे, अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी वेंस, स्टीव विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांच्यासोबत चर्चा आणि मसुदा प्रस्ताव शेअर करत आहेत.

**भावपूर्ण श्रध्दांजली!**



श्री. सुनिल गणपती जावळे (आबा)

आमचे बंधू,
श्री. सुनिल गणपती जावळे (आबा)
यांचे गुरूवार, दि. १६/०४/२०२६
रोजी वयाच्या ६० व्या वर्षी
आकस्मिक निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास शांती लाभो
हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

नौशाद गणपती जावळे | धनपाल गणपती जावळे
चंद्रकांत गणपती जावळे | अनिल संपत जावळे

**समस्त जावळे परिवार**, लाखेनगर-इचलकरंजी

**भावपूर्ण श्रध्दांजली!**



श्री. सुनिल गणपती जावळे (आबा)

आमचे मामा,
श्री. सुनिल गणपती जावळे (आबा)
यांचे गुरूवार, दि. १६/०४/२०२६
रोजी वयाच्या ६० व्या वर्षी
आकस्मिक निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास शांती लाभो
हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

राजाराम गणपती लाखे | आनंदा गणपती लाखे
अरूण गणपती लाखे | अमर यशवंत लाखे
प्रथमेश दिपक लाखे

**लाखे परिवार**, इचलकरंजी

**।। दुःखद निधन ।।**



श्री. शीतल पांडुरंग खानाज

आमचे बंधू श्री. शीतल पांडुरंग खानाज यांचे बुधवार, ता. १५/०४/२०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

**समस्त खानाज परिवार**

* **रक्षा विसर्जन :** उद्या शनिवार, ता. १८/०४/२०२६ रोजी सकाळी ८ वा. पंचगंगा नदितीरी आहे.

# सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी शिव-शाहू आघाडीतर्फे मोर्चा काढू

## विरोधी पक्ष नेते उदयसिंह पाटील यांचा इशारा

इचलकरंजी,ता.१६ –

**शहरात पाण्याचा प्रश्न गंभीर असताना पाणी प्रश्नावर विशेष सभा बोलवावी अशी मागणी करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. त्याचबरोबर प्रशासनही पाणी प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे शहराला दररोज किंवा एक दिवस आड शहरास पाणी पुरवठा करावा या मागणीसाठी शिव शाहु –विकास आघाडीच्यावतीने शहरात जनजागृती व मोर्चा काढण्याचा इशारा विरोधी पक्षनेते उदयसिंह पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिला.**

सध्या शहरात ७ ते ८ दिवसांतून एकदाच पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर उदयसिंह पाटील यांनी मजरेवाडी येथील जॅकवेलला अचानक भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान, ५४० एचपी क्षमतेचे चार पाणी उपसा पंप उपलब्ध असतानाही केवळ एकच पंप कार्यरत असल्याचे निदर्शनास आले. तोही सुमारे ७० टक्के क्षमतेने सुरू आहे. जॅकवेलवर १६०० केव्हीए क्षमतेचे दोन ट्रान्सफॉर्मर असून त्यापैकी एकच सुरू तर दुसरा बंद अवस्थेत असल्याचे आढळले. मजरेवाडी ते इचलकरंजी दरम्यानची एअर व्हॉल्व्ह यंत्रणा पूर्णतः बदलण्याची गरज आहे. नवीन जलवाहिनीचे काम उपसा केंद्रापर्यंत पूर्ण झाले असले तरी सुमारे अर्धा किलोमीटरचा भाग तातडीने बदलणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.



मजरेवाडी येथील उपसा केंद्राची पाहणी करताना विरोधी पक्ष नेते उदयसिंह पाटील , नंदकुमार पाटील, इम्रान हवेरी व इतर मान्यवर.

नदीत पाण्याची उपलब्धता समाधानकारक असून यंत्रणाही सक्षम आहे. केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शहर पाण्यापासून वंचित राहत आहे. जर दोन पंप पूर्ण क्षमतेने सुरू केले आणि नवीन जलवाहिनी तात्काळ कार्यान्वित केली, तर शहराला दररोज किंवा एक दिवसाआड पाणीपुरवठा करणे शक्य आहे, असे पाटील यांनी सांगितले. पाणी प्रश्न लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांमध्येही कळीचा मुद्दा ठरला होता. मात्र, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी याकडे पुरेसे लक्ष दिले नसल्याची टीकाही त्यांनी केली. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि प्रशासनावरील पकड कमी असल्यामुळेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी नगरसेवक शिवाजी पाटील, नंदकुमार पाटील, राजू आलासे, सुनील तेलनाडे, नागेश शेजाळे उपस्थित होते.

# मजरेवाडी उपसा केंद्रातून सुरळीत पाणी पुरवठा

## महापौर उदय धातुंडे : विरोधकांकडून दिशाभूल

इचलकरंजी,ता.१६–

**मजरेवाडी उपसा केंद्राच्या ठिकाणी कोणतीही अडचण नसून तेथून पाणी पुरवठा सुरळीतपणे सुरु आहे. त्यामुळे शहरात कोणत्याही परिस्थितीत पाणीपुरवठा खंडित होणार नाही, अशी माहिती महापौर उदय धातुंडे यांनी दिली. दीड किलोमीटरची पाइपलाईन बदलल्यानंतर दोन दिवसाआड नियमित पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**

इचलकरंजी शहराला पंचगंगा आणि मजरेवाडी येथून कृष्णा पाणी पुरवठा योजनांद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. शहरात सध्या जाणवणाऱ्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून बुधवारी मजरेवाडी उपसा केंद्राला भेट देऊन अपुऱ्या माहितीच्या आधारे व शहरवासियांची दिशाभूल करण्यासाठी महानगरपालिकेच्या कारभारावर टीका करण्यात आली. या पार्श्वभूमीवर महापौर उदय धातूंडे यांनी गुरुवारी मजरेवाडी उपसा केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

यावेळी जल अभियंता बाजी कांबळे यांनी माहिती देताना या उपसा केंद्रावर एकूण ४ पंप असून त्यापैकी २ पंप नियमित कार्यरत ठेवण्यात आले आहेत. तर उर्वरीत दोन पंप हे राखीव आहेत. सध्या सुरू असलेल्या दोन पंपांपैकी एक पंप ८ एप्रिलपासून दुरुस्तीच्या कारणास्तव बंद ठेवण्यात आला आहे. एकाच पंपावरून दररोज सुमारे २२.५ एमएलडी पाणी उपसा केला जात आहे. तर ३० एप्रिलनंतर दुरुस्तीसाठी एक ते दोन दिवस उपसा बंद ठेवावा लागणार असला तरी त्या कालावधीतही शहराचा पाणीपुरवठा सुरळीत असेल, त्यासाठी प्रशासनाकडून योग्य नियोजन केल्याचे सांगितले.

सभागृह नेते विठ्ठल चोपडे यांनी शहरातील पाणीपुरवठा अधिक सुरळीत करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे सांगितले. स्थायी समिती सभापती सतिश मुळीक यांनी उपसा केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेत उपसा केंद्राच्या दुरुस्तीसंदर्भात आवश्यक सूचना केल्या. यावेळी उपमहापौर अनिल डाळ्या, नगरसेवक नितेश पवार, सुशांत कलागते, अभिषेक वाळवेकर व अधिकारी उपस्थित होते.



मजरेवाडी उपसा केंद्राची पाहणी करताना महापौर उदय धातुंडे,उपमहापौर अनिल डाळ्या, स्थायी समितीचे अध्यक्ष सतिश मुळीक,गटनेते विठ्ठल चोपडे. (छाया.– मयूर चिंदे)

# आत्महत्येस कारणीभूत ; दोघांविरूध्द गुन्हा दाखल

इचलकरंजी,ता.१६–

**मानसिक व शारिरीक छळासह अपमानास्पद वागणूकीला कंटाळून मारुती सदाशिव शेंडुरे (रा. गांधी विकास नगर कबनूर) याने आत्महत्या केली आहे. त्याच्या आत्महत्येस कारणीभूत ठरल्या प्रकरणी माया मारुती शेंडुरे (रा. गांधी विकास नगर कबनूर) आणि उमेश हिरवे (रा.इचलकरंजी) या दोघांवर गावभाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सुनिल अर्जुन नाईक (वय ४२ रा. धान्य ओळ) यांनी फिर्याद दिली आहे.**

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, ११ एप्रिल रोजी मारुती शेंडुरे याने पंचगंगा नदीत आत्महत्या केल्याची घटना घडली. तत्पूर्वी मारुती याने फिर्यादी मित्र सुनिल नाईक याच्या घरी जावून माया व उमेश यांच्याकडून सतत छळ केला जात असून अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचे सांगितले. आणि त्याचदिवशी आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने या संदर्भात लिहून ठेवलेली चिठ्ठी पोलिसांना मिळून आली आहे. त्यानुसार नाईक यांच्या फिर्यादीवरुन दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत महिला जखमी

इचलकरंजी,ता.१६ –

**मॉर्निंग वॉक करता पाठीमागून भरधाव वाहनाने दिलेल्या धडकेत महिला गंभीर जखमी झाली. सौ. वासंती दिनकर पाटील (वय ५० रा. गणेशनगर ग.नं.५) असे त्यांचे नांव आहे. या प्रकरणी दिनकर गणपती पाटील (वय ५५ रा. गणेशनगर ग.नं.५) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चारचाकी वाहनचालकाच्या विरोधात शहापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

वासंती पाटील व अन्य काही महिला बुधवारी सकाळच्या सुमारास पंचगंगा कारखाना ते हातकणंगले या रस्त्यावर मॉर्निंग वॉक करीत होत्या. कोरोची गावच्या हद्दीतील जोतिबा रसवंतसमोर पाठीमागून आलेल्या चारचाकी वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. त्यामध्ये पाटील या रस्त्यावर आदळल्याने जखमी झाल्या. अपघातानंतर वाहनचालकाने घटनास्थळावरुन पलायन केले.



# इचलकरंजीत येणाऱ्या प्रमुख मार्गावर स्वागत कमानी उभाराव्यात

इचलकरंजी,ता.१६–

**इचलकरंजी हे वस्त्रोद्योगाचे प्रमुख केंद्र असून शहरात दाखल होणाया प्रमुख ५ मार्गावर स्वागत कमानी उभाराव्यात. त्यामुळे शहराची ओळख अधिक उठून दिसेल, अशी मागणी राहुल आवाडे विद्यार्थी संघटनेच्या वतीने आमदार राहुल आवाडे यांच्याकडे करण्यात आली आहे.**

महाराष्ट्राचे मँचेस्टर अशी ओळख असलेल्या इचलकरंजीने औद्योगिक, व्यायसायिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व पर्यटन क्षेत्रातही नांवलौकिक मिळविलेला आहे. शहराची ही ओळख ठळकपणे दिसण्यासाठी शहरात दाखल होणाऱ्या पाच प्रमुख मार्गावर स्वागत कमान उभारण्याची गरज आहे. शहरात दाखल होण्यासाठी कोल्हापूर–इचलकरंजी मुख्य मार्ग, हातकणंगले–इचलकरंजी. जयसिंगपूर–इचलकरंजी, नदीवेस नाका–इचलकरंजी आणि टाकवडे–इचलकरंजी हे पाच मुख्य मार्ग आहेत. शहराची लोकसंख्या सातत्याने वाढत असून, औद्योगिक, व्यावसायिक आणि पर्यटन क्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने शहराला आधुनिक आणि भव्य स्वरुप प्रदान करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी कोल्हापूर नाका, जय सांगली नाका, स्टेशन रोड, टाकवडे वेस व नदीवेस नाका या पाच ठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात याव्यात, अशी मागणी विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुहास कांबळे व शहराध्यक्ष फहिम पाथरवट यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केली आहे. या संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

यावेळी रवी रजपुते, राजू बोंद्रे, नितेश पोवार, शशिकांत मोहिते, प्रमोद बचाटे आदी उपस्थित होते.

# बेशिस्त रिक्षाचालकांविरोधात पोलिसांचा बडगा

कोल्हापूर, ता.१६ (प्रतिनिधी) –

**कोल्हापूर शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणारे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांविरोधात शहर वाहतूक नियंत्रण शाखेने आक्रमक पावले उचलली आहेत. गेल्या दोन दिवसांत केलेल्या धडक कारवाईत १५१ रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून ७७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे बेशिस्त रिक्षाचालकांची चांगलीच धांदल उडाली.**



शहरातील विविध चौकांत सिग्नलच्या अगदी जवळ रिक्षा थांबवणे, रिक्षा स्टॉपवर मर्यादेपेक्षा जास्त वाहने उभी करणे आणि रस्त्यावर कोठेही अस्ताव्यस्त रिक्षा लावून व्यवसाय करणे, अशा प्रकारांमुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक नंदकुमार मोरे यांनी सर्व रिक्षाचालकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले होते. मात्र, अनेक चालक याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून आल्यानंतर वाहतूक शाखा आणि प्रादेशिक परिवहन विभागाने बुधवारी व गुरुवारी संयुक्त मोहीम राबवली. या दोन दिवसांच्या मोहिमेत प्रामुख्याने गणवेश परिधान न करणे, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरणे, जादा भाड्याची मागणी करणे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५१ रिक्षांवर कारवाई करण्यात आली.

# कोल्हापुरात अतिक्रमणावर हातोडा

कोल्हापूर, ता.१६ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर महानगरपालिकेच्यावतीने शहरातील अतिक्रमणावर हातोडा उचलला असून अतिक्रमण विरोधी कारवाईमध्ये सद्या सातत्य ठेवल्याने यापुढे शहरातील वाहतूकीला मदत होणार असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.**

विभागीय कार्यालय क्र.२ (छ. शिवाजी मार्केट) व अतिक्रमण निर्मूलन पथकाकडून आज तटाकडील तालीम चौक ते ताराबाई रोड तसेच महाद्वार परिसरात संयुक्त अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली.



या कारवाईदरम्यान ३ लोखंडी टेबल, ११ पार्किंग जाळ्या, ४ स्टॅन्ड बोर्ड, ४ छत्र्या, ५ लोखंडी स्टॅन्ड, ३ लोखंडी कॉट, २ कॅरेट, १५ लाकडी टेबल, १ स्पीकर, ६ पुतळे, २० लोखंडी पाईप, १ लोखंडी स्टूल, ४ स्टॅन्ड, २ रांगोळी बॅग, १ ढकल गाडी व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापौर सौ. रुपाराणी निकम यांच्या आदेशानुसार, अतिरिक्त आयुक्त शिल्पा दरेकर, उपआयुक्त किरणकुमार धनवाडे, सहाय्यक आयुक्त स्वाती दुधाणे व शहर अभियंता रमेश मस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये उपशहर अभियंता सुरेश पाटील, अतिक्रमण प्रमुख प्रफुल्ल कांबळे, कनिष्ठ लिपीक सजन नागलोत तसेच अतिक्रमण विभाग व विभागीय कार्यालय क्र. २ मधील कर्मचाऱ्यांच्या पथकाने सहभाग घेतला.

# दुसऱ्या दिवशीही कंत्राटदारांचे काम बंद आंदोलन

## एस्टिमेटऐवजी हातात टाळ घेऊन सरकारचा निषेध

कोल्हापूर, ता.१६ (प्रतिनिधी)–

**जिल्ह्यातील जलजीवन मिशनसह विविध शासकीय योजनांच्या कामांची तब्बल ९६ हजार कोटींची बिले शासनाकडून गेल्या दोन वर्षांपासून थकीत असल्याने जिल्हा शासकीय ठेकेदार संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे.**

आपल्या हक्काच्या पैशांसाठी बुधवारपासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर काम बंद आंदोलन पुकारण्यात आले असून, आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी गुरूवारी कंत्राटदारांनी हातात टाळ–मृदंग घेऊन भजन आणि पोवाड्यांच्या माध्यमातून सरकारचा अनोखा निषेध केला.

जिल्ह्यात जलजीवन मिशन, प्रादेशिक पर्यटन, अल्पसंख्याक योजना, तांडावस्ती सुधार योजना, २५१५ आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अशा अनेक विभागांतर्गत विकासकामे सुरू आहेत. मात्र, शासनाकडून गेल्या दोन वर्षांपासून या कामांचा निधी उपलब्ध झालेला नाही. यामुळे जिल्ह्यातील कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले असून, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी जिल्हा शासकीय ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष किशोर जामदार यांच्या नेतृत्वाखाली बुधवार पासून आंदोलन सुरू करण्यात आले.

आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी नेहमी हातात कामाचे नकाशे आणि एस्टिमेट प्लॅन घेणाऱ्या कंत्राटदारांनी आज चक्क टाळ हातात घेऊन भजन आणि पोवाड्यांच्या सुरात सरकारचा निषेध केला. तसेच, निधी उपलब्ध नसताना काम चालू करण्यासाठी कंत्राटदारांवर कोणताही दबाव आणू नये आणि सुधारित अंदाजपत्रकांना तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणीही लावून धरली आहे.आंदोलनाला जिल्हा परिषद पदाधिकारी आणि मराठा महासंघाने भेट देऊन पाठिंबा दर्शवला. जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत मागे न हटण्याचा निर्धार कंत्राटदारांनी केला आहे.

# बेलवडेंविरोधात दूध संस्थांचा मोर्चा

## सुनावणीवेळी अधिकारी गायब

कोल्हापूर ता.१६ (प्रतिनिधी)–

**जिल्ह्यातील १२०० हून अधिक दूध संस्था अपात्र ठरवण्यासाठी न्यायालय आणि दुग्ध विभागाकडे धाव घेणाऱ्या गर्जन संघटनेचे प्रमुख प्रकाश बेलवडे यांच्याविरोधात गुरूवारी कागल आणि चंदगड तालुक्यातील शेकडो दूध उत्पादकांनी सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था, दुग्ध विभाग) कार्यालयावर धडक मोर्चा काढत या संस्थांना मतदानाचा अधिकार बहाल करण्याची मागणी केली.**

प्रकाश बेलवडे यांनी जिल्ह्यातील १२०० हून अधिक दूध संस्थांची नोंदणी नियमानुसार झालेली नाही आणि त्यात मोठी अनियमितता असल्याचा दावा करत या संस्था अपात्र ठरवण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या भूमिकेमुळे या संस्थांच्या मतदानावर गदा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच्या निषेधार्थ मोर्चात उत्पादकांनी बेलवडेंविरोधात आक्रमक घोषणाबाजी केली.

जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भैया माने यांनी प्रशासनावर प्रश्नांचा भडीमार करत दुर्गम भागातून १०० ते १५० किलोमीटरचा प्रवास करून सुनावणीसाठी आलेल्या उत्पादकांना कार्यालयात अधिकारी न भेटल्याने संताप व्यक्त केला. सहाय्यक निबंधक सुजय कदम यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत माने यांनी खडे बोल सुनावले. ज्या संस्थांनी यापूर्वीच्या निवडणुकीत मतदान केले आहे आणि ज्या गेली अनेक वर्षे गोकुळला दूध पुरवठा करत आहेत, त्यांना आताच अपात्र का ठरवले जात आहे? तुम्ही कोणाच्या दबावाखाली काम करत आहात? गोकुळ बंद करून अमूलला वाढवण्यासाठी हा खटाटोप सुरू आहे का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. या मोर्चात विकास पाटील, दिनकर कोतेकर, विजयसिंह पाटील यांच्यासह दूध उत्पादक सहभागी झाले होते.

# दिराकडून वहिनी व अल्पवयीन मुलीचा विनयभंग

कुपवाड,ता.१६ (प्रतिनिधी) –

**कुपवाड हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून, दिराने वहिनी व तिच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. याबाबत गुन्हा दाखल झाला आहे.**

पीडितेने एमआयडीसी कुपवाड पोलिसात फिर्याद दिली. दिर प्रवीण बाळासाहेब होवाळ याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५(२), ३५२ तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम () २०१२ अंतर्गत कलम ८, ११(२), १२ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

१२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पीडितेच्या घराच्या अंगणात आरोपी प्रवीण होवाळ हा तेथे येऊन शिवीगाळ करत पीडितेचा हात पकडून तिचा विनयभंग केलो. त्यावेळी पीडितेच्या दोन मुलींनी हस्तक्षेप केला. मात्र, आरोपीने पीडितेचा हात सोडताना एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीशी अश्लील वक्तव्य केल्याचे फिर्यादित म्हटले आहे. या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, अल्पवयीन मुलीवरही अत्याचाराचा प्रयत्न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# मतदार नोंदणी व मॅपिंगला गती द्या

## जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

मिरज,ता. १६ (प्रतिनिधी)

सांगली जिल्ह्यातील मतदार नोंदणी व मॅपिंग प्रक्रियेला गती देण्यासाठी मदनी चॅरिटेबल ट्रस्ट, सांगली यांनी पुढाकार घेत जिल्हाधिकारी मैनाक घोष यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. जिल्हाभर ''जनजागृती व मॅपिंग'' विशेष मोहिम तातडीने राबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. ट्रस्टच्या निवेदनानुसार, सांगली विधानसभा मतदारसंघ क्रमांक २८२ मध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून सातत्याने विशेष शिबिरे आयोजित करून नागरिकांचे स्व–मॅपिंग व वंशावळी मॅपिंग करण्यात येत आहे. मात्र, ग्रामीण व दुर्गम भागांतील अनेक नागरिकांपर्यंत या प्रक्रियेची माहिती अद्याप पोहोचलेली नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात मतदार मॅपिंग अपूर्ण राहण्याची शक्यता आहे.त्यावेळी हाफिज सद्दाम सय्यद व सुफियान पठाण यांनी प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली


समृध्द शैक्षणिक जीवनाचा राजमार्ग..!
Swami Vivekanand Vidya Pratishthan

LOKSEVAK A. B. NAIK SILVER CITY ENGLISH MEDIUM SCHOOL, HUPARI

Primary- Shivaji Nagar, Hupari-416 203 Ph. (0230) 2451122, 7276451122
Pre-Primary- Near Hutatma Smarak Hupari Ph. 8087451122
Email- silvercityschool1122@gmail.com

WALK IN INTERVIEW

| No. | Subject | Qualification | Post |
|---|---|---|---|
| 1 | SCIENCE | B.sc/M.sc, D.ed, B.ed/M.ed | Post 1 |
| 2 | MATHS | B.sc/M.sc, D.ed, B.ed/M.ed | Post 1 |
| 3 | S.S.T. | B.A/M.A,B.ed / M.ed | Post 1 |
| 4 | ENGLISH | B.A/M.A, B.ed / M.ed | Post 1 |
| 5 | PRE-PRIMARY | Any Graduate MTTC/NTTC | Post 4 |
| 6 | PRIMARY | ATD Art Diploma course | Post 1 |

■ Be Present with your RESUME Documents and hand written application.

Visit at- Sunday, 19th April and Sunday, 26th April 2026
Time: 10 AM to 2 PM Venue: Silver City School, Shivaji Nagar, Hupari

LOKSEVAK A. B. NAIK SILVER CITY ENGLISH MEDIUM SCHOOL, HUPARI



संधीवाताच्या रूग्णांसाठी सुपरस्पेशालिटी सेवा इचलकरंजी येथे रविवारी

डॉ. वसीम काझी
M.D.(Med.), P.G.D.G.M., D.N.B.(RHEUMATOLOGY)

खालील लक्षणे असल्यास संधीवात तज्ञांची भेट घ्यावी

- सांधे दुखणे
- सकाळी उठल्यानंतर सांधे कडक होणे
- स्नायुंची सूज–दुखणे आणि दुर्बलता (मायोसायटीस)
- डोळे व तोंडामध्ये खुप कोरडेपणा जाणवणे
- सोरयासिस असलेल्या रूग्णांची सांधेदुखी होणे
- वयोमानानुसार होणारी हाडांची झीज (ऑस्टिओअथ्रायटिस)
- वेगवेगळ्या प्रकारची रक्तवाहिन्यांची सुज (Vasculitis)
- साध्यांना सूज येणे
- कमी वयात पाठ दुखणे व ताठरणे
- उन्हात गेल्यास चेहरा लाल होणे
- युरीक ॲसिडमुळे होणारा संधीवात (Gout)
- त्वचा चामड्यासारखी जाड होणे (Scleroderma)
- स्नायुगत वात

इत्यादी सर्व रूग्णांनी सांधेविकार तज्ञांकडून तपासून योग्य ते निदान व उपचार करावा.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी ■ दि.: 19 एप्रिल 2026 वेळ : स. ०९ ते दु.१२

स्थळ: डॉ.बाफनाज् सुपरस्पेशालिटी क्लिनिक
जवाहरनगर,इचलकरंजी ✆ 0230-2441052, 7507860077

KOLHAPUR RHEUMATOLOGY CENTER
कोल्हापूर ह्मॅटोलॉजी सेंटर
1634,फ्लॅट क्रमांक 132, ई वॉर्ड, श्रीराम विद्यालय जवळ,६वी गल्ली, राजारामपुरी.

■ संपादकीय ■

# नवी राजकीय खेळी

देशातील बहुचर्चित अशा बिहार राज्याच्या मुख्यमंत्रिपदी भाजपाचे नेते सम्राट चौधरी यांनी शपथ घेतल्याने देशातील आणखी एका राज्याचे नेतृत्व भारतीय जनता पक्षाला मिळाले आहे. बिहारसारख्या महत्त्वाच्या राज्यामध्ये तब्बल दहा वेळा मुख्यमंत्रिपदावर विराजमान झालेले संयुक्त जनता दलाचे नेते नितीश कुमार यांनी आपल्या प्रादेशिक राजकारणाचा त्याग करून केंद्रीय पातळीवरील राजकारणात उडी घेण्याचा निर्णय घेतल्याने बिहारमध्ये हा सत्तापालट झाला आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बिहार विधानसभेमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजप उदयाला आला होता. तरीही झालेल्या कराराप्रमाणे त्यांनी नितीशकुमार यांनाच मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी दिली होती. मात्र, केवळ ७ महिन्यांतच मुख्यमंत्रिपद सोडल्यामुळे शंकाकुशंका निर्माण झाल्या. नितीश कुमार यांच्या मंत्रिमंडळामध्ये उपमुख्यमंत्रिपदावर विराजमान असलेले सम्राट चौधरी आता मुख्यमंत्री झाले आहेत. बिहारच्या एकूण राजकारणावर मोठा परिणाम करणारा हा निर्णय ठरणार आहे. कारण, बिहारचे राजकारण नेहमीच जातीपातीच्या संख्याबळावर आधारित असते. बिहारमधील प्रमुख समाज असलेला यादव विरुद्ध इतर ओबीसी समाज यांच्यामध्ये नेहमीच सत्तासंघर्ष सुरू असतो. नितीश कुमार स्वतः कुर्मी या ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व करतात, तर नवे मुख्यमंत्री सम्राट चौधरी हे कोईरी या समाजाचे प्रतिनिधित्व करतात. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव यांच्या कारकिर्दीमध्ये जेव्हा यादव समाजाचा प्रभाव वाढत होता तेव्हा नितीश कुमार यांनी लवकुश योजना आखून कुर्मी समाज आणि कोईरी समाज यांना एकत्र आणले होते. यादव समाजाच्या व्यतिरिक्त जो ओबीसी समाज आहे त्याला एकत्र करून लालूप्रसाद यांना तोंड देण्याची एक रणनीती नितीश कुमार यांनी आखली होती आणि त्यास नेहमीच यश मिळाले होते. म्हणूनच गेल्या २० वर्षांच्या कालावधीमध्ये तब्बल १० वेळा मुख्यमंत्रिपदी राहण्याचा विक्रम नितीश कुमार यांना करता आला. बिहारचे नवे सम्राट असलेले मुख्यमंत्री सम्राट चौधरी हे एकेकाळी नितीश कुमार यांचे कट्टर राजकीय वैरी होते. नितीश कुमार यांना सत्तेवरून घालवेपर्यंत मी माझा फेटा काढणार नाही अशी गर्जना सम्राट चौधरी यांनी केली होती. पण जेव्हा नितीश कुमार एनडीएमध्ये दाखल झाले तेव्हा त्यांनी ती शपथ मागे घेतली होती. आता सम्राट चौधरी यांचे मुख्यमंत्रिपदाचे नावसुद्धा नितीश कुमार यांनी सुचवले होते. मुळात राष्ट्रीय जनता दल, समता पार्टी अशा पक्षांमधून प्रवास करून नंतर भाजपामध्ये सामील झालेले सम्राट चौधरी हे ओबीसी चेहरा असलेले नेते आहेत. बिहारचे गृह खाते सांभाळणारे सम्राट चौधरी हे केंद्रीय गृहमंत्री शहा यांच्याही विश्वासातील आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करूनच बिहारची सूत्रे सम्राट चौधरी यांच्याकडे देण्यात आली आहेत. ज्या प्रकारे एकूण राजकीय रचना नितीश कुमार यांनी केली आहे ती पाहता बिहारच्या राजकारणावर त्यांचे लक्ष आणि नियंत्रण दोन्हीही राहणार आहे. केंद्रात नितीश कुमार यांना कोणती जबाबदारी मिळते यावरही सर्व काही अवलंबून राहणार आहे. राज्याचे मुख्यमंत्रिपद सोडून केंद्रात एखादी जबाबदारी घेण्याचा निर्णय निश्चितच सोपा नसतो. पण ज्याअर्थी नितीश कुमार यांच्यासारख्या महत्त्वाकांक्षी नेत्याने हा निर्णय घेतला आहे, त्याअर्थी केंद्रीय पातळीवर सुद्धा त्यांच्यासाठी काहीतरी महत्त्वाचे राखून ठेवण्यात आले आहे हे उघड आहे. बिहारसारख्या महत्त्वाच्या राज्यामध्ये भाजपाचा स्वतः चा मुख्यमंत्री कधीही झाला नसल्याने भाजपसाठीसुद्धा ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. युती करून सत्तेमध्ये राहणाऱ्या भाजपाला नेहमीच उपमुख्यमंत्री पदावर समाधान मानावे लागले होते. यावेळी मात्र त्यांनी योग्य संधी साधून बिहारची कमानसुद्धा आपल्या हातात घेतली. बिहारमधील पुढील विधानसभा निवडणूक होण्यास अद्याप चार वर्षांचा कालावधी बाकी आहे. या कालावधीमध्ये सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखालील सरकार कशाप्रकारे काम करते आणि याच कालावधीमध्ये भारतीय जनता पक्ष आणि नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल कशा पद्धतीने एकत्र राहतात यावरच सर्व काही अवलंबून राहणार आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान अशा अनेक राज्यांमध्ये जातीय समीकरण लक्षात घेऊनच मुख्यमंत्रिपदाची निवड करणाऱ्या भारतीय जनता पक्षाने बिहारचे जातीय समीकरण लक्षात घेऊनच सम्राट चौधरी यांच्या हातात सूत्रे दिली आहेत हे सुद्धा लक्षणीय आहे. साहजिकच सम्राट चौधरी यांची बिहारमधील राजकीय खेळी आणि नितीश कुमार यांची दिल्लीमधील नवीन राजकीय खेळी यावर सर्वांचेच लक्ष राहणार आहे.

# चटके वाढत्या तापमानाचे

**राज्यावर सध्या सूर्याचा प्रकोप झालेला दिसतो. संपूर्ण महाराष्ट्र उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार विदर्भासह राज्याच्या अनेक भागात उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये उकाडा असह्य झाला आहे. ही परिस्थिती पाहून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.**

विदर्भात उन्हाचा चटका सर्वाधिक जाणवत असून अकोला येथे यंदाच्या हंगामातील उच्चांकी ४३.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हे नोंदवण्यात आलेले देशातील सर्वाधिक तापमान ठरले. अकोला पाठोपाठ विदर्भातील इतर शहरांमध्येही पारा चढलेलाच आहे. अमरावती आणि वर्धामध्ये ४२ अंश सेल्सिअस तर चंद्रपूर, नागपूर, वाशिम आणि गडचिरोलीमध्ये ४१ अंशापेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली. याशिवाय उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, जळगाव, धुळे, सोलापूर, परभणी येथेही तापमान ४१ अंशाच्या पुढे गेले आहे. ठाणे आणि रायगड जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने 'यलो अलर्ट' जारी केला आहे.विदर्भासह राज्याच्या इतर भागात उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याचे संकेत आहेत. बिहारपासून तामिळनाडूपर्यंत विस्तारलेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे हवामानात हे बदल होत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे होणारे आजार आणि मृत्यू रोखण्यासाठी राज्य सरकारने तीन व्यापक मानक कार्यपद्धती लागू केल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, विशेषतः उघड्यावर काम करणारे मजूर आणि खाण कामगारांच्या सुरक्षिततेसाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. उष्णतेचा सर्वाधिक धोका असलेल्या जिल्ह्यांमध्ये लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा,नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा,जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड यांचा समावेश आहे. चंद्रपूरमधील कोळसा खाण कामगारांसाठी आणि कमी उत्पन्न गटातील नागरिकांसाठी उष्णता प्रतिरोधक गृहनिर्माण व्यवस्था करण्यावर सरकार भर देत आहे. दुपारच्या वेळी तापमान ४० अंशाच्या पार



जात असल्याने शक्यतो घराबाहेर पडणे टाळणे, सतत पाणी पिणे आणि कडक उन्हापासून स्वतःचा बचाव करणे आवश्यक आहे. विदर्भातील तापमानाने जागतिक विक्रम मोडण्यास सुरुवात केली आहे. हवामान विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार जगातील १० सर्वात उष्ण शहरांच्या यादीत विदर्भातील तब्बल ४ शहरांचा समावेश आहे. यात अकोला हे जगातील दुसरे सर्वांत उष्ण शहर ठरले आहे. अकोल्यात तापमानाचा पारा ४३ अंशाच्या पुढे गेला आहे. टॉप १० मध्ये चंद्रपूर, ब्रह्मपुरी आणि वर्धा या शहरांचाही समावेश आहे. या शहरांमधील तापमान सातत्याने ४२ ते ४५ अंशादरम्यान राहत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते जर उष्णतेची हीच लाट कायम राहिली तर मे महिन्यात पारा ५० अंश सेल्सिअस ओलांडण्याची शक्यता नाकारता येत नाही.राज्यात बहुतांश ठिकाणी अंगाची लाही-लाही होत असून उन्हाचा पारा चांगलाच चढला आहे. कमाल तापमान चाळीशी पार गेले आहे. सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा धोका असून हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. मुंबईसह राज्यातील ८ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान कोरडे, उष्ण आणि काही भागात दमट राहण्याचा अंदाज आहे. वाढत्या उन्हामुळे उष्माघात होण्याच्या संख्येत वाढ होत आहे. उष्माघाताच्या घटना रोखण्यासाठी राज्य सरकारकडून ऑरेंज आणि रेड अलर्ट देण्यात आले आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशात उष्णतेची तीव्रता सर्वाधिक आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिक शहरांमध्ये सिमेंटच्या जंगलामुळे 'अर्बन हीट आयलंड' प्रभाव जाणवत असून तापमान अधिकच वाढत आहे.

शेतकऱ्यांसाठी चिंतेची बाब म्हणजे, जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कडक उन्हामुळे पाणीसाठ्यातही झपाट्याने घट होत असून पुणे, नाशिक सारख्या शहरांमध्ये पाणी कपातीचे संकट ओढवले आहे. कर्नाटकातील कलबुर्गी येथेही ४४ अंश तापमानाची नोंद झाली. तापमानवाढीची नेमकी कारणे म्हणजे जागतिक तापमान वाढीचा परिणाम स्थानिक हवामानावर होत आहे. उत्तर-पश्चिम भारताकडून येणाऱ्या उष्ण आणि कोरड्या वाऱ्यांमुळे विदर्भातील तापमानात प्रचंड वाढ होत आहे. कमी झालेली वनसंपदा हेही एक कारण आहे. विदर्भाची पठारी भौगोलिक रचना सूर्याच्या किरणांना थेट आणि तीव्र बनवते.

भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) अंदाजानुसार आगामी ५ ते ७ दिवस विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात उष्णतेची तीव्र लाट कायम राहणार आहे. मान्सूनचे आगमन होईपर्यंत तापमानात मोठे चढ-उतार पहायला मिळतील. वाढत्या उन्हापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी खबरदारी घ्यावी लागेल. चक्कर येणे, मळमळणे, तीव्र डोकेदुखी, जास्त ताप जाणवत असेल तर तो उष्माघात असू शकतो. अशावेळी त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधणे आवश्यक आहे. स्वतःची काळजी घेणे हाच सध्या उष्णतेपासून वाचण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. पुरेसे पाणी पिणे, हलके व सैल कपडे परिधान करणे,डोके झाकण्यासाठी टोपी किंवा रुमाल वापरणे तसेच थेट सूर्यप्रकाशापासून दूर राहणे आवश्यक आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांनी विशेष काळजी घ्यावी, असा सल्ला देण्यात आला आहे. शेतकरी, मजूर आणि बाहेरील काम करणाऱ्या व्यक्तींनी कामाचे वेळापत्रक सकाळी किंवा सायंकाळी ठेवावे असे प्रशासनाने सुचविले आहे.

दैनंदिनी

# बेशिस्त वाहतुकीमुळे जातोय निष्पापांचा बळी

## बेदरकार,बेफिकीर वाहनचालकांमुळे रस्ते अपघातात वाढ





**“ बेशिस्त वाहतूक हा आपला रस्त्यावरील मूलभूत अधिकार असल्यासारखी परिस्थिती ठाणे, मुंबई तसेच राज्याच्या इतर शहरात कायम असते. त्यामुळे होणाऱ्या रोजच्या अपघातांशी आपल्याला काहीएक देणेघेणे नाही, जोपर्यंत आपल्यातले कोणी अशा अपघातात बळी जात नाहीत किंवा जखमी होत नाहीत तोपर्यंत अशा अपघातांचे गांभीर्य आपल्यापर्यंत पोहचतच नाही.एका वाहनचालकाची किरकोळ वाटणारी छोटीशी चूक त्याच्यासह इतरांच्या जीवाला धोका निर्माण करते, सोबतच अपघातात जे बळी जातात त्यांच्या कुटुंबाचीही आयुष्यभराची फरफट होते. ”**


कोणत्याही अपघातात एकच माणूस बळी जात नाही, त्याच्यासोबत त्याच्या कुटुंबाच्या आनंदाचा, त्याच्या मुलाबाळांच्या भविष्याचा बळी जात असतो. एवढे बळी रोजच्या रोज रस्त्यावर जात असतानाही रस्त्यावरच्या वाहतूक नियमांविषयी आपण वाहनचालक नागरिक म्हणून गंभीर आणि सजग नसतो. कल्याणात झालेल्या भीषण अपघातात ११ जणांचा गेलेला बळी बेशिस्त वाहतुकीचे भीषण उदाहरण म्हणून समोर यावे. वाहतुकीचे नियम हे मोडण्यासाठीच असतात, पाळण्यासाठी नाही, असा एक सर्वव्यापी धोकादायक समज आपल्याकडे प्रचलित झालेला आहे. सिग्नल तोडून पळून जाणे, ही आपल्याकडे भूषणावह बाब असते, वाहतूक पोलिसांना चकवून आपले वाहन कसे पुढे दामटवले याचे किस्से मोठे कर्तृत्त्व गाजवल्यासारखे ऐकले ऐकवले जातात. काळी-पिवळी टॅक्सी, सीक्स किंवा तीन सीटर रिक्षा, सार्वजनिक खासगी वाहनांमध्ये जास्तीचे प्रवासी कोंबून भरण्याला आपलीही प्रवासी म्हणून मूक संमती असते. वाहतुकीचे कायदे ही सर्वात दुर्लक्षित करण्याची सार्वजनिक बाब असल्याचे आपण मान्य केलेलेच असते. घराबाहेर सार्वजनिक जीवनात असताना कित्येकदा आपण सजग नागरिक नसतोच, आपण जबाबदार वाहनचालकही नसतो. ओव्हरटेक करून वाहन पुढे दामटवण्यात आपल्याला जीवघेणे थ्रील वाटत असते.दुचाकीस्वारांना रस्त्यावरच्या वाहतुकीचा कमालीचा धोका असताना एकाच दुचाकीवर दुचाकीस्वार, त्याची पत्नी, एक किंवा दोन लहान मुलेही बसलेली दिसतात. एकाच वेळी रस्त्यावरच्या धोकादायक वेगात केवळ दोन चाकांच्या भरवशावर सामील झाल्याचे आपण रोज पाहतो. हेल्मेट परिधान करताना त्याचा गळ्याकडचा बेल्ट न लावण्यामागे केवळ आणि केवळ वाहतूक पोलिसांना गंडवण्याचा आपला उद्देश असतो, मात्र रस्त्यावरचा वाहतूक पोलीस त्याच्या वेतनासाठी रस्त्यावर ड्युटी करत नसून तो आपल्या सुरक्षेसाठी तिथे तैनात केलेला आहे, याविषयी आपल्याला काहीही सोयरसुतक नसते. हाच प्रकार चारचाकी वाहनातही सीट बेल्ट न लावण्याविषयी अंमलात आणला जातो.ॲम्ब्युलन्स, अग्निशमन दल पोलिसांच्या वाहनासाठी प्रगत देशांमध्ये राखीव लेन रस्त्यावर आखून दिलेल्या असतात, या लेनमध्ये शिरकाव करणे म्हणजे सार्वजनिक सुरक्षा धोक्यात आणल्याचे त्या ठिकाणी मानले जाते.

याउलट आपल्याकडे कायदा मोडणे हे मोठेपणाचे लक्षण मानले जाते.आपल्याकडे रस्त्यांवरील खड्डे म्हणजे अपघाताची सार्वकालीक कारणं ठरलेली आहेत. असे असताना वाहतुकीचे नियम मोडून अपघात ओढवून घेण्याची भीषण हौस आपल्यातील कित्येकांना असू शकते.सार्वजनिक रस्ता हा आपलीच खासगी मालमत्ता असून वाहनासोबतच आपण रस्ताही विकत घेतला आहे, अशा अविर्भावात रस्त्यावर अनेक वाहनचालकांचा वावर असतो. रिक्षा, टॅक्सी किंवा इतर खासगी सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या वाहनचालकांमध्ये वाहतुकीचे नियम मोडण्याची जणू स्पर्धाच लागलेली असते. कुठलाही सिग्नल न देता प्रवासी भरण्यासाठी रस्त्यात अचानक वाहन थांबवणे, बाजूला घेणे, मध्येच प्रवासी उतरवणे आदी वाहतूक कायद्याचे उल्लंघन आपल्याकडे किरकोळ बाब मानली जाते. ते नेहमीच होत असते. दोन वाहनांमधील सुरक्षित अंतराचा संदेश हा केवळ सार्वजनिक वाहनांमागे शोभेच्या सुविचारापुरताच उरलेला असतो. तर खासगी लोखंडी डंपर,मिक्सर, मोठाले कंटेनर, टँकर असे वाहतुकीतले राक्षस रस्त्यावर उतरवणाऱ्या अवजड वाहन चालकांना इतर किरकोळ वाहन चालकांच्या जीवाचे मोल वाटत नाही.या लोखंडी राक्षसांना दुचाकीस्वाराने धडकल्यास किंवा अवजड वाहनाने दुचाकीला ठोकरल्यास दुचाकी चालकाचाच जीव जातो.ही मंडळी रस्त्यावर वाहतुकीबाबत कमालीची बेदरकार बेफिकिर असतात.

रायगड जिल्ह्यात २०२५ या वर्षभरात ६५२ अपघातांची नोंद झाली. ज्यात २५९ जणांचा मृत्यू झाला.तर ५९८ जण जबर जखमी झाले. अशीच परिस्थिती राज्यांच्या इतर जिल्ह्यांमध्येही थोड्याफार फरकाने आहे. वाहतुकीचे नियमन आणि अपघातांची संख्या कमी करण्याची जबाबदारी केवळ वाहतूक पोलिसांवर ढकलून चालणार नाही. रस्त्यावरून वाहने चालवताना आपल्यासोबत इतरांचीही सुरक्षितता लक्षात घ्यायला हवी.तशाच प्रकारे वाहने चालवायला हवी. वाहने ही जीवनाची गती वाढवण्यासाठी आहेत, पण ती गती जीवघेणी ठरू नये. कारण आपण जिवंत असलो तर सर्व काही आहे.

■ शिवाजी चौगुले

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार ता.१७.४.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,पराभवनाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो,चैत्र मासे, कृष्ण पक्षे, अमावस्या तिथी, १७.२३ नंतर वैशाखशुक्ल प्रतिपदा तिथी रेवती नक्षत्र,१२.०३ नंतर अश्विनी नक्षत्र मीन रास,१२.०३ नंतर मेष रास,वैधृति योग.७.२३ नंतर विष्कंभ योग २७,४६ पर्यंत,चतुष्पाद करण, ६.५१ नंतर नागकरण,१७.२३ नंतर किस्तुघ्न करण,२७.४७ पर्यंत, दिनमान १२.२५,सुर्योदय ६.२०,सुर्यास्त १८.४५(कोल्हापूर) राहू काळ १०.३०ते १२,अन्वा,दर्श अमावस्या, व्यतिषंग,पितृदेवकार्य अमावस्या, वज्रेश्वरी यात्रा, नारायण महा.पु.दि. नरसोबावाडी,अमृत १२.०३ पर्यंत १२.०३ पर्यंत पंचक.

**ज्यो:केशव पेटकर महाराज–९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष–** नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत कमी त्रासदायक वातावरण राहील. आर्थिकदृष्ट्या बचत करणे योग्य राहील. मित्र-मैत्रिणींचा सहवास लाभेल.आरोग्य उत्तम राहील.

**वृषभ–** व्यवसायात लाभदायक वातावरण राहील. नोकरदार वर्गाला वरिष्ठांची मर्जी राखण्यात यश मिळेल.आर्थिक परिस्थिती चांगली राहील. राजकीय क्षेत्रात प्रसिद्धी मिळेल.

**मिथुन–** व्यवसायात नफा चांगला मिळेल. नोकरदार वर्गाला नवीन कामाची सुरुवात करता येईल. आर्थिकदृष्ट्या लाभ होईल.नातेवाईकांच्या भेटीगाठी होतील.

**कर्क–** नोकरदार वर्गाला कामात यश मिळेल. आर्थिकदृष्ट्या अनपेक्षित लाभ होईल. राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा होईल.धार्मिक कार्याची आवड राहील.

**सिंह–** आपल्या कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष देऊ नका. आपले काम भले आणि आपण भले हे सूत्र लक्षात ठेवा. जोडीदाराचे मत विचारात घ्या.

**कन्या–** आर्थिकदृष्ट्या खर्च कसे कमी होतील ते पहा. समाजमाध्यमांपासून लांब राहा. घरगुती वातावरण चांगले कसे राहील ते पाहा. आध्यात्मिक गोष्टींत गुंतून राहा.

**तुळ–** व्यवसायात नवीन गुंतवणूक सध्या तरी करू नका. आर्थिक काटकसर करा. मुलांचे लाड करा, पण शिस्त बिघडू देऊ नका. कुटुंबाशी एकनिष्ठ राहा.

**वृश्चिक–** व्यावसायिकदृष्ट्या धावपळ झाली तरी फायद्याचे प्रमाण चांगले राहील. नोकरदार वर्गाला कामात गुंतून राहावे लागेल. नातेवाईकांच्या भेटीगाठी होतील.

**धनु–**नोकरदार वर्गाचे कामाच्या बाबतीत ठाम नेतृत्व राहील. आर्थिकदृष्ट्या परिस्थिती चांगली राहील. नातेवाईकांच्या सुखदुःखात सहभागी व्हाल.

**मकर–**आर्थिक लाभ होईल.समाजसेवेची आवड राहील.कुटुंब पाठीशी राहील.मानसिक समाधान लाभेल.आरोग्य साथ देईल.व्यवसायात नवीन गोष्टींची सुरुवात होईल.

**कुंभ–**आर्थिकदृष्ट्या वायफळ खर्च टाळा.जोडीदाराकडून योग्य प्रतिसाद मिळेल. कुटुंबातील हेवे-दावे दूर होतील. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील.

**मीन–**राजकीय क्षेत्रात चढउतार राहील. मित्र-मैत्रिणींशी मनमोकळेपणाने बोलल्यामुळे हलके वाटेल. संततीचे कौतुक कराल. निर्णय घेताना जोडीदाराचा सल्ला घ्या.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### स्वतःचे आरोप योग्य, इतरांचे मात्र राजकीय

राजकारणात आरोप प्रत्यारोप नवीन नाहीत. मात्र, जेव्हा एखादा नेता स्वतःवर आलेल्या आरोपांना 'राजकीय' म्हणून झटकून टाकतो, तेव्हा प्रश्न केवळ त्या आरोपांचा राहत नाही, तर तो लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा बनतो. अलीकडेच दीपक केसरकर यांनी सुषमा अंधारे यांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना 'हे आरोप राजकीय आहेत, त्यामुळे उत्तर देण्यास मी बांधील नाही,' असा बचावात्मक पवित्रा घेतला. राजकारणात आरोप हे अनेकदा राजकीय हेतूनेच केले जातात, हे खरे. पण त्याच वेळी, आरोपांमध्ये तथ्य असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच, कोणत्याही जबाबदार लोकप्रतिनिधीकडून अपेक्षा असते ती स्पष्ट आणि ठोस उत्तरांची. 'राजकीय' हा शिक्का मारून आरोपांकडे दुर्लक्ष करणे हे योग्य नाही. यातील विसंगती आणखी ठळक होते, जेव्हा हेच नेते इतरांवर सातत्याने टीका करताना दिसतात. मात्र स्वतःवर आरोप झाले, की तेच अचानक 'राजकीय'ठरतात, ही भूमिका प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. आज प्रश्न असा नाही की आरोप कोणी केले आणि कोणावर केले. प्रश्न हा आहे, त्या आरोपांची सत्यता तपासली जाणार का? आणि संबंधित व्यक्ती त्याबाबत स्पष्ट भूमिका घेणार का? लोकशाहीत उत्तर देणे ही बंधनकारक जबाबदारी आहे; ती टाळण्याचा पर्याय नाही. म्हणूनच आरोपांना 'राजकीय' म्हणून नाकारण्याऐवजी, त्यावर सुस्पष्ट उत्तर देणे आणि आवश्यक असल्यास चौकशीला सामोरे जाणे, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.अन्यथा, आरोप प्रत्यारोपांचा हा खेळ सुरूच राहील.

■ दीपक गुंडये

### ...अन्यथा इअरफोनची जागा श्रवणयंत्र घेईल

आत्ताच्या जीवनशैलीत काम, प्रवास, मनोरंजन आणि गेमिंगसाठी तासन्तास इअरफोन वापरण्याची सवय वाढली आहे; नव्हे, इअरफोन आपली गरजच झाली आहे.सतत मोठ्या आवाजाच्या संपर्कात राहिल्याने कानातील नाजूक पेशींवर नकळत परिणाम होत आहे. त्याचा आपल्या श्रवणशक्तीवर गंभीर परिणाम होत असून, वेळीच सावधगिरी न घेतल्यास भविष्यात मोठा आरोग्य धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



विशेषतः तरुणांमध्ये याचा परिणाम दिसून येत आहे. डिजिटल युगात इअरफोन आणि हेडफोनचा वाढता वापर तरुणांच्या श्रवणशक्तीसाठी धोकादायक ठरत आहे. २० ते ३० वयोगटातील १० पैकी ६ तरुणांना कमी ऐकू येण्याच्या तक्रारी जाणवत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मोठ्या आवाजात आणि दीर्घकाळ इअरफोन वापरण्यामुळे ही समस्या झपाट्याने वाढत आहे. २०-३० वयोगटातील सुमारे ६५ टक्के तरुणांमध्ये श्रवणक्षमतेशी संबंधित लक्षणे दिसून आली आहेत. १० पैकी ६ तरुण कानात आवाज येणे (टिनिटस), स्पष्ट ऐकू न येणे किंवा वारंवार आवाज वाढवण्याची गरज भासणे अशा तक्रारी नोंदवतात.

ही स्थिती दीर्घकाळ राहिल्यास कायमस्वरूपी श्रवणदोष होऊ शकतो. शहरातील वाढता गोंगाटही या समस्येला काही प्रमाणात कारणीभूत ठरत आहे. ट्रॅफिक, बांधकामे आणि सार्वजनिक ठिकाणांवरील आवाजामुळे अनेकजण इअरफोनचा आवाज वाढवतात, ज्याचा थेट परिणाम कानांवर होतो. तसेच बाजारात नॉईज कॅन्सलेशन असलेले इअरफोन्स उपलब्ध असल्याने त्यांचा वापर करताना अनेक अपघातही होत आहेत. त्यामुळे तरुणांनी आत्ताच काळजी घेतली पाहिजे; अन्यथा इअरफोनची जागा श्रवणयंत्र कधी घेईल हे सांगता येणार नाही.

■ दत्तप्रसाद शिरोडकर

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१.
टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# निपाणीचा पारा ३८ अंशांवर गेल्याने नागरिक त्रस्त

## भरदुपारी रस्ते सुनसान; थंड पेयांना मागणी वाढली

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

**निपाणी परिसरात गेल्या आठवडाभरापासून उष्णतेची मोठी लाट आल्याचे चित्र दिसून येत आहे. ३६ पासून बुधवारी ३८ अंशांपर्यंत उष्णतेचा पारा वाढल्याचे दिसत होते. त्यामुळे १२ नंतर रस्त्यावरील वर्दळ अत्यंत तुरळक वाटत होती. उष्णतेच्या तीव्र झळामुळे निपाणीकर त्रस्त झाल्याचे दिसून येते.**

उष्णतेची लाट वाढल्याने थंड पदार्थांची मागणी वाढली आहे. त्याचबरोबर थंडीचा अनुभवी देणाऱ्या कलींगड आणि इतर फळांची मागणी वाढली आहे. विविध कंपनीच्या थंड पेयाबरोबर सरबत, ताक, लस्सी, कोकम, कैरीपणा अशा अनेक पेयांना मागणी वाढली आहे. त्याचबरोबर थंड पाण्यासाठी लागणाऱ्या माठांनाही मागणी वाढली आहे. त्यामुळे माठांचे दरही भरमसाठ वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.



कर्नाटक राज्यातील अनेक जिल्ह्यात उन्हाच्या झळांनी त्रस्त असून पुढच्या पंधरवड्यात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. आठ जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा अंदाज कर्नाटक हवामान खात्याने वर्तविला आहे. तसेच राज्याच्या उत्तर व दक्षिण भागातील अनेक जिल्ह्यांमध्ये पुढील आठवड्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. पुढील पाच दिवसात उत्तर व दक्षिण जिल्ह्यांमध्ये तापमानात लक्षणीय वाढ होण्याची दाट शक्यता आहे. निपाणीच्या तापमानानेही ३८ चा आकडा पार केला असून पुढील आठवड्यात ते ४० पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

बुधवार,ता.१५ ते १८ एप्रिलदरम्यान बीदर, गुलबर्गा, यादगिरी, रायचूर, विजापूर, बागलकोट, कोप्पळ, गदग जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.तर बंगळूरमध्ये पुढील पाच दिवसांत कमाल तापमान ३७ ते ३८ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले आहे. मंगळवारी बंगळूरमध्ये कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस, गुलबर्गात ४२ अंश सेल्सिअस, रायचूरमध्ये ४० अंश सेल्सिअस, बिदरमध्ये ३९ अंश सेल्सिअस, विजापूरमध्ये ४० अंश सेल्सिअस, बागलकोटमध्ये ३८ अंश सेल्सिअस व कोप्पळमध्ये ४० अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे.

### कोल्ड्रींक्स दुकानदारांकडून लुटीचा प्रकार....

**निपाणी शहर परिसरात उष्णतेची लाट वाढत असताना थंड पेयाची मागणी वाढत चालली आहे. दरम्यान याचा गैरफायदा कोल्ड्रींक्स दुकानदार घेत आहेत. ८७ रूपये दरांची थंड पेयाची बाटली तब्बल ११० रूपयांना विकत आहेत. तब्बल २३ रूपये सदर पेय थंड करण्याचा दर आकारण्याचा प्रकार घडत आहे. त्यामुळे गरमीचा गरमा गरम फायदा घेण्याचा प्रकार सर्वसामान्यांना त्रासदायक असून अशा व्यापाऱ्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.**

## उन्हाच्या तडाख्याने लिंबू दरात वाढ

बेळगाव,ता.१६-

**बाजारपेठेत भाज्यांचे दर कमी झाले असले तरी लिंबूने मात्र दराचा उच्चांक गाठला आहे. काही दिवसापूर्वी रुपयाला दोन मिळणारा लिंबू आता चार ते सात रुपयाला एक याप्रमाणे विक्री होत आहे.**

दिवसेंदिवस उष्णता वाढत असल्याने नागरिक गारव्यासाठी लिंबू सरबत, लिंबू पाणी तसेच विविध गावांच्या असलेल्या लक्ष्मीयात्रांमुळे लिंबूचे दर वाढले असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या बेळगावचा पारा ३८ अशांपर्यंत पोहोचला आहे. अशा उन्हाच्या तडाख्यात बेळगावकर थंड पेयांकडे आकर्षित झाले आहेत.यामध्ये खासकरून लिंबूपासून तयार होणारे पदार्थ अधिक सेवन केले जात आहेत. अशावेळी लिंबू शरीराला ताजेतवाने ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे गारव्यासाठी लिंबूपाणी, लिंबू सरबत यांचे सेवन केले जाते. सध्या बाजारात लिंबूची मागणी वाढली आहे.

## निपाणीत डॉ.आंबेडकर विद्युत दीपस्तंभाचे अनावरण

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

**येथील आंबेडकर नगरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचा समावेश असलेल्या विद्युत दीपस्तंभाचे उद्घाटन करण्यात आले. टाऊन प्लॅनिंग कमिटी अध्यक्ष निकु पाटील यांनी सदर दीपस्तंभाचे उद्घाटन केले.**



राहुल मुगळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या दीपस्तंभावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौतम बुद्ध यांच्यासह महापुरुषांची प्रतिमा साकारली आहे. डॉ.आंबेडकर यांच्यासह महापुरुषांचे विचार दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक असल्याचे निकु पाटील यांनी सांगितले. यावेळी प्रवीण हेगडे, संभाजी मुगळे, दीपक इंगळे, राहुल मळगे, सचिन कांबळे, अब्दुल मकानदार, शुमम चौगुले, प्रज्वल कांबळे, आनंदा लोकरे, चेतन माने, प्रतीक मुगळे उपस्थित होते.

## रणवीर गुरवच्या किर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध

कागल,ता.१६(प्रतिनिधी)

**संतांच्या विचारधारेतून नामस्मरण हाच खरा आधार आहे.नामस्मरणामुळे मनाची शुद्धता होत असते. ईश्वराच्या प्राप्तीसाठी नामस्मरण हाच खरा सोपा मार्ग आहे, असे मौलीक विचार बाल कीर्तनकार हभप रणवीर गुरव यांनी उपस्थित श्रोत्यांना दिले.**



लिंगनूर दुमाला(ता. कागल) येथील हनुमान मंदिरच्या प्रांगणात कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. संतांच्या विचारप्रणालीतून आणि केलेल्या समाजप्रबोधनातून भक्तीरसातून श्रोते ओलेचिंब झाले. बाल कीर्तनकार यांचे वय १४ वर्षाचे आहे .लिंगनूर दुमाला येथील भजनी मंडळाने टाळकरी म्हणून उत्कृष्ट साथ दिली. व्यासपीठ चालक बळीराम तांबेकर,चोपदार प्रशांत संकपाळ, मृदुंगसाथ अथर्व आवटे,तसेच गावातील चंद्रकांत तोडकर,आनंदा पोकले, अर्जुन तोडकर,विठ्ठल कुंभार,शिवाजी पाटील,सतीश माने,अशोक संकपाळ यांच्यासह गावातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महापुरुषांची जयंती त्यांच्या आचार-विचारांनुसार साजरी करा-बिरादार

बेडकिहाळ,ता.१६(वार्ताहर)-

**छ.शिवाजी महाराज व म.बसवेश्वर यांच्या जयंती उत्सवानिमित्त विविध युवक मंडळांच्यावतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मात्र, या थोर महापुरुषांनी धर्म, संस्कृती व संस्कारांच्या रक्षणासाठी केलेल्या कार्याचा आदर्श घेऊन त्यांच्या आचार-विचारांची जोपासना करणे हे युवकांचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन सदलगा विभागाचे पोलीस उपनिरीक्षक शिवकुमार बिरादार यांनी केले. शिवाजी चौकात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते.**

बैठकीस दत्तकुमार पाटील, शिवानंद बीजले, अजित पाटील, दादासाहेब पाटील आदी उपस्थित होते. अजित पाटील यांनी स्वागत केले.सहाय्यक हवालदार पी. एस. लम्मानी यांनीही मार्गदर्शन केले.याप्रसंगी सागर केसरकर, अनिल बाबर, सुभाष पाटील, सागर पाटील, शशिकांत पवार, राजू कुलकर्णी,कुमार संकेश्वरे, दिलीप पाटील, भूषण जठार, प्रशांत गडकरी आदी उपस्थित होते. संदीप जठार यांनी आभार मानले.

## पट्टणकोडोलीत ठिकठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

पट्टणकोडोली,ता.१६(प्रतिनिधी)-

**हातकणंगले तालुक्यातील पट्टणकोडोली येथे ठिकठिकाणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.**

येथील श्री बिरदेव एज्युकेशन सोसायटी संचलित,अनंत विद्यामंदिर व न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य जयवंत पाटील, मेघा नाईक, पुष्पलता दिवटणकर, स्नेहल कीर्तीकर, छाया सुरवशी यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी कोल्हापूर येथील महावीर महाविद्यालयाचे सौरभ पाटणकर यांचे व्याख्यान झाले. कागल पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत शिवसेना शिंदे गटातर्फे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.



**पट्टणकोडोली येथील न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रतिमापूजनप्रसंगी संस्थेचे शैक्षणिक सल्लागार जितेंद्र वसगडेकर शेजारी शिक्षकवृंद.**

यावेळी शिवानंद पणदे, अभिजीत भालबर, निलेश चव्हाण, इब्राहिम मुल्ला, अनिकेत पवार, युवराज कुंभार, अरमान ताशिलदार, सचिन कांबळे,ऋषिकेश गायकवाड, विनोद कांबळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

तिरुपती बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये संस्थेचे शैक्षणिक सल्लागार जितेंद्र वसगडेकर यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक उदय बिरांजे, पर्यवेक्षिका संगीता भातमारे यांच्यासह शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.कृती समितीतर्फे डॉ.आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. संजीवन ब्लड बँक व जननी हॉस्पिटल तसेच डॉ.नंदकुमार बनगे यांच्यावतीने मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये हुपरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक सत्यवान हाके यांच्या हस्ते निलध्वजारोहण करण्यात आले. तसेच जुन्या बौद्ध मंदिरामध्ये यशवंत कांबळे यांच्या हस्ते निलध्वजारोहण झाले. प्रभारी सरपंच विठ्ठल मोठे व मान्यवरांच्या हस्ते मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. गावातील प्रमुख मार्गावरुन सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक सुमारे चार तास चालली होती.

याशिवाय पट्टणकोडोली ग्रामपंचायत कार्यालय, चर्मकार समाज यासह अन्य ठिकाणीही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करुन अभिवादन केले.

## निपाणीत शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

**येथील मध्यवर्ती शिवाजी तरुण मंडळातर्फे शिवजयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना शिवप्रेमी, युवक मंडळांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाने केले आहे.**

रविवार ता.१९ रोजी सकाळी ८ वा. शिवजन्मोत्सव, अभिषेक व पूजा, पाळणा पूजन, जिजाऊ महिला मंडळ, निपाणी व शिवज्योतींचे स्वागत करण्यात येणार आहे.ता.२० रोजी दुपारी ३ वा. भव्य मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी आयोजित सजीव देखावा स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे २५००१ रुपये, १५००१, ११००१ रुपये बक्षीस देण्यात येणार आहे.ता.२४ रोजी सायं. ७ वा. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे स्वरस्वामी प्रस्तुत सलाम महाराष्ट्र सुवर्ण संस्कृतीचा लोकोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ता.२६ रोजी सायंकाळी ७ वा. प्रा.नितीन बानुगडे-पाटील यांचे संभाजी महाराजांच्या जीवनावर व्याख्यान होणार आहे.निपाणी परिसरातील शिवप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा,असे आवाहन मध्यवर्ती शिवाजी तरुण मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब जासूद, उपाध्यक्ष संजय माने व संचालक मंडळाने केले आहे.

## मलकारसिद्ध-महालक्ष्मी यात्रा बेडकिहाळात संपन्न

बेडकिहाळ,ता.१६(वार्ताहर)-

**बेडकिहाळ (ता.निपाणी) येथील आरगे धनगर समाजाच्या वतीने श्री मलकारसिद्ध व श्री महालक्ष्मी वार्षिक यात्रा महोत्सव पार पडला. मुख्य दिवशी कल्याण सिद्धेश्वर मंदिराकडे सुवासिनींच्या आंबील कलशाने समाज बांधव रवाना झाले.**



**मलकारसिद्ध महालक्ष्मी यात्रेनिमित्त काढण्यात आलेली बिरदेव पालखी मिरवणूक.**

माणकापूर येथील ग्रामदैवत श्री मलकारसिद्ध उत्सव मूर्ती व देवाचे अश्व कृष्णा तसेच आरग येथील जागृत दैवत श्री महालक्ष्मी देवीची उत्सव मूर्ती व पुजारी यांचे आगमन झाले.बेडकीहाळ येथील श्री विठ्ठल बिरदेव पालखी आगमन व वालग जमण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर यावेळी धनगरी ढोल वादन, हेडाम खेळण्याचा कार्यक्रम पार पडला. सायंकाळी ६ वाजता ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिरातून ते विठ्ठल मंदिरापर्यंत ढोलाच्या गजरात भंडाराच्या उधळणीत मलकारसिद्ध - महालक्ष्मी उत्सव मूर्ती व अश्व, तसेच विठ्ठल बिरदेवाची पालखी मिरवणूक गावातील मुख्य मार्गावरून काढण्यात आली.

रात्री ९ वाजता मिरवणूक मंडपात आल्यानंतर पूजा सामूहिक आरती व देव कार्य मानपान कार्यक्रम पार पडला. त्यानंतर महाप्रसादाचा लाभ परिसरातील हजारो भाविकांनी घेतला. रात्री भव्य आंतरराज्य धनगरी ढोल वादन स्पर्धा झाल्या.कर तोडून यात्रेची सांगता करण्यात आली.

## कोगनोळीत ठिकठिकाणी डॉ.आंबेडकर जयंती साजरी

कोगनोळी,ता.१६(प्रतिनिधी)-

**निपाणी तालुक्यातील कोगनोळी येथे ठिकठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली.**



**डॉ.आंबेडकर यांना अभिवादन करताना फौजदार शिवराज नाईकवाडी, फौजदार अशोक शिंदे व इतर प्रमुख मान्यवर.**

येथील भिमनगरामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध व अन्य महामानवांच्या प्रतिमेचे पूजन निपाणी ग्रामीण पोलीस ठाण्याचे फौजदार शिवराज नाईकवाडी, प्रशिक्षणार्थ फौजदार अशोक शिंदे, सहाय्यक फौजदार विजय पाटील, हावलदार प्रकाश तळवार, हावलदार नागेश कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रारंभी नरजित विटे यांनी त्रिशरण पंचशील व बुद्ध वंदनेचे पठण केले. हालसिद्धनाथ नगरामध्ये भिमगर्जना तरुण मंडळातर्फे डॉ.आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हापंचायत उपाध्यक्ष पंकज पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले तर बी.आर.ग्रुप येथे डॉ.आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले.याशिवाय कोगनोळी ग्रामपंचायत कार्यालय, कोगनोळी हायस्कूल कोगनोळी, सरकारी उच्च प्राथमिक मुला-मुलींची शाळा, इंटरनॅशनल पब्लिक स्कूल यासह अन्य ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करुन अभिवादन केले.

आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून मनिषा कुरणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानातून त्यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.सायंकाळी ७ वाजता हालसिद्धनाथ नगर येथे कोगनोळी बीट हावलदार प्रकाश तळवार यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. ही मिरवणूक गावातील प्रमुख मार्गावरुन काढण्यात आली. आंबेडकरांच्या जयघोषाने सारा परिसर दुमदुमून गेला होता. या मिरवणुकीत हजारो भिमसैनिक सहभागी झाले होते.



निपाणी: निपाणीकर राजवाड्यामध्ये देव बोलविणे कार्यक्रमप्रसंगी श्रीमंत दादाराजे निपाणीकर व इतर.

## निपाणकर राजवाड्यामध्ये देव बोलविणे कार्यक्रम संपन्न

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

**श्रीमंत सिद्धोजीराजे निपाणकर यांच्या राजवाड्यामध्ये चैत्र मासानिमित्त देव बोलवायचा कार्यक्रम संपन्न झाला.राजवाड्यामध्ये सर्व मानकरी एकत्र आले. रेणुका मंदिरातील जग, जोतिबाची सासनकाठी, सासणे गल्ली येथील श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूरची महादेवाची काठी, पालखी व तसेच श्रीशैलला गेलेली कावड याचे वाद्यांच्या गजरात राजवाड्यामध्ये आगमन झाले.**

यावेळी सर्व देवतांचे श्रीमंत दादाराजे निपाणकर यांच्या हस्ते विधीपूर्वक पूजा करून महाप्रसादाचे वाटप झाले. सायंकाळी रेणुका मातेचा जग रवाना झाल्यानंतर रात्री उशिरा जोतिबाचा चौक मांडून गोंधळ घालत कार्यक्रमाची सांगता केली.याप्रसंगी श्रीमंत राजमाता राजलक्ष्मीराजे, श्रीमंत सुकीर्तीराजें, श्रीमंत राजेश्वरीराजे, श्रीमंत सम्राज्यलक्ष्मी, राजे राजकुमारी ऋतंबराराजे, श्रीमंत विजयराजे, श्रीमंत राजेशराजे, युवराज श्रीमंत सिद्धोजीराजे निपाणकर, विश्वासराव पाटील, बाळासाहेब पवार, मोहन कमते, सागर कमते, मच्छू गमते, धर्मराज कमते,संजीव कमते, पिंटू कमते, गजानन वशीदार, बाळासाहेब वशीदार, विजयराव सासणे, हेमंत सासणे, जयवंत सासणे , स्वप्निल सासणे, गजेंद्र सासणे, हेमंत सासणे, सुनील सासणे, ओमकार सासणे, बाळू सासणे, संदीप सासणे, सुमन सासणे, संपूर्ण सासणे, पार्वती सासणे, स्नेहल सासणे, स्वाती सासणे, ललिता माने, रेणुका हेगडे, नितीन पाटील, युवराज पाटील, शैलेश स्वामी, अशोक हिरेमठ व इतर मान्यवर उपस्थित होते.

## वाळकीत २१ एप्रिलपासून मरगुबाई देवीची यात्रा

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

**वाळकी (ता.चिकोडी) येथील श्री मरगुबाई देवीची यात्रा मंगळवार ता.२१ ते २२ एप्रिल अखेर साजरी होणार असून या यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

यामध्ये मंगळवार ता.२१ रोजी सकाळी ८ वा. महाभिषेक त्यानंतर सकाळी ९ पासून नैवेद्य,आंबील व ओटी भरण्याचा कार्यक्रम होणार असून रात्री करमणुकीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.दरम्यान ता.२२ रोजी यात्रेनिमित्त विविध शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये जोड बैल शर्यतीसाठी अनुक्रमे ३५,५५५, २५,५५५, १५,५५५, एक बैल एक घोडा शर्यती, घोडा गाडी, बसून घोडा शर्यती, हातात धरून बैल पळवणे, सायकल पळवणे आदी शर्यती होणार असून त्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत, तरी भाविकांनी याचा लाभ यावा,असे आवाहन मंदिर कमिटीने केले आहे.


# शक्तीपीठ महामार्गाचा अट्टाहास बंद करा

## आम.सतेज पाटील यांचा शक्तीपीठ विरोधी कृती समितीच्या बैठकीत सूर

आजरा,ता.१६(प्रतिनिधी)-

**गरज नसताना शक्तीपीठ महामार्ग करू नका. याबाबत अट्टाहास धरू नये. यामध्ये शेतीच्या जमिनी जाणार आहेत. शेतकरी उद्ध्वस्त होणार आहे. हा महामार्ग रद्द करावा.यातून कोणाचा स्वाभिमान दुखावण्याची गरज नाही.**

यापेक्षा लोकहिताची कामे हाती घ्या, असे विनंतीपूर्वक आवाहन काँग्रेसचे गटनेते व आम.सतेज पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना केले.येथील मृत्यूंजयकार शिवाजीराव सावंत स्मृती दालनात शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्यावतीने शेतकऱ्यांचा मेळावा झाला. यावेळी आमदार पाटील बोलत होते. स्वाभिमानी संघटनेचे नेते व माजी खासदार राजू शेट्टी, माजी नामदार राजेश पाटील, गोकुळच्या संचालिका श्रीमती अंजनाताई रेडेकर, मुकुंदराव देसाई, सुधीर देसाई, राजेंद्र गड्यान्नावर, प्रा. सुनिल शिंत्रे, चंदगड पंचायत समिती सभापती विलास नाईक, अभिषेक शिंपी, अशोक तर्डेकर, संजय सावंत, गिरीष फोंडे प्रमुख उपस्थित होते.



**शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्यावतीने आयोजित शेतकऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना आम.सतेज पाटील समोर उपस्थित तालुक्यातील शेतकरी.**

निमंत्रक संपत देसाई यांनी स्वागत केले. आम.सतेज पाटील म्हणाले, गरज नसताना हा महामार्ग केला जात आहे. याला सुमारे १ लाख कोटी खर्च येणार आहे. याचा डीआरपी देखील झालेला नाही. हेच पैसे राज्यातील ४२ हजार गावांमध्ये रस्ते, गटर्स व अन्य विकासकामांसाठी खर्च केले तर गावांचा विकास होईल. माजी खास.राजू शेट्टी म्हणाले, शक्तीपीठाची मागणी अव्यवहार्य आहे. यामुळे काही मंडळीना विकास होणार असे वाटते त्यांनी भ्रमात राहू नये. या रस्त्याच्या उभारणीत भराव टाकला जाणार असून महापुराचा धोका आहे. एक्सप्रेस हायवे असल्याने येथे एन्ट्री नाही. रोजगार निर्माण होण्याचा प्रश्न नाही. या महामार्गाची किंमत १ लाख कोटी झाली. राष्ट्रीय महामार्ग व शक्तीपीठ महामार्ग याच्या किंमतीत मोठी तफावत असून यातून ठेकेदारांची घरे भरणार असे वाटते.

प्रा. शिंत्रे म्हणाले, आंदोलनाला शिवसेना उबाठाचा पाठिंबा आहे. माजी आमदार राजेश पाटील, राजेंद्र गड्यान्नावर, मुकुंदराव देसाई, तानाजी देसाई, प्रा. सुनिल शिंत्रे, संजय तर्डेकर, गिरीष फोंडे, सम्राट मोरे, सभापती विलास नाईक यांची भाषणे झाली.यावेळी विठ्ठलराव देसाई, युवराज पोवार, राजू होलम, डी.ए.पाटील, प्रकाश मोरुस्कर, डॉ.धनाजी राणे, संजय देसाई, युवराज जाधव, निवृत्ती कांबळे, हरिभाऊ कांबळे, संजयभाऊ सावंत, दिनेश कांबळे, सुजय पाटील,सागर नाईक, रवी तळेवाडीकर, आनंदा कुंभार, रवि भाटले, सुभाष देसाई, प्रकाश मोरुस्कर, यांच्यासह तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

### आम.शिवाजी पाटील यांच्यावर जोरदार टीका...

यावेळी आम.शिवाजीराव पाटील यांच्यावर वक्त्यांनी जोरदार टीका केली. भांडवलदारांचे बटीक असणाऱ्या आमदारांना रोखण्याची गरज असल्याचेही सांगितले.

## उमेश शिरोळे यांचे निधन



निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

जत्राट (ता.निपाणी) येथील प्रतिष्ठित शेतकरी उमेश महादेव शिरोळे (वय ५१) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, मुलगा, भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**दातार मळा १ ली गल्ली,** छ. संभाजी महाराज चौक, डी-मार्ट जवळ, ६०० स्क्वे. फूट (१५X ४० फूट) जागेतील घर विकणे आहे. संपर्क – ९४२२६२९०००

**तीन बत्ती चार रस्ता येथे** १६ मागाचे कौलारू शेड विकणे आहे. कलेक्टर एनए १७०० स्क्वे. फूट. संपर्क-९८८१४२८८२५

**चालू स्थितीतील** नवीन शेवया मशिन विकणे आहे. संपर्क-९६३२५५३४१२, ९३५९४३७४५८

**३० गुंठे शेतजमीन** (बागायत) विकणे आहे. ता. शिरोळ गाव शेडशाळ अपेक्षित किंमत १४ लाख. संपर्क-९७६७९१०२४३

**विकणे आहे.** २०X६४ जागेमध्ये पूर्ण आरसीसी बांधकाम ८ खोल्या सर्व सोयीनियुक्त विक्रमनगर, इचलकरंजी. फोन-९८२२९६३०९४, ८८३०७६९२८४

**माणकापूर गावात** लाईट, पाण्याची सोय असलेला ६५० व १००० स्क्वे. फूटाचे एनए प्लॉट विकणे आहेत. दर-७५० रू. स्क्वे. फूट. संपर्क-९३७०५८१००८, ९८९०९७२१७८

**फर्निचर विकणे आहे.** टेबल, केबिन, कॉम्प्युटर टेबल. संपर्क-उत्तम यादव-९९२२३७५३१४

**एनए प्लॉट विकणे**-कलेक्टर व तहसील कबनूरमध्ये शाहुनगर, गणेशमंदिरमागे हॉटेल पॅराडाईजजवळ व फॅक्टरी शेड रोडटच सर्वसोयीसह. संपर्क-८१४९९६५६९९, ९८९०२७४१७६

**अॅक्टीव्हा अॅक्सीस** विकत पाहिजे. होंडा अॅक्टीव्हा किंवा सुझुकी अॅक्सीस मॉडेल २०१८ ते २०२१ पर्यंत गुडकंडिशन कमी रनिंग गाडी पाहिजे. संपर्क-७४९९४५४६९०

**कबनूर मध्ये रूई रोड,** लक्ष्मी मंदिर लगतच, कांचन इंगवले रेसिडेन्सीमध्ये प्रांत ऑर्डर असलेले १२००, १४००, २४०० स्क्वे. फूटचे प्लॉटस् विकणे. संपर्क-९८९०९०४७५३, ८८३००२०१४५

**६ लाख गुंठ्याने** १ गुंठ्यांचे ६ प्लॉट एनए विकणे आहे. फक्त गरजूंनी कॉल करावे. संपर्क-९५२९१११२१४

**३ नग चायना रॅपियर** जेकार्ड १४०८ हुकच्या साडी मशिन चालू कंडिशनमध्ये सर्व साहित्यासह विकणे आहे. मो. ९१५८९९७१७७

**अर्जंट जुने कौलारू घर विकणे आहे.** १७०० स्क्वे. फूट साईनगर गल्ली नं.१, महावीर सोसा. जवळ, कबनूर, इचलकरंजी. ८४२११७८८२५

**१ एकर जागा** विकणे आहे. शाहूनगर, चंदूर. संपर्क-९९२२७७२१८९

**विकणे आहे.** फोर निडल मशिन, इंटरलॉक मशिन, जॅक मॉडेल-C4.5, ओव्हरलॉक मशिन काचेचे कौंटर, कपाटे/रॅक संपर्क-९८२२२८८७२२, ७४१०५२६१७४

**हातकणंगले नगर पंचायत** हद्दीतील रामलिंग रोडलगत असलेला ३ गुंठे बिगर शेती प्लॉट, तार कंपौंडसह त्वरीत विकणे आहे. संपर्क-९९२२२०८९९०

**विकणे आहे**-कुरूंदवाड-शिरढोण रोडटच २२ गुंठे जमीन विकणे आहे. संपर्क- ९६७३६३९१७५.

**सर्व सोयीनीयुक्त** असलेली ३ मजली इमारतसह १ बीएचके फ्लॅटसहित विकणे आहे. संपर्क-७०५७८७७५०९.

**जुने व नवीन पॉवरलूम** घेऊ व देऊ, तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क-८३१७२९१००८

## * कर्ज विषयक *

**असेसमेंट उतारा व** घरफाळा पावतीवर तारण कर्ज किंवा होमलोन करून मिळेल. पत्ता-रजिस्टर ऑफिससमोर, गाळा नं. ८, संपर्क- ९१४५७५३८१०

**मोकळ्या जागेवर** किंवा जागा घेवून बांधकाम करण्यासाठी कर्ज मिळेल. पत्ता- रजिस्टर ऑफिससमोर, गाळा नं.८. संपर्क-९१४५७५३८१०

## * नोकरी विषयक *

**CNC/VMC-** ऑपरेटर (१०वी, १२ वी Fresher), सुपरवायझर-२, हेल्पर-५, क्वॉलिटी इन्स्पेक्टर-२, मशिन मोल्डर-८, ड्रायव्हर-१, संपर्क-८४१२९४३२१५, ९०२२७६१२७७

**आरोही हेल्थ क्लबमध्ये** स्वीमिंग ट्रेनर पाहिजे. मो.९५१८३५२०९२, ९८६०२२२३३०

**पेट्रोल पंपावर पेट्रोल** व डिझेल सोडणेकरीता मुलांची/कामगारांची आवश्यकता आहे. संपर्क-जे.बी. पेट्रोलिंक, शहापूर. ७३५३१११७७७

**पाहिजेत.** मेडिकल (औषध दुकान) मध्ये काम करणेसाठी शिकाऊ व अनुभवी मुलांची/मुलींची नेमणूक करणेची आहे. संपर्क-९८५८७१११७

**ब्रॅन्डेड मेन्सवेअर शोरूममध्ये** अनुभवी सेल्सगर्ल पाहिजे. आकर्षक पगार+कमिशन मिळेल. संपर्क-९६११८९५९८८

**Required-** Data Entry Operator (F.M) Experience-1 year, B.com-Jr. Accoutant (M/F) Experience-3, B.Com, M.Com, GST Reconciliation. Contact-7090969802, Ichalkaranji.

**पाहिजे.** कायझन व्हील्स या नामांकित शोरूमकरिता रिसेप्शन-१ (लेडीज) टेलीकॉलर-१ (लेडीज) साफसफाई कामगार (लेडीज/जेंटस) अनुभवींना प्राधान्य. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क-८९७५२८०२०२

**साफसफाईसाठी** तसेच घरी जेवण बनविण्यासाठी महिला कामगार हवी आहे. शिवमंदिरजवळ, सांगली नाका, इचलकरंजी. संपर्क-८९७५२८०२०२

**माल चेकिंग,** पॅकिंग आणि माल काढण्यासाठी लेडीज कामगार पाहिजे. लिहता-वाचता येणे गरजेचे आहे. पत्ता. डॉ. आंबेडकर पुतळाजवळ, स्टेशन रोड, इचल. ९३५६७८५५०७

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** पार्वती इंडिस्ट्रिज इस्टेट, यड्राव-१२ तास. संपर्क-८७९९९५००३३, ८७६७२३३१३४

**कामगार पाहिजे.** शिटमेटल मिस्त्री- ४, $Co_2$ वेल्डर-४, हेल्पर-४. संपर्क-७७५८००१३३२, ९९७०३७२८७३

**पाहिजेत.** रिसेप्शनिस्ट ओटी असिस्टंट, मेडिकल ऑफिसर, (नाईट ड्युटीसाठी) संपर्क-आयोध्या हॉस्पिटल, इचलकरंजी. फोन-९७६६३४०९११, ९९२२३७५३१४

**एअरजेट कारखान्यामध्ये** सायझिंग खरड वायडिंग करणेसाठी कामगार पाहिजे. (स्त्री/पुरूष) छाजेड इंडस्ट्रिज, शाहुनगर, गल्ली नं.११, चंदूर. संपर्क-७७०९०८५५२०

**ऑनलाईन फॉर्म** भरणेकरीता लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. पत्ता- एएससी कॉलेजसमोर, श्री महालक्ष्मी नेट कॅफे. संपर्क-८८५५८९२२२३

**CNC/VMC-** ऑपरेटर (१०वी, १२ वी Fresher), सुपरवायझर-२, हेल्पर-५, क्वॉलिटी इन्स्पेक्टर-२, मशिन मोल्डर-८, ड्रायव्हर-१, संपर्क-८४१२९४३२१५, ९०२२७६१२७७

**वॉचमन पाहिजे.** १२ तास ड्युटी. पत्ता- खंजिरे इंडस्ट्रियल इस्टेट, शहापूर. संपर्क-९१५६३११०००

**इंजिनिअरींग वर्कशॉपमध्ये** रेटरोफिट सीएनसी मशिनसाठी ऑपरेटर व ड्रिलर पाहिजेत स्त्री/पुरूष. संपर्क-८४२१४१११९१, ९४२२०४६०४०, इचलकरंजी.

**इचलकरंजी जनता बँकेजवळ** लेडीज वेअरमध्ये अनुभवी/शिकाऊ लेडीज कामगार पाहिजे. संपर्क-सॅम्स बुटिक. ८७६७०१९८३४, ७४९८०७७१४१

**साफसफाई कामासाठी** कामगार हवेत. पत्ता- ओम एक्झीक्युटिव्ह लॉज, राधाकृष्ण चौक, एचडीएफसी बँकेसमोर, इचलकरंजी. ७६६६२११२१८

**हॉस्पिटलमध्ये** साफसफाईसाठी डे/नाईट मावशी पाहिजे. संपर्क-७६२०८८६९११

**बारमध्ये कामासाठी** अनुभवी मॅनेजर हवा आहे. संपर्क-९२२६१०५४१०

**इंग्लिश मेडियम स्कूलमध्ये** प्ले ग्रुप ते 4th std. साठी शिक्षक पाहिजेत. शिक्षण D.Ed./B.Ed/ पदवीधर-९९२२३१४३०९, ८६२४९४२४२८

**इयत्ता ९ वी, १० वी** विज्ञान विषयासाठी त्वरीत अनुभवी शिक्षक पाहिजे. शिक्षण- B.Sc/M.Sc. अनुभवींना प्राधान्य. ९९२२३१४३०९

**प्लंबिंग, सॅनिटरी वेअर** व बिल्डिंग मटेरियल सप्लाय शोरूममध्ये कामासाठी जेंटस व लेडीज तसेच कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. पत्ता-शहापूर. फोन-९५०४११११७१

**टू व्हिलर पार्किंगसाठी** कामगार पाहिजे. संपर्क-८२३७७४४४४४

**फोन पे कंपनीमध्ये** कोल्हापूर, करवीर या एरियाकरिता फील्ड सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. पगार-२३०००/- पीएफ+ईएसआयसी+इन्सेंटिव्ह. संपर्क-८८८८०८३००७

**एका नामांकित कंपनीमध्ये** टेली कॉलिंगसाठी २ लेडीज टेलिकॉलर पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क-७२६२००१४५६

**लेडीज कामगार** व जेंटस हेल्पर पाहिजेत. ओंकार दूध डेअरी, सांगली नाका, इचलकरंजी. फोन-९३२६०२२९१०

**टर्नर/ग्रायडिंग ऑपरेटर** जेंटस/लेडीज हेल्पर पाहिजेत. समक्ष भेटावे. केदार प्रिसीजन कंपोनन्ट, आंबेडकर पुतळ्याजवळ, इचल. मो. ९११२२७३१७१

**बेकरी शॉपीमध्ये कामासाठी** मुले पाहिजे. बालाजी बेकरी एएससी कॉलेजजवळ. संपर्क-९९६००२८२८९, ७२७६१२७१११

**पार्वती इस्टेट जवळील** टेक्स्टाईल मिल अनुभवी सायझिंग दिवाणजी पाहिजे. वॉर्प बीम प्रिपरेशन व केमिकल मिक्सींगचे ज्ञान, यार्न क्वॉलिटी कंट्रोल व ब्रेकेज कमी ठेवण्याची क्षमता, प्रॉडक्शन प्लॅनिंग व मशीन मेंटेनन्स बेसिक ज्ञान, टीम मॅनेजमेंट व शिफ्ट हँडलिंग अनुभव. संपर्क-७७२००१८४०६

**अनुभवी चिकन ६५** तळणारा पाहिजे. पत्ता- डिलक्स चिकन ६५ महासत्ता चौक, इचलकरंजी. वेळ-सायं. ६ ते १०.३०, पगार-९०००/-. संपर्क-९५०३३००६०२

**६० स्पिंडल वायडिंग मशीनसाठी** अनुभवी वायडिंग दिवाणजी पाहिजे. किमान अनुभव ५ वर्षे. लोकेशन पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट. संपर्क-७७२००१८४०६

**एकाच ठिकाणी बसून कमवा.** गाळे भाडे व फिक्स पगार कंपनी देईल, कायमस्वरूपी काम, सर्वांना संधी. संपर्क-९१५६३००८९०

**पाहिजेत.** सिव्हील ड्राफ्टसमन D.C.E. B.E. Civil इंजिनिअर आर्किटेक्ट असिस्टंट अर्जासह भेटा. (सायं. ५ ते ७) संपर्क-सुहास अकिवाटे अॅन्ड असोसिएटस् गिरनार अपार्टमेंट, जुन्या नगरपालिकेजवळ, इचलकरंजी. ०२३०-२४२४४११, ७८७५३४६२०३

**ड्रायव्हर पाहिजे.** चार चाकी कारसाठी निर्व्यसनी व अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. किरण गॅससमोर, चंद्रा बिल्डींग, इचलकरंजी. संपर्क-९०६०४०४४७७ (वेळ-सकाळी ११ ते २ व ५ ते ८)

**पाहिजेत.** लेडीज अकौंटट पाहिजे. टॅली प्राईममध्ये अनुभव असलेली, किमान १ वर्षे अनुभव. संपर्क-९१४५६००९०९

**प्लॅस्टिक कंपनीमध्ये** रॉ मटेरियलच्या मार्केटिंगसाठी कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगलीसाठी शिकाऊ/अनुभवी उमेदवार पाहिजेत. संपर्क-९४०४४२७८८०

**१२ माग ८ तास** तसेच १२ माग १२ तास माग चालवण्याकरिता कामगार पाहिजेत. तसेच ३२/४० मागासाठी जॉबर पाहिजे व ८ माग चालविण्यासाठी फिक्स कामगार पाहिजे. ९०११०९९०२७, ७०२००८१६७१

**वाईन सम्राटकरिता** कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. कामाची वेळ-सकाळी १० ते १ अर्जासह भेटा. रिक्रीएशन हॉलजवळ, इचलकरंजी. फोन-(०२३०) २४३८२२२

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती गाडीवर ट्रान्सपोर्ट लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-७५१७५०६६८२

**पाहिजेत.** टेलिकॉलींगसाठी लेडीज हव्या आहेत. शिक्षण-१० वी पुढे, वय-१८ ते ४० वर्षे. श्री महालक्ष्मी वधूवर. ८८३०२४०४२६

**पाहिजेत. मदतनीस-** इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रॉनिक्स शोरूमसाठी अनुभवी/गरजू मदतनीसाची त्वरीत भरती करणे आहे. पात्रता- १० वी/१२ वी उत्तीर्ण किंवा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. अनुभवानुसार आकर्षक पगार दिला जाईल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. हॅवेल्स लॉयड गॅलेक्सी कुरबिट्टे एंटरप्राईजेस, सांगली रोड, फॉर्च्युन प्लाझाजवळ, इचलकरंजी. संपर्क-०८८३०१२७६७८, ७८७५२१७२१६

**लेडीज स्टाफ पाहिजे.** मगदूम आयुर्वेदिक क्लिनिक, गांधी पुतळा, इचलकरंजी. ९७६६३५४४६७

**सुवर्णसंधी** (Work From Home) वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी. नोकरदार, गृहीणी, विद्यार्थी इतर सर्वांसाठी घर, मोबाईल/ऑफिसमधून काम करा, वय-१८+. संपर्क-७२७६५६६८६४

**कार अॅक्सेसरीज मध्ये** मुलगा पाहिजे. विरशैव बँक बीजेपी कार्यालयाजवळ, इचल. सुर्यवंशी कार अॅक्सेसरीज -मो. ७७६९८३८७०९

**लेडीज कंपाऊंडर**/रिसेप्शनिस्ट पाहिजे. अनुभवी/फ्रेशर्स, आकर्षक पगार, संजीवनी डेंटल केअर, साखरपे दवाखान्याजवळ, मारूती ज्वेलर्सशेजारी, इचलकरंजी. मो. ८००७९७७४०३

**गुगल पे मध्ये** कामासाठी मुले/मुली सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. पगार- १५ ते २० हजार. स्वत:ची टू व्हीलर आवश्यक. संपर्क-८६००३८३०५७

**नामवंत कंपनीमध्ये** भरती सुरू. ITI Fitter-04, Diploma/B.E. सुपरवायझर-०४, १० वी/१२ वी पासून पुढे शिकाऊ मुले-०५, हेल्पर-०२. पगार-१२००० ते २०००० व पीएफ/ईएसआयसी, इचलकरंजी. ९१७५९६७७६७, ८९५६१६९६९६

**पाहिजेत.** हॉटेलमध्ये चपाती, भाकरी कामासाठी लेडीज पाहिजेत. संपर्क- ८५५२०४०४०५, ८८८८३७७७८८, इचलकरंजी.

**हॉटेलमध्ये कामासाठी** वेटर, क्लिनर व भांडीसाठी लेडीज पाहिजे. संपर्क-९९२१३१२४८१

**कंपनी सेक्रेटरी** ऑफिससाठी स्टाफ आवश्यक. पात्रता-बी.कॉम/एम.कॉम, अनुभव-संगणक ज्ञान. संपर्क-७७२००६७७८९, इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे.** टाटा इंट्रासाठी (LMV) लायसनधारक अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. पत्ता- पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट, यड्राव. संपर्क-९६०४२४८९२५, ९५४५९०८०००

**CA** फर्ममध्ये संगणक व टॅली ज्ञान असणाऱ्या मुली पाहिजेत. संपर्क-८०८८२३५३२४

**टॅली ईआरपीमध्ये** काम करणेसाठी अनुभवी अकौंटंट जेंटस पाहिजे. संपर्क-एस.जे. इंडस्ट्रियल सर्व्हिसेस, तिळवणी. मो. ९५५२५२५७५९, ९१३०७७७११५

**कामगार पाहिजे.** कापड दुकानात कामासाठी शिकाऊ/अनुभवी सेल्समन पाहिजेत. संपर्क-कन्हैया साडी, मराठा मंडळ बिल्डींग, इचलकरंजी. फोन-९४०४२५७९१९

**कापडी पिशव्या** शिवण्याकरीता मजुरीवर पिशव्या घरी दिल्या जातील. गारमेंट मशिन आवश्यक. संपर्क-९५७९७२७३१७ (वेळ-सकाळी ९ ते ५)

**डायमंड सुपारी** कटिंगकरून महिना ३००००/- कमवा. नो रिजेक्शन. फिक्स इन्कम. स्पॅंपवर करार. मो. ९८२३९८९७९३

**होलसेल मेडिकलमध्ये** क्लिरीकल कामासाठी मुली पाहिजेत. अकौंटींग कामाचा अनुभव आवश्यक. संजय मेडिकल, भोने माळ, इचलकरंजी. ९७३००८५९७७

**पाहिजेत.** वेल्डर-४, हेल्पर-४, शिकाऊ, अनुभवी, हॉलमार्क हॉस्पिटल फर्निचर, शहापूर रोड, सावली सोसायटीजवळ, इचल. ९९२२१४२०४०, ९४०३२७५२३२

**पाहिजेत.** इचलकरंजी फॅमिली लॉजसाठी गरजू , प्रामाणिक, अनुभवी वय-४० ते ५० वर्षाचा रूमबॉय, हाऊसकिपर पाहिजे. संपर्क-९८५००२०६३०

**हॉस्पिटल कामाकरिता** अनुभवी सिस्टर्स एक्स-रे टक्निशियन, रिशेप्सनिस्ट पाहिजे. संपर्क-महाडिक आर्थोपेडिक हॉस्पिटल, नवीन महानगरपालिकाजवळ, इचलकरंजी. फोन-९२२६७८१७९७

**आवाडे पार्क,** तारदाळ येथे एअरजेट फॅक्टरीसाठी अनुभवी दिवाणजी पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. ९५४५५४९८८१

**Required** Audit Assistant with Computer and Account Knowledge Contact- Suresh R. Jajoo and Company. 9595757500, 8975757500

**सुट्टीमध्ये स्वकमाई व** प्रत्यक्ष कामाचा अनुभव घ्या पार्टटाईम काम उपलब्ध. १० वी परिक्षा झालेल्यांना सुवर्णसंधी. संपर्क-८०१०९०४७८८

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. स. ७ ते ३ व दु. ३ ते ११, आठ तास ड्युटी, कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. संपर्क-९१४५२११९०६, ८३२९०२८१४४

**सुट्टीमध्ये स्वकमाई व** प्रत्यक्ष कामाचा अनुभव घ्या. पार्ट टाईम काम उपलब्ध. ITI, MCVC शिकणाऱ्यांना सुवर्णसंधी. संपर्क-८०१०९०४७८८

**इंडस्ट्रियल आणि ऑटोमेटिव्ह** लुब्रिकेंट ऑईल आणि ग्रिससाठी अनुभवी सेल्समन पाहिजे. संपर्क-९१५६२७६९९९

**एअरजेट कारखान्यामध्ये** हेल्पर व विव्हर पाहिजेत. संपर्क-७०३०००८८८९, ७७९८५३५३९३

**आंतरराष्ट्रीय कंपनी** शोरूम एचपी वर्ल्डमध्ये Marketing Executive (ISP) करिता जागा भरणे, अनुभवींना प्राधान्य. वय-२१ ते ३०. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, IT Hardware/Software ज्ञान व ग्रॅज्युएट, पगार- कमीत कमी २१०००/- पासून अनलिमिटेड अधिक माहितीसाठी. संपर्क-९३२५८१११०४, ८३७८९८११०४

**शुध्द शाकाहारी** हॉटेलमध्ये वेटर कामासाठी व भांडी घासण्यासाठी कामगार पाहिजे. राहण्याची व जेवणाची सोय. संपर्क-८९७५६९८४७४, ७९७२१२१६५५

**व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत.** बस स्टँडजवळ स्टेशन रोड, आलासे कंपौंड पासून पेट्रोल पंपासमोर, इचलकरंजी. फोन-९८२२७६६७६२

**वेदभवन समोर** इचलकरंजी येथे स्वयंपाकासाठी मावशी हव्या आहेत. संपर्क-८८३०१५४९६३, ८४४६९५८३८१

**घरकामासाठी** अनुभवी मावशी पाहिजे. वेळ- स. १० ते सायं. ७, आकर्षक पगार, संपर्क-८९५११८७३२२, ९८२२०६९५००

**ड्रायव्हर पाहिजे.** घरगुती कामासाठी अनुभवी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-९०९६१९१०७१, ८९९९०५७७२९

**इलेक्ट्रीशियन पाहिजेत.** इलेक्ट्रीकल कंट्रोल पॅनल वायरिंगसाठी आयटीआय इलेक्ट्रीशियन पाहिजेत. आकर्षक पगार (अनुभवावर आधारित) संपर्क-सिंकव्होल्ट इलेक्ट्रीक, यड्राव. ८४४६३१५१३१

**फूड कंपनीमध्ये** प्रोडक्शन आणि क्वॉलिटीसाठी अनुभवी बी. टेक फूड टेक्नॉलॉजी कॅंडीडेट हवा आहे. तसेच ऑफिस कामासाठी रिसेप्शनिस्ट पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. सुरेखा मार्केटिंग, राजमाने हायस्कूलजवळ, रूई. संपर्क-७७४४८३८३३४

**नामांकित कंपनीमध्ये** कामगार व वेल्डर पाहिजेत. मुले, आकर्षक पगार, पीएफ+ईएसआयसी सुविधा. शिक्षणाची अट नाही. संपर्क-९६५७१४१०५८, ८६५७१७१७१७

**रेडिमेड कापड दुकानसाठी** अनुभवी/शिकाऊ लेडीज/जेंटस सेल्समन पाहिजे. महालक्ष्मी कापड दुकान, हत्ती चौक, इचलकरंजी. ९८५०८५८६०२

**साध्या सायझिंग युनिटमध्ये** १ सायझर, २ वार्पर, २ बॅकसायझर, खरड दिवाणजी, १२ माग मलमल क्वॉलिटीवर १२ तास कामगार पाहिजेत. संपर्क-९०११७३५३८४

**सिकसेम कंपनीमध्ये** ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. वय-२० ते ३० शिक्षण १२ वी पुढे. कामाची वेळ- सकाळी ८ ते ६. संपर्क-९९२०९४३८९५, इचलकरंजी.

**हॉटेलमध्ये** तंदुरी हेल्पर पाहिजे. संपर्क-९५९५६०४७४७

**यड्राव (पार्वती इंडस्टिज)** नामवंत कंपनीत खालीलप्रमाणे जागा भरणे आहे. १) CNC/VMC/HMC Operator (जागा-१०) पगार-१५५०० ते १६०००. २) सुपरवायझर (जागा-३) ३) Setter/Programmer (जागा-२) **४)** Productaion Incharge (जागा-२) **५)** Line Inspector (जागा-५) **६)** Helper (जागा-१०) ७) Office boy (जागा-२) ८) Housekeeping Ladies (जागा-५) वरील सर्व जागा त्वरीत भरणे आहेत. ईएसआयसी, पीएफ व बोनस इतर सर्व सुविधा आकर्षक पगार मिळेल. संपर्क-९१३०३९१९०७, ८७८८३२८२२८

**गाड्यांचे शिट कोचिंग कामासाठी** कामगार पाहिजे. संपर्क-सुरभी कोचिंग, कॅबसन हॉटेलसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. ८९८३९९१८१०, ९७३०३३४६९८.

**Academic Tellycaller** पाहिजेत अनुभवनींना प्राधान्य. पार्ट टाईम/फुल टाईम पेमेंट ७ हजार ते १२ हजार (On Skills) संपर्क. प्रेरणा अकॅडमी, ९७६२२७०३७०.

**परमीट रूम व बारसाठी मॅनेजर** व वेटर पाहिजे. संपर्क-७५८८६२०५०५, ९८५०५९६९६५.

**नामांकित जाहिरात कंपनीमध्ये** लेडीज/जेंटस पाहिजेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क-९८२२६६९५४८, ९८२३९६५००५

**झोले बझार कबनूरमध्ये** नोकरीची संधी, सॉफ्टवेअर डेटा एंट्री व अनुभवी सेल्स स्टाफ आणि मॅनेजर हवेत. संपर्क-९५५२१२२३४५, ८६८६१२२३४५

**कोरोचीमधील नामांकित अकॅडमीमध्ये** ५ वी ते १० वी वर्गासाठी सर्व विषयासाठी शिक्षक भरणेचे आहे. संपर्क-७०२०४६९०२५

## * भाड्याने देणे/घेणे *

**१ आरके भाड्याने देणे आहे.** लहान कुटूंबासाठी किंवा विद्यार्थ्यांसाठी. पत्ता- नदीवेस, मरगुबाई मंदिरमागे. फोन-९६८९०२७४७६

**स्टेशन रोड,** डेक्कन मिलजवळ, दत्त मंदिरसमोर गाळा भाड्याने देणे आहे. ८१४९९१३०८८

**साखरपे हॉस्पिटलजवळ,** सातपुते गल्लीमध्ये १०'X२०' चा गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-८१४९९१३०८८

**भाड्याने देणे.** १५०० चौ. फूट/६०० चौ. फूट शोरूम भाड्याने देणे. बॅंक पतसंस्था, शोरूमसाठी उपयुक्त, महासत्ता चौक, बाटा शोरूमसमोर, इचलकरंजी. संपर्क-९४२२०४७२१९

**तांबे माळ,** लिंबू चौकजवळ २ बीएचके ग्राऊंड फ्लोअर आरसीसी फ्लॅट भाड्याने देणे. संपर्क-७८८७७७७७३१, ७४४७३७१११११

**भाड्याने देणे आहे.** १ बीएचके, २ रूम व सिंगल रूम, ग्राऊंड फ्लोअर, सर्व सोयीनियुक्त, गांधी विकासनगर, गल्ली नं.२, कबनूर-इचलकरंजी. फोन-९६६५३३४७२५

**आरसीसी ३ रूम** १ बीएचके भाड्याने देणे. सर्व सोयीनियुक्त इंदिरा कॉलनी, कबनूर. कोळी डॉक्टरशेजारी, दगडी पाण्याची टाकी. संपर्क-९२७०७४५६१२

**१ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे. सर्व सोयीनियुक्त ग्राऊंड फ्लोअर नविन नगरपालिकेजवळ, इचलकरंजी. संपर्क-९१७५६२८८३५

**भाड्याने देणे.** ८०० स्क्वे. फूटाचे २ आरसीसी हॉल कोणत्याही व्यवसायासाठी भाड्याने देणे. लंगोटे मळा, इचलकरंजी. फोन-९६८९७४७९८९, ९४२०३५२६९९

**सर्व सोयीनियुक्त डीकेटीई** कॉलेजजवळ सेवाभारती हॉस्पिटलला लागून दुकानगाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-९९२२२५१२९१, इचलकरंजी.

**दुकानगाळा भाड्याने देणे आहे.** २५० स्क्वे. फूट आरसीसी फूल फर्निश्ड. पत्ता- व्यंकटेश्वरा बँकेशेजारी, कापड मार्केट, हौसिंग सोसायटीसमोर. ९८९०९४५१०२, ७२४९४९३०९९

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे. सर्व सोयीनियुक्त पर्ल रेसिडेन्सी इचलकरंजी. फोन-९८९०१२८८८३, ९९७०८४५६२८

**भाड्याने देणे.** आरसीसी सिंगल रूम सर्व सोयीनियुक्त छोट्या कुटूंबासाठी पहिला मजला, गुरूकृपा रेडिमेडस, नदीरोड, इचलकरंजी. ९५१८५४३६९५

**दुकानगाळा भाड्याने देणे.** रोडटच, शाहू पुतळा, कोल्हापूर रोड, सिंधी पंचायतशेजारी, इचलकरंजी. संपर्क-८८५५८४६१६२, ९३७२४५८७१७

**हॉटेल भाड्याने देणे आहे.** तेरवाड-कुरूंदवाड रोड, कुरूंदवाड. फोन-९३७११७१०६९

**आरसीसी २ रूम** सर्व सोयीनियुक्त लहान कुटूंबासाठी भाड्याने देणे. २४ तास पाणी, शाहू हायस्कूल डॉ. सौरभ कुलकर्णी मागे, बांबुवाली गल्ली, संपर्क-९९२२४९८५९६

**हातकणंगले हद्दीत** बार व रेस्टॉरंट भाड्याने देणे आहे. हायवेटच. संपर्क-९९२११७९६९६, ९७६६७४०५००

**१ बीएचके फ्लॅट** सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. दुसरा मजला, विकासनगर, नविन महानगर पालिकेसमोर संपर्क-९८२२६९९२९३

**१ बीएचके रूम** भाड्याने देणे आहे. पत्ता- जनता चौक, पल्लवी हॉटेल रोड, साखरपे हॉस्पिटलमागे, इचलकरंजी. फोन-९५६११९६५२९

**जागा भाड्याने देणे.** १२५० स्क्वे. फुट रिकामी जागा, पॅराडाईज हॉटेलमागे, कबनूर. संपर्क-८८०५९०४१८५

**२ बीएचके** भाड्याने देणे आहे. मराठा चौक, जवाहरनगर, इचलकरंजी. हारूण सय्यद- फोन-९८८१८१३८८१

**शेड भाड्याने देणे.** आंबेडकर पुतळ्याजवळ १५०० स्क्वे. फूट शेड, संपर्क-७८४०९४३१०८

**तारदाळ श्रीरामनगर गल्ली नं. ४** येथे २३०० स्क्वे.फूट रिकामी जागा कोणत्याही व्यवसायासाठी २५ फुटी रोड व १५ फुटी रोडटच भाड्याने देणे. संपर्क – ८२०८७५५९५२.

**१ बीएचके ३ फ्लॅट** भाड्याने देणे आहे. २४ तास पाणी, बोअरवेल उपलब्ध, आवळे हायस्कूल, बेलसाईड बिलीव्हर्स चर्चशेजारी, गुरव मळा, कोरोची. संपर्क-धनाजी पाटील, ८९९९२५२३९२, गोरख पाटील ७२५९२१०५५७.

**भाड्याने देणे.** ४५० स्क्वे. फूट दुमजली, दवाखाना, हॉटेल इ. साठी उपयुक्त इमारत/नारायण टॉकीज, मोरे डेंटल क्लिनिकसमोर, इचलकरंजी. फोन-९८९०९६१४५०, ९५१८९०९३८८

**सर्व सोयीनियुक्त** मोक्याच्या ठिकाणी नदीवेस नाकारोड, रेणुका मंदिरशेजारी ३८०० स्क्वे. फूट जागेत १८०० स्क्वे. फूट बांधकामसहित हॉटेलसाठी (शाकाहारी) किंवा अन्य व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे. संपर्क-८६६८६२०९२३, ९३५६१९२०७५

**गोडाऊन भाड्याने देणे.** १५७० स्क्वे. फूट संडास बाथरूम पोटमाळा ऑफिस सर्व सोयीनियुक्त तीनबत्ती चौक, इचलकरंजी. फोन-८६६८५१०९९१

**१ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे-शाकाहारी कुटुंबासाठी. सर्व सोईनीयुक्त, कापड मार्केटच्या मागे, इचलकरंजी. भगतसिंग बागेजवळ, ८६६८५१०९९१.

## * व्यवसाय *

**जगातील मंदीमुळे** ढासळलेल्या बाजारात फायदा करून घेण्यासाठी आजच संपर्क करा. फोन-७३८७०९०९८१

## * बांधकाम *

**वॉटर प्रुफिंग तोडफोन न करता** टेरेस, भिंतीला ओल लिकेजस् वॉटरप्रफिंगची कामे मटेरियल मजुरीसह खात्रीने करून मिळेल. संपर्क-७९७२९३४८२१, इचलकरंजी.

## * विवाहविषयक *

**प्रथम घटस्फोटीत** आंतरजातीय भरपूर स्थळे मुलींच्या बायोडाटा आपणास ठीक वाटल्यास मुलाकडे पाठवला जाईल. ९९७५३२५३७१

**वधु पाहिजे.** जैन गुजराती श्रीमंत मुलगा, ३६ वय, कपड्यांची तीन शोरूम, एकुलता एक जैन सर्व पोटजाती मान्य. संपर्क-८४५९६५८६९७, ७३९१८६८६९५

## * शैक्षणिक *

**ड्राईंग क्लास-** ड्राईंग, पेंटींग, स्केचिंग, रांगोळी, मेंहदी या सारखे विविध क्लासेस घेतले जातील. वयोगट-४ वर्षापासून पुढे. सर्वांसाठीच असे कलादालन. संपर्क-९९२१४५५५९८

## * कर्ज विषयक *

**गरज तुमची** कर्ज आमचे. संपर्क-९६५७१६३९८१

## * यात्रासहल *

**१० मे काशी,** आयोध्या, प्रयागराज, वैष्णोदेवी, वाघाबॉर्डर, अमृतसर, दिल्ली, नेपाळसह बसने २२ दिवस कोजागिरी ट्रॅव्हल्र्स-९४०३९५३४१२, ९४२०५९२५२४

## * बोअरवेल *

**राज बोअरवेल-** आमच्याकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात काम मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**श्री साई बोअरवेल**-आमच्याकडे योग्य दरात बोअर मारून मिळेल. ४१/२'' व ६''. ९९२२७७२०३६, ९८८१३५५८१३.

**श्री सिध्देश्वर बोअरवेल** आमचेकडे ६।। इंची बोअर योग्य दरात मारून मिळेल तसेच घरगुती अडचणीच्या ठिकाणी ४।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क-७७७५९३७५७२, ८५५४९८४५६३

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**



**क्षयरोग मुक्त अभियान शुभारंभप्रसंगी जि.प.अध्यक्षा शिल्पा खोत यांच्यासह आरोग्य अधिकारी व इतर.**

# २०२६ अखेर जिल्हा क्षयरोग मुक्त होईल:खोत

**सेनापती कापशी,ता.१६(वार्ताहर)-**

**क्षयरोग हा केवळ आजार नसून तो सामाजिक प्रश्न आहे. योग्य वेळी उपचार घेतल्यास आजार पूर्णपणे बरा होतो. ग्रामीण भागातील प्रत्येक रुग्णापर्यंत आरोग्य सेवा पोहोचावी. २०२६ अखेर कोल्हापूर जिल्हा क्षयरोग मुक्त होईल, असे जिल्हा परिषद अध्यक्षा शिल्पा खोत यांनी सांगितले.**

जि.प. अध्यक्षा खोत, सुनीता माळी, दिपक सोनार, पं. स. सदस्य उज्वला कांबळे, जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ. फारुख देसाई यांच्या उपस्थितीत सेनापती कापशी (ता.कागल) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात १०० दिवस क्षयरोग अभियान अंतर्गत शुभारंभ झाला.

खोत म्हणाल्या, या अभियानांतर्गत कापशी परिसरातील गावातील संशयित रुग्णांची विशेष तपासणी करण्यात येणार आहे.यावेळी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शेख,कापशी ग्रामपंचायतीचे आजी,माजी सदस्य, कागल तालुका आरोग्य कार्यालयमधील पर्यवेक्षक,सर्व समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, कापशीतील सर्व कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन जयसिंग खोत यांनी केले. आभार डॉ.प्रमोद धामणकर यांनी मानले.

# कागवाड तालुक्यात उष्म्याची उच्चांकी नोंद

## शेतीची कामे दोन टप्प्यात : पिकावरही परिणाम

**कागवाड,ता.१६ (वार्ताहर)-**

**कागवाड तालुक्यात उष्म्याची तीव्रता वाढत चालल्याने नागरिक शेतीसह दैनंदिन जीवनातील कामे सकाळी नऊ वाजण्याच्या आत तर सांयकाळी पाच -सहा नंतर उरकत आहेत.यामध्ये तालुक्यातील शेडबाळ गावात ४४.९ डिग्री सेल्सीयस अशा उच्चांकी उष्म्याची नोंद झाल्याची माहिती हवामान खात्याकडून मिळाली.**

सध्या गांवातील नागरिक आरोग्याच्या दृष्टीने आपले कामकाज वेळेत करत असल्याचे दिसते. विशेषत: सकाळी नऊ नंतर नागरिक घरीच राहत असल्याने संपूर्ण दिवसभर गांवात शुकशुकाट दिसून येत आहे. उन्हाळा कडक असल्याने उन्हाळी पिकांच्यावर परिणाम जाणवत आहे. विशेषत: या भागात ऊस पिक मोठ्या प्रमाणात घेतले जाते.सध्याच्या उष्म्याने या पिकांना अधिक पाण्याची मात्रा देण्यावर शेतकरी भर देत आहेत.

दुष्काळी खेड्यात ऐन उन्हाळ्यात कुपनलिका,विहीरीच्या पाण्याच्या स्त्रोतात कमालीचे घट होते.यामुळे याचा नेमका फटका शेती व्यवसायाला बसतो.यंदाही या भागात उष्म्याने नागरिक त्रस्त झाल्याचे दिसते.दिवसेंदिवस उन्हाच्या तीव्रतेत वाढ होत आहे.या उष्म्याचे परिणाम बाजार पेठ,सार्वजनिक ठिकाण,बसस्थानकसह इतर ठिकाणी झाल्याने नागरिकांची वर्दळ कमी झाल्याचे दिसते.

# आम.शिवाजी पाटील यांनी जि.प.पराभवाचे आत्मपरीक्षण करावे

## केडीसीसीचे संचालक भैया माने यांचे प्रत्युत्तर

कोल्हापूर,ता.१६ (प्रतिनिधी)–

**नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आमदार शिवाजीराव पाटील यांच्या गटाला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला आहे. या पराभवाचे दु:ख आम्ही समजू शकतो. मात्र, आपले अपयश लपवण्यासाठी गोकुळ आणि केडीसीसी बँकेसारख्या संस्थांवर बिनबुडाचे आरोप करू नका. कुणाचे तरी 'हातचे बाहुले' बनून काम करण्यापेक्षा आपल्या पराभवाचे आत्मपरीक्षण करा, असा टोला केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने यांनी लगावला आहे.**

आमदार शिवाजीराव पाटील यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना भैया माने यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जोरदार पलटवार केला. माने यांनी म्हटले आहे की, स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादीने एकत्र लढण्याचा निर्णय घेतला होता. त्याचा सकारात्मक परिणाम चंदगड, आजरा आणि गडहिंग्लजमध्ये दिसून आला. आमदार पाटील 'नऊ विरुद्ध शून्य' अशा विजयाच्या वल्गना करत होते, मात्र प्रत्यक्षात तिथे राष्ट्रवादीचे आठ आणि त्यांचा केवळ एक सदस्य निवडून आला. आजऱ्यात दोन्ही जिल्हा परिषद जागा राष्ट्रवादीने जिंकल्या, तर तिन्ही पंचायत समित्यांवर राष्ट्रवादीचेच सभापती विराजमान झाले. हे अपयश त्यांच्या जिव्हारी लागल्यानेच ते आता निराधार आरोप करत आहेत.

गेली पाच वर्षे गोकुळ दूध संघ आणि केडीसीसी बँकेच्या कारभारावर अवाक्षरही न काढणाऱ्या आमदारांना निवडणुकीच्या तोंडावरच हा साक्षात्कार कसा झाला? असा सवाल माने यांनी उपस्थित केला. ते म्हणाले की, नाम.हसन मुश्रीफ यांनी दिलेला १६ रुपयांच्या दरवाढीचा शब्द पूर्ण केला आहे. संघाच्या ठेवी ७०० कोटींवर पोहोचल्या असून ३०० कोटींहून अधिक गुंतवणूक झाली आहे. २० लाख लिटर दूध संकलनाचा ऐतिहासिक टप्पा पार करत अनेक नवनवीन उपपदार्थांची निर्मिती सुरू झाली आहे. विरोधकांनी संस्था बदनाम करण्यापेक्षा वास्तवाचे भान ठेवावे.

> **गोकुळची निवडणूक महायुतीच्या माध्यमातूनच लढवली जाईल आणि महायुतीचाच चेअरमन होईल, हे नामदार मुश्रीफ यांनी आधीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे आमदार पाटील यांनी कुणाच्या सांगण्यावरून चुकीची विधाने करू नयेत.**
> **– प्रताप उर्फ भैया माने,**
> **संचालक, केडीसीसी बँक**

कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची 'वरदायिनी' असलेल्या जिल्हा मध्यवर्ती बँकेने २२ हजार कोटींच्या व्यवसायाचा टप्पा ओलांडला असून बँकेच्या सर्व १९१ शाखा नफ्यात आहेत. साडेबारा हजार कोटींच्या ठेवी आणि ९ हजार कोटींहून अधिकचे कर्ज वितरण करून बँक राज्यात अव्वल स्थानावर आहे. अशा सक्षम संस्थांना राजकीय हेतूने बदनाम करणे चुकीचे असल्याचे माने यांनी स्पष्ट केले.

नाम.हसन मुश्रीफ यांनी नेहमीच युतीचा धर्म पाळल्याचे सांगताना माने यांनी उदाहरणे दिली. महानगरपालिकेत भाजपचा महापौर करण्यासाठी आणि कागलमध्ये पहिल्यांदा भाजपचा पंचायत समिती सभापती करण्यासाठी नाम.मुश्रीफ यांनीच पुढाकार घेतला. मार्केट यार्डच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचा दलित समाजाचा अध्यक्ष करण्यात आला. मुश्रीफ आणि सतेज पाटील यांच्या मैत्रीच्या अफवा पसरवून स्वतःचे अपयश लपवण्याचा प्रयत्न काही नेते करत आहेत. मात्र, राष्ट्रवादीने महायुतीत राहूनच जिल्हा परिषदेत 'शिवधनुष्य' पेलले आहे, असेही त्यांनी सांगितले.

## दुकानातून रोकड असलेली पर्स चोरीला

सांगली, ता. १६( प्रतिनिधी)–

**विश्रामबाग परिसरातील एका फॅशन बुटीकमधून चोरट्याने १२ हजार रुपये रोकड असलेली पर्स लंपास केली.**

याप्रकरणी योगिता विक्रांत रणभिसे (रा. कलासुमन अपार्टमेंट, शिवदर्शन कॉलनी, एमएसईबी कामगार भवन समोर, विश्रामबाग, सांगली) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी योगिता रणभिसे यांचे राजमती गर्ल्स महाविद्यालयासमोर माई फॅशन बुटीक आहे.

त्यामधून चोरट्याने त्यांची पर्स लंपास केली. ही बाब निदर्शनास येताच योगिता यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. फिर्याद नोंद झाल्यावर पोलिसांनी चोरट्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# ड्रॉप बॉक्समधून धनादेश चोरी प्रकरणी एकावर गुन्हा दाखल

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)–

**शहरातील वखारभागात बँक ऑफ बडोदा शाखेत ड्रॉप बॉक्समधील धनादेश चोरून तो वेगळ्याच खात्यावर वठवल्या प्रकरणी अमन शर्मा नामक अनोळखी खातेदाराविरूद्ध अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत निकेत केतन शहा (रा. महावीरनगर) यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली आहे.**

फिर्यादी निकेत शहा यांना पार्श्वनाथ बँकेने दिलेला हुतात्मा बँकेच्या कॅश क्रेडीट अकाऊंटचा ३७ हजार ७०० रूपये रकमेचा धनादेश त्यांनी बँक ऑफ बडोदा शाखेच्या ड्रॉप बॉक्समध्ये दि. ६ जानेवारी २०२६ रोजी टाकला होता. परंतू हा धनादेश ड्रॉप बॉक्समधून चोरीला गेला. त्यानंतर धनादेशवर खाडाखोड करून तो अमन शर्मा नामक खातेदाराच्या खात्यावर वठवण्यात आला. मुदतीत खात्यावर पैसे जमा न झाल्यामुळे शहा यांनी बँकेत जाऊन विचारणा केली. तेव्हा धनादेश चोरणाऱ्या टोळीचा कारनामा उजेडात आला. त्यामुळे शहा यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी चौकशी करून उशिराने अमन शर्मा नामक व्यक्तीवर ३७ हजार ७०० रूपयांची फसवणूक केल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. यापूर्वी असाच प्रकार मिरजेत घडला असून तेथे ड्रॉप बॉक्समधून धनादेश चोरणाऱ्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सेवा हक्क दिन आढावा बैठक संपन्न

कोल्हापूर,ता.१६ (प्रतिनिधी)–

**जनसेवा करताना सामान्य नागरिकांसाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व, कालबद्धता व कार्यक्षमता या बाबी वेळेत साध्य व्हाव्यात या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा कायदा बनविण्यात आला आहे.**

येत्या २८ एप्रिल रोजी हा दिवस ' सेवा हक्क दिन ' म्हणून महसूल विभागातर्फे जिल्ह्यात सर्वत्र साजरा करण्यात येणार आहे. याचा आढावा घेण्यासाठी गुरूवारी एनआयसी सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना गुरव म्हणाले, या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यात या अधिनियमाबाबत तसेच राज्यसेवा आयोग आणि आपले सरकार पोर्टलमार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात यावी तसेच हा दिन जन सहभागासह संपूर्ण जिल्हयात तालुका व ग्रामस्तरावर मोठ्या उत्साहात साजरा करावा. या आढावा बैठकीसाठी सर्वसाधारण तहसीलदार नाथाजी सगट, संदीप पाटील, मिना आनेकर, अनुराधा सोनवणे हे प्रत्यक्ष तर व्हीसीद्वारे जिल्ह्यातील प्रांताधिकारी, तहसीलदार आणि संबंधित यंत्रणाचे अधिकारी उपस्थित होते.

* अमरावती, ता. १६ – अमरावतीमध्ये तापमानाने पुन्हा एकदा ४४ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला. गुरूवारी शहराचे तापमान ४३.८ अंश सेल्सिअस होते.

# बसवेश्वर जयंती निमित्त अल्लमप्रभू योगपिठात कार्यक्रम

हातकणंगले,ता.१६(प्रतिनिधी)–



**लिंगायत धर्माचे धर्म संस्थापक विश्वगुरू महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजता आळते (ता. हातकणंगले) येथील अल्लम प्रभू योगपिठा मध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

या कार्यक्रमांसाठी सर्व शरण, शरणीनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शरण आण्णासाहेब शहापूरे व रमेशकुमार मिठारी यांनी योग पिठाच्या वतीने केले आहे.सकाळी महात्मा बसवेश्वरांची मूर्ती पाळण्यात घालणे,नामकरण सोहळा, पुजाव्रत, इष्टलिंग पूजा , सामुदायिक प्रार्थना, विश्वधर्म प्रवचन यासह अन्य कार्यक्रम साजरे होणार आहेत. हे सर्व कार्यक्रम अल्लम प्रभू योगपिठाचे पिठाधिश जगद्गुरू बसवकुमार स्वामीजी, हैदराबादच्या बसव मंटपाचे सद्गुरू अनिमिशानंद स्वामीजी, चित्रदुर्ग बसव मंटपाच्या सद्गुरू विजयांबिका माताजी यांच्या उपस्थित संपन्न होणार आहेत. तरी या बसवेश्वर जयंती सोहळ्यास सर्व लिंगायत शरण , शरणींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आण्णासाहेब शहापूरे व रमेशकुमार मिठारी यांनी केले आहे.

## सुरक्षा दलावर हल्ला

रांची,ता.१६–

झारखंडमधील अति नक्षलप्रभावित सारंडा जंगल परिसरात सुरक्षा दलांवर मोठा हल्ला झाला आहे. मनोहरपूर प्रखंडातील छोटानागरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बालिबा गावाजवळील चडराडेरा येथे नक्षलवाद्यांनी लावलेल्या आयईडी स्फोटात पाच जवान जखमी झाले आहेत. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# महावितरणचा आज तक्रार निवारण मेळावा

## वीज ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन

कोल्हापूर,ता.१६ (प्रतिनिधी)–

**महावितरणतर्फे जिल्ह्यातील सौर कृषिपंप तसेच घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांच्या समस्या तत्काळ सोडविण्यासाठी आज शुक्रवार दि.१७ एप्रिल २०२६ रोजी विशेष तक्रार निवारण मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ३० उपविभागात होणाऱ्या या मेळाव्यांचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणच्या कोल्हापूर मंडलाचे अधीक्षक अभियंता दत्तात्रय भणगे (प्रभारी) यांनी केले.**

या मेळाव्यात सौर कृषिपंपधारक शेतकरी, तसेच घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना आपल्या अडचणी मांडता येणार आहेत. वीजपुरवठा खंडित होणे, नवीन वीजजोडणी, वाढीव बिल, तांत्रिक अडचणी यांसारख्या विविध अडचणींची सोडवणूक जागेवर करण्यात येणार आहे. या मेळाव्यास महावितरणचे उपविभागीय अधिकारी, शाखा अभियंते यांच्यासह संबंधित सोलार इंस्टॉलेशन कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, सौर कृषिपंपांशी निगडीत तांत्रिक अडचणींवरही मार्गदर्शन व निराकरण केले जाणार आहे. ग्राहकांनी आपापल्या तक्रारी लेखी स्वरूपात तयार करून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित उपविभागीय कार्यालयात सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत उपस्थित राहावे.

ग्राहकांनी सदरच्या मेळाव्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन महावितरणद्वारे करण्यात आले आहे.

# वृध्द शेतकऱ्यास दोघांकडून मारहाण

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)–

**शेतात ट्रॅक्टर घातल्याच्या संशयावरून मिरज तालुक्यातील तुंग येथे एका वृध्दास दोघांनी शिवीगाळ करुन मारहाण केल्याचा प्रकार घडला.**

याप्रकरणी जखमी अशोक नाना कोळसे (वय ७०) यांनी सांगली ग्रामीण पोलीसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी याप्रकरणी संशयित दिनकर प्रभाकर कापसे आणि हणमंत प्रभाकर कापसे (दोघेही रा. तुंग) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना बुधवारी सकाळी घडली.फिर्यादी कोळसे हे शेतातील पिकास पाणी देत होते. त्यावेळी तेथे संशयित दिनकर कापसे तेथे आले. त्यांनी अशोक कोळसे यांना, आमच्या शेतातून तुम्ही ट्रॅक्टर का घातला ? असा जाब विचारला. यावरुन दोघांच्यात वाद झाला होता.

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. ६५२ पैकी प्लॉट नं. ४ चे क्षेत्र ३०६ चौ. मीटर यासी चतु: सिमा– पुर्वेस – गट नं. ६४९, पश्चिमेस – प्लॉट नं. ३, दक्षिणेस– रस्ता, उत्तरेस – गट नं. ६४९. सदर मिळकत ही पद्मजा चंद्रकांत केटकाळे रा. कबनूर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता. १५/०४/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मो.नं.९४२०७७६४८६.**

## जाहीर नोटीस

मौजे यड्राव येथील गट नं. ४७३/अ/१ पैकी 'संभव रेसिडेंसी–यड्राव' मधील प्लॉट नं. ५७ चे क्षेत्र–२४०–० चौ. मी. खुली जागा व घर मिळकत संपुर्ण यासी चतु:सिमा –पुर्वेस–३० फुट रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. ६० ची मिळकत, दक्षिणेस–प्लॉट नं. ५८ ची मिळकत, उत्तरेस–प्लॉट नं.५६ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत हि अमरअली महंमदअली जमखंडी रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे तोंडी ठरवले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता.१६/०४/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**

**पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी, मो. ७८२०९०९७०५**

## जाहीर नोटीस

इचलकरंजी महा नगरपालीका हद्दीतील मौजे शहापुर येथील गट नंबर ३७ / अ पैकी प्लॉट नंबर ६ चे क्षेत्र १३५.३० चौ. मिटर ची मिळकत यासी चतु:सिमा– पुर्वेस– प्लॉट नंबर ७. पश्चिमेस – ९ मिटर रुंदीचा रस्ता. दक्षिणेस – प्लॉट नंबर ५. उत्तरेस – १२ मिटर रुंदीचा रस्ता..सदर मिळकत श्री.प्रदिपकुमार श्रीलाल कनोडीया रा. इचलकरंजी यांचे कब्जे वहीवाटीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्री. संजय महादेव कांबळे रा. इचलकरंजी यांना व त्यांनी आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून तोंडी करारपत्र करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १५/०४/२०२६. इ

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी, मो. नं. ९४२०७७६४८६.**

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ६६८ पैकी प्लॉट नंबर २७ चे क्षेत्र २००४–०० चौरस फुटची खुली जागा मिळकत सर्व यासी चतु:सिमा–पुर्वेस–प्लॉट नं. २८, पश्चिमेस – प्लॉट नंबर २३दक्षिणेस –सदर गट नंबर ची मिळकत उत्तरेस–६–०९ मीटर रूंदीचा रस्ता. सदरची मिळकत अरुण गंगाधर कोपर्डे इतर दोन रा.इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना सदर मिळकतीची संचकार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क दावा पोटगी बोजा इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तकार नोंदवावी.म्हणुन दिली नोटीस सही ता. १५–४–२०२६

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**

**पत्ता:–३/१५३, देवमोरे वाडा, राणाप्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी मो.नं. ९३७३७०१५५५**

## जाहीर नोटीस

इचलकरंजी महा नगरपालीका हद्दीतील मौजे कबनूर येथील गट नंबर ४६ पैकी प्लॉट नंबर क व ड चे एकत्रीत क्षेत्र ३८० चौ.मिटर ची मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस – २० फुट रुंदीचा रस्ता. पश्चिमेस – श्री. शिकलगार यांची मिळकत. दक्षिणेस– श्री. देसाई यांची मिळकत. उत्तरेस – श्री. पाटील यांची मिळकत. सदर मिळकत श्री. तौफिक अल्लाबक्ष बागवान व श्री. अल्लाबक्ष मौला बागवान. रा. इचलकरंजी यांचे कब्जे वहीवाटीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचे तोंडी करारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही.

ता. १३/०४/२०२६. इ.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मो.नं.९४२०७७६४८६.**

## जाहीर नोटीस

१) ता. हातकणंगले पैकी मौजे खोतवाडी येथील क. ग. नं. ९१, क्षेत्र हे . ३ . २३ आर, पो. ख. क्षेत्र हे . ० .०८ आर., आकार रू ५–१० पैसे, यापैकी बिगरशेती झालेला भुखंड नं. ३ पैकी पुर्व बाजुचे क्षेत्र ८२.५ चौ. मी. ची खुली मिळकत. यांसी चतु:सिमा पुर्वेस :– इस्माईल मोमीन यांची मिळकत, पश्चिमेस :– भुखंड नं. ३ पैकी कुंभार यांची मिळकत, दक्षिणेस :– २० फुटी रस्ता व उत्तरेस :– विधाते यांची मिळकत. येणेप्रमाणे खुली भुंखड मिळकत . २) वरील मिळकत ही '' श्री अब्दुलमजिद शमशुद्दीन मोमीन'' यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांनी वरील मिळकतीबाबत आमच्या अशिलांशी नोटरी करारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क करार, तारणगहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कागदपत्रासह कळवावे. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही

ता. १६.०४.२०२६

**ॲड.पंकज आ.पाटील**

**श्री दत्त अपार्टमेंट'', गाळा नं. १, सांगली नाका, इचलकरंजी मो. न. ९०२१२३७६८७**

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नंबर ४५५/अ व गट नंबर ४५५/ब चे एकत्रीत बिगरशेती क्षेत्र हे . ०. १२.५० आर ची खुली जागा मिळकत व मौजे कोरोची येथील गट नंबर ४५९ पैकी प्लॉट नं २१ क्षेत्र. ९५०–०० चौरस फूट ची गट नंबर ४५५ / अ व गट नंबर ४५५ / ब च्या रस्त्यासाठी सोडलेली मिळकत यासी चतु:सिमा एकत्रीत पुर्वेस– गट नंवर ३८८ पश्चिमेस –सुनंदा गाताडे यांची मिळकत दक्षिणेस– गट नंबर ४५४/ब, उत्तरेस–गट नंबर ४५९ पैकी २० फुट रूंदीचा रस्ता सदरची मिळकत ही विठ्ठल दत्तात्रय परबकर रा कबनूर यांचे कब्जेमालकीची असुन त्यांनी सदर मिळकतीची संचकार पावती आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन १५ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १६/०४/२०२६

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**

**पत्ता:–३/१५३, देवमोरे वाडा, राणाप्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी मो.नं. ९३७३७०१५५५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेकरीता,

मौजे माणगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील गट नंबर ३४३ मधील, ४००० चौ.मी.क्षेत्राच्या मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. दिपक आकाराम भोसले रा. इंदिरा नगर, शहापूर– इचलकरंजी यांनी मे. जिल्हा न्यायाधिशसो, क्र. १ आर. व्हि. अडोणेसो, कोल्हापूर यांचे कोर्टात क्रि.रि.अ.नं. ८४/२०२५ चे काम श्रीराम सिटी युनियन फायनान्स लि. शाखा इचलकरंजी यांचेविरुध्द दाखल केले आहे. सदर वर नमूद मिळकत व त्यातील वाद हे न्यायप्रविष्ठ असून सदर मिळकतीबाबत चुकीची व अस्पष्ट, असंदिग्ध मजकूराची नोटीस दैनिक लोकसत्ताचे अंकात तारीख १२/०३/ २०२६ इ. रोजीची नोटीस प्रसिध्द झाली आहे. सबब श्रीराम सिटी युनियन फायनान्स लि. शाखा इचलकरंजी यांचे आमचे अशिल कोणतेही कायदेशीर देणे लागत नाहीत. सबब वर नमूद मिळकतीबाबत श्रीराम सिटी युनियन फायनान्स लि. शाखा इचलकरंजी यांचे बरोबर कोणीही, खरेदी, लिलाव, निविदा, बोली, बयाणा अगर अन्य कोणताही व्यवहार करु नये. तसा व्यवहार केलेस तो आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक रहाणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये यासाठी प्रसिध्द केली जाहीर नोटीस / समज.

तारीख :– १६/०४/२०२६

**ॲड.सुभाष ए. येलपले**

**१२/२२७, साई शिवाजीनगर इचलकरंजी. मो. नं. ९८२२३२१३५७**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन :– जि. कोल्हापूर, ता.हातकणंगले, पैकी मुळची मौ. कबनूर येथील व सध्या का इचलकरंजी महानगरपालिका हददीत समाविष्ट झालेल्या मिळकतीचा क. ग.नं. ४७ पैकी बिगरशेती प्लॉट नं. २४ याचा सि.स.नं. २२५२१ यापैकी मध्यभागाचे क्षेत्र ९३५ चौ. फुट याचे ८६.८९ चौ.मी.ची खुली जागा व यामधील ४७ चौ.मी. ड प्रतिची घर मिळकत याचा वार्ड नं.२१ घर नं. ३१० नवीन मालमत्ता नं. २१३०००४६१ असून सदर घर मिळकतीचे उत्तर बाजूकडील २० फुट लांबीची समाईक भिंती व आतील सुखसोयीसह यांसी चतु: सिमा पुर्वेस – रस्ता, पश्चिमेस – श्री पाटील यांची मिळकत, दक्षिणेस– कृष्णा भाऊ दत्तवाडे यांची मिळकत, उत्तरेस – श्री रावसो पुंडलिक पाटील यांची मिळकत.

२)वर नमुद केलेली मिळकत ही श्री आण्णासाहेब बाबूराव पाटील, रा. कुर्ली, ता.निपाणी, जि. बेळगांव यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारून मिळकत विक्रीचे करारापत्र करुन दिले आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दांवा,पोटगी अर्ज,आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस

ता. १६/०४/२०२६

**ॲड. सुनिल सु.धुपदाळे**

**रा.१७/२९४ पुजारी मळा राजमातानगर इचलकरंजी मो.नं.९३२६०२२३८५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,मौजे चंदुर येथिल क. ग. नं. ९६६ याचे क्षेत्र ० हे. ७७ आर. याचा आकार ९ रू. ४४ पै. यापैकी क्षेत्र ० हे. १५ आर. याचा आकार १ रू.८४ पै . यापैकी ख. देवु केलेले उत्तर बाजुचे क्षेत्र ० हे. १० आर याचा आकार १रू. २२पै.चीशेतजमिन यासी एकत्रीत चतु:सिमा पुर्वेस : सुयोग रमेश चौधरी यांची मिळक्त, पश्चिमेस : क.ग.नं.९६७ मधिल रस्ता, दक्षिणेस : लिहुन देणार यांची शिल्लक मिळकत, उत्तरेसः सरकारी रस्ता येणेप्रमाणे चर्तु:सिमेतील मिळकत ही श्री. किरण व दुष्यंत बाबाजी पाटील रा. चंदुर यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकत श्री. पाटील यांनी आमचे अशिलांना खरेदी देण्याचे ठरविले आहे. संचदाखल रक्कम स्विकारून खरेदीपुर्व करारपत्र करून दिलेले आहे. ठरले प्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुरा केला जाणार आहे. सबब सदर मिळकती बाबत कोणाचा कसलाही कायदेशीर हक्क संबंध अधिकार असलेस तो त्यांनी कागदपत्रासहीत खाली नमुद पत्यांवर आजपासुन (७)दिवसात कळवावा. मुदतीत हरकत न आलेस ठरलेप्रमाणे खरेदी व्यवहार पुर्ण करणेत येईल मुदती नंतर आलेली हरकत आमचे अशिलांचेवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी म्हणून दिली जाहिर नोटीस सही

ता. १३.०४. २०२६

**ॲड.एम.के.मंगसुळे**

**के/ऑफ १८/५७७ /१ कौस्तुभ शाहुनगर गल्ली नं. १ इचलकरंजी मो.नं.९९६०३१५८९४**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की.

मिळकतीचे वर्णन :– इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं.६९० हि.क्र.१ब याचे एकूण क्षेत्र ७९००–० चौ.मी. यापैकी बिगरशेती प्लॉट नं.१९ याची मोजमापे पुर्वपश्चिम १३ मिटर व दक्षिणउत्तर २० मिटर याचे २७९७–६ चौ.फुट याचे २६०–० चौ.मी. ची खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस– प्लॉट नं.२० ची मिळकत, पश्चिमेस– प्लॉट नं.१८ ची मिळकत, दक्षिणेस– ९ मी. रुंदीचा मिळकत, उत्तरेस– प्लॉट नं.१६ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत श्री. चंद्रशेखर सुधाकर फडणीस, सौ.निलांबरी चंद्रशेखर फडणीस, दोघे रा.महालक्ष्मी कॉलनी, आपटेनगर, कोल्हापूर यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारदाखल रक्कम स्विकारुन करारपत्र लिहून आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा दिलेला आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येणार आहे.

सबब वर नमुद मिळकतीवर कोणाचा काही कायदेशीर हक्क, करार, दावा, कर्ज, लिज, दान, जप्ती आदेश, ॲक्वीझिशन व रिझर्व्हेशन इ. कसलाही हक्कसंबंध असलेस तो त्यांनी ७ (सात) दिवसात खाली नोटीस प्रसिध्द करणार यांना लेखी स्वरुपात कागदपत्रासहीत कळवावा. मुदतीत कोणाची काही हरकत न आलेस मिळकत निर्वेध समजून व्यवहार पुरा केला जाईल म्हणून प्रसिध्द केली नोटीस.ता.१५/०४/२०२६

**ॲड. धीरज पृथ्वीराज पारख**

**१०/५, पवन रेडिमेड, तारा हॉटेल जवळ, इचलकरंजी मो. नं. ९९२२०९९५६७**

# कोल्हापूरातील संभाजीनगर बसस्थानकाला मिळाला मुहूर्त

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते आज होणार उद्घाटन

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर शहरातील संभाजीनगर बसस्थानकाची उभारणी होऊन कित्तेक दिवस लोटले तरीही हे बसस्थानक उद्घाटनाच्या प्रतिक्षेतच होते.या ना त्या कारणांनी या बसस्थानकाचे उद्घाटन लांबणीवर पडले होते. मात्र बऱ्याच दिवसांच्या प्रतिक्षेनंतर आता आज शुक्रवारी परिवहन मंत्र्यांच्या हस्ते या बसस्थानकांचे उद्घाटन होत आहे.ही समाधानाची बाब आहे.**




महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे शुक्रवार, ता. १७ एप्रिल रोजी कोल्हापूर दौऱ्यावर येणार असून त्यांच्या हस्ते शासन निधीतून बांधण्यात आलेल्या कोल्हापूर शहरातील एसटीच्या नूतन छत्रपती संभाजीनगर बसस्थानकासह चार बसस्थानकांचे उद्घाटन होणार आहे. शुक्रवार, ता.१७ एप्रिल रोजी सकाळी १०.१० वाजता कोल्हापूर विमानतळ येथे आगमन होणार आहे. सकाळी १०.२० वाजता शासकीय विश्रामगृह येथे प्रयाण, आगमन व राखीव, सकाळी ११ ते ११.२० वाजता कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानक येथे आगमन व बसस्थानकाची पाहणी करणार आहेत. सकाळी ११.२० वाजता कोल्हापूर बस स्थानक येथून श्री क्षेत्र अंबाबाई मंदिराकडे प्रयाण करणार असून सकाळी ११.३० ते १२ दरम्यान श्री क्षेत्र अंबाबाई मंदिराचे आगमन व दर्शन घेणार आहेत. दुपारी १२ वाजता वाठार बसस्थानकाकडे प्रयाण तर दुपारी १२.२० वाजता वाठार येथे आगमन व बसस्थानक उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती दर्शविणार आहेत.

दुपारी १२.३० वाजता वाठार येथून ते पेठवडगावकडे प्रयाण करणार आहेत. दुपारी १२.४० वाजता पेठवडगाव येथे बसस्थानकाचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. दुपारी १ वाजता पेठवडगाव येथून नृसिंहवाडीकडे प्रयाण करून दुपारी १.४० वाजता नृसिंहवाडी येथे दत्त मंदिराचे दर्शन घेणार आहेत.दुपारी २ वाजता नृसिंहवाडी येथून जयसिंगपूरकडे प्रयाण करणार असून जयसिंगपूर येथील बसस्थानक लोकार्पण सोहळा कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ वाजता जयसिंगपूर येथून राजेंद्र पाटील–यड्रावकर यांच्या निवासस्थानाकडे प्रयाण करून आम. राजेंद्र पाटील–यड्रावकर यांची सदिच्छा भेट देणार आहेत.त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज बसस्थानकाकडे प्रयाण करून दुपारी छत्रपती संभाजी महाराज बसस्थानक येथे इमारतीचे लोकार्पण करणार आहेत. त्यानंतर शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण करून रात्री ८ वाजता शासकीय विश्रामगृह येथून कोल्हापूर विमानतळाकडे प्रयाण करून मुंबईकडे रवाना होणार करणार आहेत.

# कुरूंदवाडात मतदार पुनर्निरीक्षण शिबीर संपन्न

कुरुंदवाड,ता.१६(प्रतिनिधी)–

**लोकशाहीमध्ये प्रत्येक मतदाराचे नाव यादीत असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे, हीच गरज ओळखून कुरुंदवाड येथील जामिया हजरत अबुहुरेरा (रजि.) या संस्थेच्या वतीने मतदार सखोल पुनर्निरीक्षण विशेष शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले होते.**



या शिबिरामध्ये कुरुंदवाड शहर, शिरोळ तालुका आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या सुमारे दोनशेहून अधिक लाभार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून या सुविधेचा लाभ घेतला.मतदार यादीतील नाव नोंदणी, दुरुस्ती आणि स्थलांतर या प्रक्रियेत नागरिकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शासन नियुक्त बूथ लेवल ऑफिसर प्रकाश पुजारी आणि शोभा सोनलकर, निशिकांत ढाले यांनी उपस्थित राहून नागरिकांचे अर्ज भरून घेतले.ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने फॉर्म भरण्याबाबत त्यांनी नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन केले.

हा लोकशाहीपूरक उपक्रम यशस्वी करण्यासाठी जामिया हजरत अबुहुरेरा संस्थेचे संचालक जुबेर अहमद मोकाशी व मुफ्ती फिरोज गोदड यांच्या नेतृत्वाखाली विशेष टीमने काम पाहिले तसेच मुफ्ती फिरोज, मुफ्ती असगर, मौलाना अर्शद, मौलाना असद, मौलाना युसूफ, जुबेर मतवाल, आफताब मुजावर, अजीम हुक्कीरे, अनस मतवाल,सिद्दीक बागवान, एम.साद इम्तियाज मैंदरगे यांनी विशेष मेहनत घेऊन नागरिकांना सहकार्य केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन प्रसंगी नगरसेवक मदन कारंडे,नंदकुमार पाटील,पांडूरंग लाखे व इतर.

## आरपीआयच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

इचलकरंजी,ता.१६

**आरपीआयच्यावतीने थोरात चौक गावभाग पोलीस स्टेशनजवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन शिव शाहू आघाडीचे प्रमुख, नगरसेवक मदन कारंडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी नंदकुमार पाटील,पांडूरंग लाखे,संजय गोसावी,शंकर लाखे,चंद्रकांत जावळे,विजय जावळे, धनपाल जावळे,अशोक लाखे,भोपाल लाखे,विठ्ठल जावळे, शामराव जावळे, महिपती लाखे,शिवाजी लाखे, शांताराम लाखे, बाळू लाखे,किरण लाखे, प्रताप लाखे, विनायक जावळे, उमेश जावळे,सुरज लाखे यांच्यासह आरपीआयचे कार्यकर्ते व कोल्हाटी–डोंबारी समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैभव नागरी पतसंस्थेला ५८.७२ लाखाचा नफा-कांबळे

इचलकरंजी,ता.१६–

**येथील वैभव नागरी पतसंस्थेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ५८ लाख ७२ हजार रुपये निव्वळ नफा झाला आहे, याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष मारुती कांबळे यांनी दिली.**



संस्थेचे वसुल भागभांडवल ८५.९७ लाख रुपये असून राखीव निधी व इतर निधी ३०.३६ कोटी रुपये आहे. संस्थेकडे एकूण ठेवी १४.४३ कोटी इतके असून संस्थेने १०.६३ कोटी रुपये कर्जवाटप केले असून संस्थेने इतर बँकेत ९.०२ कोटी इतकी गुंतवणुक केलेली आहे. संस्था स्थापनेपासून सतत अ वर्गात असून संस्था सभासदांना सतत १६ वर्षे १५ टक्के प्रमाणे लाभांश वाटप करीत आहे. याप्रसंगी संचालक राजेश सावंत, महादेव कारंडे, उद्धव आवळकर, सदाशिव हिरवे, आनंदा म्हेतर, रमेश कौंदाडे, अशोक कांबळे, सुदेश सावंत, राजू जथे, श्रीमती सुमन दुधाणे, सौ.अनिता माळी उपस्थित होते.

## कोल्हापूर येथे २२ व २३ एप्रिलला उद्बोधन कार्यशाळा

हेरले,ता.१६(प्रतिनिधी)–

**जिल्हास्तरीय प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांची उद्बोधन कार्यशाळा बुधवार ता.२२ व गुरुवार ता.२३ एप्रिल २०२६ अखेर मुख्याध्यापक संघ कोल्हापूर येथे संपन्न होणार आहे.**

सदर कार्यशाळा ही माध्यमिक शिक्षण विभाग जि.प.कोल्हापूर, माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ कोल्हापूर तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रयोगशाळा कर्मचारी महासंघ शाखा – कोल्हापूर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमानाने होतआहे. सदर कार्यशाळेला उपस्थित राहावे,असे आवाहन कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाचे अध्यक्ष एस.डी.लाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# नृसिंहवाडीत श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी साजरी

नृसिंहवाडी,ता.१६(प्रतिनिधी)–

**येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठ दत्तधाममध्ये हजारो भाविक,सेवेकऱ्यांच्या उपस्थितीत ''श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी''भक्तीमय वातावरणात साजरी झाली.**

यावेळी 'श्री स्वामी समर्थ' नामस्मरणाने दत्तधाम दुमदुमला. पुण्यतिथीनिमित्त गेले सात दिवस सुरु असलेल्या सामुहिक श्री गुरुचरित्र वाचन पारायण सोहळा,अखंड नाम, जप, यज्ञ सप्ताहाची सांगता याज्ञिकी विभागाकडुन विधीवत मंत्रोच्चाराने बली पुर्णाहुती देऊन करण्यात आली. यानंतर यजमानांच्या हस्ते सत्यदत्त पुजन करण्यात आले.समस्त सेवेकऱ्यांचे कुलदैवतस्वरुपी मनीमल्हार संहारक श्री खंडेराय महाराज यांना पुरुष सेवेकरी प्रतिनिधीच्या हस्ते सदानंदाचा येळकोट......येळकोट.... येळकोट... जय मल्हार...श्री खंडेराय महाराज की जय असा वाद्यांच्या गजरात जयजयकार करीत पाच अलंकार अर्पण करण्यात आले.कुलदेवी आई भगवती देवीला महिला सेवेकऱ्यांच्या हस्ते उदयोस्तु....श्री महाकाली..... महालक्ष्मी..... महासरस्वती ...... श्री अंबामाता की जय असा जयजयकार करीत विविध अकरा अलंकार अर्पण करण्यात आले.गेले सात दिवस चोवीस तास अखंड नाम, जप, प्रहरी सेवा सुरु होती. ती विधिवत मंत्रोच्चाराने यजमानांच्या हस्ते उतरवून घेऊन सांगता करण्यात आली.



सकाळी मान्यवर सेवेकऱ्यांच्या हस्ते महानैवद्य आरती झाली.आरतीसाठी हजारो महिला, पुरुष सेवेकरी उपस्थित होते.आरतीनंतर महाप्रसाद झाला.याचा हजारो भाविक, सेवेकऱ्यांनी लाभ घेतला.

दरम्यान सप्ताहामध्ये नित्य स्वाहाकार, हवनयुक्त श्री गणेश याग, मनोबोध याग,श्री स्वामी याग, श्री चंडी याग,श्री गीताई याग,श्री मल्हार याग,श्री रुद्र याग झाले.सप्ताहात चोवीस तास अखंड प्रहरी सेवा श्री स्वामी चरणी रुजु करण्यात आली.सप्ताहाकाळात सामुहिक श्री दूर्गा सप्तशती,श्री मल्हार सप्तशती,श्री स्वामी चरित्र सारामृत,पर्जन्य सुक्त,श्री स्वामी समर्थ मंत्र,महामृत्युजंय मंत्र,नर्वानव मंत्र,गायत्री मंत्र,श्री विष्णुसहस्त्रनाम आदी सेवा श्री स्वामी चरणी रुजु करण्यात आल्या.

पुण्यतिथीनिमित्त मंदिरात आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती.गाभारा रंगीबेरंगी फुलांनी सजविण्यात आला होता.स्वामीमुर्तीला विविध अलंकार परिधान केले होते.दिवसभर श्री स्वामीचे दर्शन घेण्यासाठी भाविक, सेवेकऱ्यांची गर्दी होती.

## ईश्वरपूर येथे व्यसनमुक्ती कार्यकर्त्यांची रविवारी कार्यशाळा

ईश्वरपूर,ता.१६(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र व्यसनमुक्ती अभियानांतर्गत सांगली जिल्हास्तरीय व्यसनमुक्ती कार्यकर्त्यांची कार्यशाळा रविवारी ता. १९ रोजी ईश्वरपूर येथे पार पडणार आहे. राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी व संजीवन शिक्षण व समाज विकास संस्था, ईश्वरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.**

सकाळी १०.३० वाजता उद्घाटन होईल. प्राचार्य डॉ.नितीन शिंदे हे प्रमुख पाहुणे आहेत. अध्यक्षस्थानी प्रा. शारामराव पाटील हे आहेत. पहिल्या सत्रात सकाळी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांकडून पथनाट्य सादर होणार आहे. त्यानंतर डॉ.कालिदास पाटील यांचे ''ध्यास व्यसनमुक्तीचा''या विषयावर व्याख्यान होईल. दुपारी १ वाजता धर्मवीर पाटील यांचे 'प्रसारमाध्यमे व व्यसनमुक्ती' या विषयावर व्याख्यान आहे. दुसऱ्या सत्रात दुपारी २ वाजता डॉ. राहुल मोरे यांचे 'व्यसनाचे शारीरिक दुष्परिणाम' या विषयावर व्याख्यान होईल. दुपारी ३ वाजता डॉ.शैलजा पाटील व सर्जेराव कचरे यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांशी संवाद स्वरूपातील चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेसाठी व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## नागेश गायकवाड आदर्श वृत्तपत्र विक्रेता पुरस्काराने सन्मानित

कुरुंदवाड,ता.१६(प्रतिनिधी)–

**येथील वृत्तपत्र विक्रेते नागेश गायकवाड यांना त्यांच्या प्रामाणिक व सातत्यपूर्ण सेवेसाठी ''आदर्श वृत्तपत्र विक्रेता''पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वृत्तपत्र वितरण क्षेत्रात अनेक वर्षांपासून त्यांनी दिलेल्या योगदानाची ही दखल मानली जात आहे.**



वृत्तपत्र विक्री व्यवसाय अत्यंत प्रामाणिकपणे काम करत असून, या व्यवसायाची परंपरा त्यांनी आजतागायत जपली आहे. बदलत्या काळातही वृत्तपत्र वाचनाची सवय नागरिकांमध्ये टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी सातत्याने परिश्रम घेतले आहेत. वेळेवर आणि नियमित सेवा देत त्यांनी वाचकांचा विश्वास संपादन केला आहे.सध्या ते वृत्तपत्र संघटनेच्या तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारीही समर्थपणे सांभाळत आहेत.

संघटनेच्या माध्यमातून विक्रेत्यांचे प्रश्न सोडवणे, त्यांच्या हक्कांसाठी प्रयत्न करणे यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना प्रदान करण्यात आलेला ''आदर्श वृत्तपत्र विक्रेता'' पुरस्कार हा त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव असून, यामुळे इतरांना देखील प्रेरणा मिळणार आहे.

# नागाव येथे नुतन सदस्यांचा सत्कार

हेरले,ता.१६(प्रतिनिधी)–

**नागाव (ता.हातकणंगले) येथे महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भिमोत्सव – २०२६ या कार्यक्रमाच्या अनुषंगाने हातकणंगले तालुक्याचे नूतन सभापती, जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी नागाव यांच्या वतीने सत्कार समारंभ संपन्न झाला.**

यावेळी हातकणंगले पंचायत समिती सभापती अश्विनी बिरांजे, जिल्हा परिषद सदस्या डॉ.वर्षा सावर्डेकर, जिल्हापरिषद सदस्य आतिश शिंगे, राहुल आवळे, पंचायत समिती सदस्य अरुण माळी, पंचायत समिती सदस्या सौ.कमल कौंदाडे यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.तसेच मंगळवारी सायंकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

या कार्यक्रमांना माजी आम.डॉ.सुजित मिणचेकर, नागावचे उपसरपंच सुधीर उर्फ बंटी पाटील,ग्रामपंचायत सदस्य श्रेयस नागावकर,अमित खांडेकर,ग्रामपंचायत सदस्या सौ.अश्विनी पाटील,सुलोचना कांबळे, मौसमी कांबळे यांच्यासह गावांतील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाबरोबर महिलांसाठी महाराष्ट्र फेम उत्कृष्ट निवेदक राहुल कदम यांचा होममिनिस्टर कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला महिलांची मोठी उपस्थिती होती. या भिमोत्सव २०२६ च्या होममिनिस्टर विजेत्या सौ. शोभा विलास कांबळे या झाल्या.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १७/०४/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दुपारी १ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
आदत
जबदस्त रोमँटीक हिंदी चित्र
दुपारी ४ व ७ वा.
A बदन की खुशबू प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १७ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
लो वेट निको
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्रवार दि. १७ पासून
अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
book my show
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ *१२ *३ *६ *९ वा.





भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा ५ वा आठवडा
११.१५ - ३.१५ - ७.१५ वा.
खास कमी केलेल्या दरात ति.दर रु. ५०



कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.१७ पा
१२, ३, ६, ९ वा
सुपरहिट फुल्ल कॉमेडी चित्रपट



गुरु शुक्रवार ता.१७ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ४ खेळ १२.३०*३.३०*६.३० व ९.३० वा.
डायरेक्टर प्रियदर्शन व अक्षयकुमारची सुपरक्रेझी हॉरर कॉमेडी



RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 book my show


" भूत बंगला " - हिंदी
10:00 AM, 01:30 PM
04:00 PM, 06:30 PM
07:15 PM, 09:30 PM
10:15 PM
" द मम्मी " - हिंदी
11:00 AM, 07:45 PM
10:30 PM
" धुरंधर 2" - हिंदी ( A )
11:30 AM, 02:00 PM
" सालबर्डी " ( मराठी )
04:30 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11


भूत बंगला (HIN) (U/A)
10.30am, 01.30, 04.30, 07.30, 10.30pm
धुरंधर २ (HIN) (A)
01.00, 05.30, 10.00pm
द ममी (HIN) (A)
10.30am, 05.15,10.15pm
सुपर डुपर (MAR) (U/A)
07.45pm
सालबर्डी (MAR) (A)
02.30pm
फुला (MAR) (U/A)
11.45am
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# वेण्णा नदीची पूररेषा निश्चित करण्यास तीव्र विरोध

## बैठकीत स्थानिकांची आक्रमक भूमिका; पूर नियंत्रण रेषेचे नियम शिथिल करावेत

महाबळेश्वर,ता.१६(प्रतिनिधी)-

**महाबळेश्वर येथील ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या वेण्णा नदीची पूररेषा निश्चित करण्याच्या हालचाली प्रशासकीय पातळीवर सुरू झाल्या आहेत.या पार्श्वभूमीवर उच्चस्तरीय सनियंत्रण समितीच्या सूचनेनुसार तहसीलदार सचिन म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली महाबळेश्वर नगरपालिकेत नगराध्यक्षांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.**



महाबळेश्वर नगरपालिकेत आयोजित बैठकीवेळी नगराध्यक्ष सुनील शिंदे, मुख्याधिकारी योगेश पाटील,अन्य प्रमुख मान्यवर व नागरिक.

या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पूररेषा निश्चित करण्यास तीव्र विरोध दर्शवत, महाबळेश्वर हे नदीचे उगमस्थान असल्याने येथील नियम शिथिल करण्याची मागणी केली आहे.या बैठकीला नगराध्यक्ष सुनील शिंदे, मुख्याधिकारी योगेश पाटील,कण्हेर पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता अमित तपासे,उपनगराध्यक्ष नासिर मुलाणी, माजी नगराध्यक्ष डी. एम. बावळेकर आणि स्थानिक व्यावसायिक उपस्थित होते.

नियमानुसार, मागील २५ वर्षांतील पावसाचा विचार करून ब्लू लाईन (निळी रेषा)आणि १०० वर्षांतील पावसाचा अंदाज घेऊन रेड लाईन (लाल रेषा) निश्चित केली जाते.लिंगमळा ते सांगलीपर्यंत ही रेषा निश्चित करण्यात आली आहे, परंतु वेण्णा लेक ते लिंगमळा दरम्यानच्या ४.५ किलोमीटर अंतराची पूररेषा निश्चित करण्याचे काम सध्या प्रलंबित आहे हे काम पोलीस बंदोबस्तात करण्याच्या सूचना आहेत परंतु त्यापूर्वी स्थानिकांना याची कल्पना द्यावी म्हणून ही बैठक घेण्यात आली असल्याचे पाटबंधारे विभागाचे श्री.तपासे यांनी स्पष्ट केले. बैठकीत नदी किनारी असलेल्या स्थानिकांनी या प्रश्नावर विरोध करून आक्रमक भूमिका मांडली.

महाबळेश्वर हे नदीचे उगमस्थान आहे. नदी येथे प्रवाही नसून तिचे पाणी थेट दरीत कोसळते.त्यामुळे येथे पूर येण्याचा तांत्रिकदृष्ट्या प्रश्नच उद्भवत नाही. नदी सध्या गाळाने भरलेली आहे. चार वर्षांपूर्वी गाळ काढून पात्र खोल केल्यावर पुराचा कोणताही धोका निर्माण झाला नव्हता. पुन्हा नदीत माती गेल्याने पात्र उथळ झाले आहे, अशी भूमिका मांडून रेषा निश्चित करण्यास स्थानिकांनी कमालीचा विरोध केला.केवळ समितीच्या हट्टापायी ही जाचक पूररेषा लादली जाऊ नये,अशी भावना व्यक्त करण्यात आली.

तहसीलदार सचिन म्हस्के यांनी स्पष्ट केले की,शासन कोणत्याही परिस्थितीमध्ये जीवितहानी टाळण्याला प्राधान्य देत आहे. पूररेषा निश्चित करणे म्हणजे नागरिकांना विस्थापित करणे नव्हे, तर सुरक्षितता सुनिश्चित करणे आहे.२०२१ मध्ये आलेल्या मोठ्या पुरात अनेक हॉटेल्समध्ये पाणी शिरल्याची आठवण करून देत त्यांनी सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले.तसेच,पोलीस संरक्षणात काम करण्याच्या सूचना असल्या तरी स्थानिकांनी पुढाकार घेऊन नदी वाचवा अभियानात सहभागी व्हावे,असे आवाहन त्यांनी केले.

महाबळेश्वर हे उगमस्थान असल्यामुळे येथील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन नियमांमध्ये शिथिलता मिळावी, यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय या बैठकीत स्थानिकांनी घेतला. प्रशासनची भूमिका तहसीलदार म्हस्के यांनी मांडली परंतु स्थानिकांनी केलेल्या विरोधामुळे पूररेषा निश्चित करण्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे या प्रश्नावर उच्चस्तरीय सनियंत्रण समिती काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.या बैठकीला नगरसेवक संजय जंगम, अफजल सुतार, रवी कुंभारदरे, असिफ मुलाणी, रोहित ढेबे,राजू नालबंद, तसेच स्थानिक दत्ता वाडकर, शरद बावळेकर, शंकर जांभळे, शंकर ढेबे, हेमंत शिंदे, सुनील ढेबे, वाईकर आदी उपस्थित होते.



करवडीः स्मार्ट मीटर विरोधात ठिय्या आंदोलनप्रसंगी हिंदकेसरी संतोष वेताळ व उपस्थित ग्रामस्थ.

## स्मार्ट मीटरवरून करवडी ग्रामस्थांचा ठिय्या

कराड,ता.१६(प्रतिनिधी)-

**स्मार्ट मीटर बसवण्याच्या प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत करवडी (ता.कराड) येथील ग्रामस्थांनी ओगलेवाडी येथील वीज वितरण कार्यालयावर ठिय्या आंदोलन छेडले. तब्बल चार तास चाललेल्या या आंदोलनामुळे कार्यालयाचे कामकाज विस्कळीत झाले होते.**

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, वीज वितरण कंपनीकडून कोणतीही पूर्वसूचना किंवा ग्राहकांची सहमती न घेता सुमारे २०० घरांमध्ये जुन्या मीटरऐवजी स्मार्ट मीटर बसवण्यात आले.या मनमानी कारभाराविरोधात संतप्त झालेल्या नागरिकांनी एकत्र येत कार्यालयाच्या प्रवेशद्वारात ठिय्या देत जोरदार निदर्शने केली. आंदोलनावेळी हिंदकेसरी संतोष वेताळ, सीमा घार्गे, शिवाजी चव्हाण, तुकाराम नलवडे, अमित डुबल यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी सहमतीशिवाय बसवलेले स्मार्ट मीटर तात्काळ काढून जुने मीटरच पुन्हा बसवावेत, अशी ठाम मागणी केली. दरम्यान,कार्यकारी अभियंता बाळासाहेब मोहिते यांनी आंदोलनस्थळी येऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल,तसेच यापुढे ग्राहकांची संमती घेतल्याशिवाय स्मार्ट मीटर बसवले जाणार नाहीत, असे लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले.



आष्टा : शिष्यवृत्ती जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना डॉ.अण्णासाहेब डांगे,मुख्याध्यापक रघुनाथ बोते आदी मान्यवर.

## अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती

आष्टा,ता.१६(प्रतिनिधी)-

**प्राथमिक,माध्यमिक आश्रमशाळा तसेच डॉ.अण्णासाहेब डांगे कनिष्ठ महाविद्यालय येथील चार खेळाडूंना राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली असून त्यांची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

सुजल शंकर धुर्वे, रोहित दिपक बोकारे, रोहित राजेंद्र अहिरे आणि वैभव सुरेश ढगे या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याच्या जोरावर ही कामगिरी केली आहे. त्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने डॉ.अण्णासाहेब डांगे यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.अण्णासाहेब डांगे, सचिव ॲड.राजेंद्र उर्फ चिमण डांगे,सहसचिव विश्वनाथ डांगे, व्यवस्थापक सुनील शिनगारे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ.एल.वाय.वाघमोडे, मुख्याध्यापक रघुनाथ बोते यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्र.मुख्याध्यापक विकास बेंद्रे, आनंदराव मेटकरी,क्रीडा प्रशिक्षक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## महिला व बाल विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी-पाटील

सातारा,ता.१६(प्रतिनिधी)-

**जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या योजना खास करुन महिला व बालकांसाठी आहेत. त्यांच्यासाठी असणाऱ्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करुन महिला व बालकांना दिलासा द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीचा जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी आढावा घेतला. या आढावा बैठकीला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव निना बेदकर, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत थोरात, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शिल्पा पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हा महिला व बाल विकास विभागाकडे निधी हा ज्या बँका शासकीय योजनांना वित्त पुरवठा करतात अशा बँकांमध्येच पैसे ठेवावेत, असे निर्देश देऊन जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, कोणत्याही आस्थापनेवर बाल कामगार काम करणार नाही यासाठी वेळोवेळी तपासणी करावी. तसेच ज्या बालकामगारांची सुटका केली आहे ते बाल कामगार सध्या काय करीत आहेत. याचीही पडताळणी करावी.

# जिल्हा परिषदेच्या परंपरेला साजेसे काम करावे

## आ.जयंतराव पाटील; कासेगावात नूतन जिल्हा परिषद सदस्यांचा सत्कार

ईश्वरपूर,ता.१६(प्रतिनिधी)-

**आपण सर्वांनी हातात-हात घालून सांगली जिल्हा आणि जिल्हा परिषदेचा इतिहास आणि परंपरेला साजेसे काम करून जिल्ह्यातील जनतेचा विश्वास सार्थ करा,सांगली जिल्हा परिषदेस राज्यातील नंबर एकची जिल्हा परिषद बनवा,असा सल्ला आ.जयंतराव पाटील यांनी जिल्हा परिषदेतील नूतन पदाधिकारी व सदस्यांना दिला.**




कासेगाव येथे जि.प.अध्यक्षा संगीता पाटील,उपाध्यक्ष ऋषिकेश लाड यांच्या सत्कारप्रसंगी आ.जयंतराव पाटील,खा.विशाल पाटील,आ.विश्वजित कदम व अन्य मान्यवर.

दरम्यान, आपण आघाडीचे सरकार असताना २०१९ साली जिल्ह्यात स्मार्ट पीएचसी हा उपक्रम राबविला. त्यानंतर जिल्ह्यात ४२ लाख रुग्णांनी प्राथमिक आरोग्य केंद्राचा लाभ घेतला आहे.हे स्मार्ट पीएचसीचे मोठे यश आहे,असे उद्गारही त्यांनी काढले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील यांच्या पुढाकाराने कासेगाव ग्रामस्थांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.

कासेगाव येथे जि.प.अध्यक्षा सौ. संगीता पाटील, उपाध्यक्ष ऋषिकेश लाड, पं.स.सदस्या सुप्रिया देवराज पाटील,तसेच सर्व सभापती आणि जि.प.,पं.स.सदस्यांचा सत्कार करण्यातआला.याप्रसंगी खा. विशाल पाटील, आ.विश्वजीत कदम, शिवाजीराव नाईक, मानसिंग नाईक, विक्रम सावंत, मनोज शिंदे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील,माजी अध्यक्ष अविनाश पाटील,ॲड.बाबासो मुळीक, बाळासाहेब पाटील,विजयराव पाटील, सौ. सुस्मिता जाधव प्रामुख्याने उपस्थित होते.

खा.विशाल पाटील म्हणाले, आमच्या पिढीने दादा-बापू वाद काय आहे? हे समजून घेतला नाही आणि गैरसमजातून तो वाढत गेला. त्यातून जिल्ह्याचे नुकसान झाले, आता आम्ही सर्व बाजूला ठेवून जातीयवादी विचारांशी लढा देत हे आक्रमण परतवून लावू. महानगरपालिकेत आपण थोडक्यात कमी पडलो. मात्र आम्ही अजून तो प्रयत्न सोडलेला नाही.जिल्हा परिषदेतील विजयात वाळवा आणि शिराळा तालुक्याने मोठे योगदान केलेले आहे. यावेळी विश्वजित कदम, शिवाजीराव नाईक यांचेही मनोगत झाले. यावेळी जि.प.सभापती पृथ्वीराज पाटील, सावित्री रविपाटील, स्नेहल मोरे, दादासाहेब कोळेकर, वाळवा पंचायत समितीचे सभापती उदयसिंह पाटील, उपसभापती प्रकाश पाटील,कवठेमहांकाळ पंचायत समितीच्या सभापती सिंधुताई पाटील, उपसभापती वामन कदम यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी देवराज पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.सरपंच कल्पना गावडे यांनी आभार मानले.

## युवकांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा-निलेश पवार

कराड,ता.१६(प्रतिनिधी)-

**युवकांनी शासकीय योजनांचा लाभ घेऊन प्रगती करावी, असे प्रतिपादन उमेद तालुका अभियान व्यवस्थापक निलेश पवार यांनी केले.**

बनवडी (ता.कराड) येथील संदीप साळुंखे व ग्रामपंचायत सदस्या सौ. पल्लवी साळुंखे यांनी उमेद अभियानातून नवीन व्यवसायाचा शुभारंभ केला. यावेळी प्रभाग समन्वयक करण जाधव, डॉ.वर्षा पवार, कस्तुरी महिला प्रभागसंघ, सैदापूरच्या अध्यक्षा सौ. साधना जाधव,सचिव सौ. उज्ज्वला शिरसाठ, कोषाध्यक्ष सौ. प्रतीक्षा जाधव,नारीशक्ती महिला ग्रामसंघ बनवडीच्या अध्यक्ष सौ. शुभांगी धुमाळ,सचिव सौ.वैशाली कोठावळे आदी उपस्थित होत्या.

# वस्त्रोद्योगातील वीज दर सवलतीसाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत वाढवा

विटा,ता.१६(प्रतिनिधी)-

**वस्त्रोद्योगातील वीज दर सवलतीसाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत वाढवावी, अशी मागणी यंत्रमागधारकांच्यावतीने राज्य शासनाकडे केली आहे, अशी माहिती विटा यंत्रमाग संघाचे अध्यक्ष किरण तारळेकर यांनी दिली आहे.**

किरण तारळेकर म्हणाले, महाराष्ट्र शासनाने राज्यातील विकेंद्रित वस्त्रोद्योगातील विविध घटकांना वीज दरात सवलत देण्याचे धोरण घेतलेले असून सदर सवलत मिळण्यासाठी यंत्रमाग,सायझींग, सूतगिरण्या यासारख्या सर्व वस्त्रघटकांना ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य केले आहे. वस्त्रोद्योग विभागाच्यावतीने नोंदणी करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेला फॉर्म एवढा विस्तृत व किचकट आहे की, राज्यातील विविध वस्त्रोद्योग केंद्रातील छोट्या यंत्रमागधारकांना गेल्या दोन वर्षात तो फार्म भरुन नोंदणी करता आलेली नाही. तसेच ज्यांनी नोंदणी करण्याचा प्रयत्न केला त्यांना वारंवार काही तरी त्रुटी व अपूर्तता दर्शवली जात असल्याने अपवाद वगळता सर्वांचीच नोंदणी प्रलंबित राहिली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच यंत्रमाग संघटनांनी सदर नोंदणी रद्द करावी किंवा नोंदणी सुलभ व सोपी करावी अशी मागणी केली होती. त्यावर काही दिवसांपूर्वी वस्त्रोद्योग विभागाच्यावतीने, नोंदणीचा अर्ज सुलभ व सोपा केला असून राज्यातील सर्व घटकांनी २६ एप्रिल पुर्वी आपापली नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले होते.

**यंत्रमागधारकांचे शासनाला साकडे**

या पार्श्वभूमीवर अनेक यंत्रमागधारकांनी पुन्हा नोंदणी करण्याचा प्रयत्न केला.परंतु अद्यापही सदरचा नोंदणी अर्ज जवळपास पूर्वीसारखाच किचकट असल्याने बहुतांशी यंत्रमागधारकांना आपली नोंदणी पूर्ण करता आलेली नाही.त्यामुळे सदर वस्तुस्थितीचा विचार करता नोंदणी करण्यासाठी किमान एक वर्ष मुदत वाढवावी व सदर नोंदणी अर्ज आणखी सुलभ करावा, अशी मागणी सर्वच यंत्रमाग संघटनांनी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# शेतजमीन भकास करून विकास करणे योग्य नाही

## कॉ.धनाजी गुरव; जुनेखेडमध्ये शेतकरी संवाद सभा

वाळवा,ता.१६(वार्ताहर)-

**देशाचा व राज्याचा विकास व्हायलाच पाहिजे, मात्र त्यासाठी सुपीक शेतजमिनी भकास करून विकास करणे योग्य नाही, असा ठाम विरोध कॉम्रेड धनाजी गुरव यांनी व्यक्त केला. वाळवा तालुक्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाबाबत जनजागृती करताना जुनेखेड येथे आयोजित शेतकरी संवाद सभेत ते बोलत होते.**



जुनेखेड येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना वाळवा तालुका शक्तीपीठ विरोध संघर्ष समितीचे सदस्य कॉम्रेड धनाजी गुरव.

यावेळी पुढे बोलताना गुरव म्हणाले की, शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्या प्रलंबित ठेवून ठराविक उद्योगपतींच्या फायद्यासाठी सरकार निर्णय घेत आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिक कर्जाच्या ओझ्याखाली असताना, त्यात आणखी भर घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र हा मनसुबा कधीही यशस्वी होऊ देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

शेतकरी नेते बी.जी.पाटील यांनीही शक्तीपीठ महामार्गाच्या वास्तवावर भाष्य करताना सांगितले की,कृष्णा काठावरील वाळवा तालुका हा अत्यंत समृद्ध असून प्रस्तावित महामार्गामुळे या भागाची मोठी हानी होणार आहे. या मार्गामुळे तालुक्याची विकासव्यवस्था कोलमडून पडण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.'आज शेतजमीन वाचवण्यासाठी प्रत्येक शेतकरी, महिला व युवकांनी एकत्र येऊन विरोध करणे आवश्यक आहे,असे आवाहन केले.या जनजागृती सभेला वाळवा तालुका शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचे सदस्य, जुनेखेड गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच शेतकरी उपस्थित होते.

# मुलभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देणार

## आयुक्त संजीता मोहपात्रा यांचे प्रतिपादन

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)-

**शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि ड्रेनेज या मूलभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत नागरिकांना प्रभावी सेवा देण्याचा निर्धार असल्याचे महापालिकेच्या नूतन आयुक्त संजीता मोहपात्रा यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.**




सांगली: नूतन आयुक्त संजीता मोहपात्रा यांचे स्वागत करताना अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे व इतर.

'शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यावर भर देतानाच अतिक्रमण आणि अनधिकृत खोके याविरोधातील कारवाई सुरूच राहणार आहे.वाहतुकीला अडथळा ठरणारी खोकी हटवण्यापूर्वी संबंधितांना पुनर्वसनाचा पर्याय देण्याचा प्रयत्न राहील.थेट कारवाई करण्याऐवजी अगोदर पर्याय, मग बुलडोझर या तत्त्वाचा अवलंब केला जाईल,'असेही मोहपात्रा यांनी सांगितले.

पदभार स्वीकारल्यानंतर आयुक्तांनी पत्रकारांशी संवाद साधला. सांगली, मिरज आणि कुपवाड ही तिन्ही शहरे त्यांच्या परीने विकसित झाली असली, तरी महापालिकेच्या विकास आराखड्याच्या आधारे नियोजनबद्ध विकास साधने आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.विकासात नागरिकांची भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. अतिक्रमणाविरोधातील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी पूर्णवेळ पथक स्थापन करण्यात येणार आहे.परवानाधारक गाळयांमध्ये अवैध प्रकार आढळल्यास पुराव्यांच्या आधारे कठोर कारवाई केली जाईल. हॉकर्स आणि नो-हॉकर्स झोनची अंमलबजावणी राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार काटेकोरपणे करण्याचा प्रयत्न राहील. महापालिकेत सुमारे ६० टक्के पदे रिक्त असल्याने कामकाजावर ताण येत आहे. तांत्रिक पदभरतीसाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल.तसेच एकाच अधिकाऱ्याकडे अनेक जबाबदाऱ्या असण्याची समस्या कमी करण्यावर भर दिला जाईल.शहरातील पार्किंगची समस्या सोडवण्यासाठी बहुमजली वाहनतळ उभारण्याचा पर्याय विचाराधीन असून त्यासाठी योग्य जागांचा शोध घेतला जाणार आहे असे त्यांनी सांगितले आहे.

प्रारंभी अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे,उपायुक्त स्मृती पाटील,अश्विनी पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.त्यानंतर त्यांनी थेट कामकाजाला सुरुवात केली. मदनभाऊ संकुलातील विविध विभागांना भेटी देऊन पाहणी केली.खाते प्रमुखांची बैठक घेत कामकाजाचा आढावाही घेतला.

# कार्यकर्त्यांनी संघटन बांधणीसाठी कामाला लागावे

## लक्ष्मीकांत थोटा; सांगली जिल्ह्यात काँग्रेसच्या सृजन अभियानास प्रारंभ

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)-

**सांगली काँग्रेस कमिटी देशात आदर्श बनवण्याची संधी आहे. त्यासाठी शहरापासून गावापर्यंत तळागाळात नव्याने संघटन बांधण्याच्या कामाला लागावे. पक्षासाठी कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे,असे आवाहन प्रदेश काँग्रेसचे निरीक्षक व तेलंगणा राज्यातील ज्येष्ठ नेते लक्ष्मीकांत राव थोटा यांनी सांगलीत केले.**




सांगली काँग्रेस कमिटीत सृजन अभियानाच्या प्रारंभप्रसंगी लक्ष्मीकांत थोटा, खा. विशाल पाटील व इतर.

काँग्रेसच्या देशव्यापी संघटन सृजन अभियानाची सुरवात काँग्रेस कमिटीत झाली. यावेळी आमदार डॉ.विश्वजीत कदम,खासदार प्रणिती शिंदे,खासदार विशाल पाटील, माजी आमदार दिप्ती चौधरी, जिल्हाध्यक्ष विक्रम सावंत, राज्य निरीक्षक राजेंद्र शेलार, ॲड. अमित खराडे,अजित दरेकर,श्रीमती शैलजा पाटील,जे.के.जाधव, कडेगाव पंचायत समिती सभापती जितेश कदम,शहर जिल्हाध्यक्ष राजेश नाईक, मालन मोहिते, नगरसेवक मयूर पाटील आदी व्यासपीठावर होते.

थोटा म्हणाले,'जिल्हा काँग्रेस कमिटीची नव्याने बांधणी करण्याचा देशव्यापी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.प्रत्येक जिल्ह्याला ताकदीचा, कामाचा, पळणारा नेता द्यायचा आहे. त्याची योग्य निवड तुम्ही करा.कारण,आता जिल्हाध्यक्ष पद हे खूप ताकदीचे असणार आहे. त्यांना उत्तम प्रशिक्षण दिले जाणार आहे. खासदार राहूल गांधी त्यांच्याशी थेट बोलणार आहेत.आता तळागाळात पक्ष नव्याने बांधण्याची ही वेळ आहे.

विशाल पाटील म्हणाले, 'संघटनेच्या पदाला ताकद देण्याची आता गरज आहे.आम्हीदेखील तेच धोरण राबवणार आहोत. पुढे जावून कार्यकर्ते संघटनात्मक संधी मागतील,अशी परिस्थिती निर्माण करू.'प्रणिती शिंदे म्हणाल्या, 'संघटन सृजन अभियान तुम्हाला बोलण्याची, मते मांडण्याची संधी आहे.मोकळेपणाने व्यक्त व्हा आणि पुढे कामाला लागा. प्रा.सिकंदर जमादार यांनी आभार मानले.

**पुढचा खासदार काँग्रेसच्या चिन्हावर**

आमदार विश्वजीत कदम म्हणाले, काँग्रेसची ताकद गेल्या लोकसभेला दिसली आहे. पुढच्या लोकसभेला खासदार काँग्रेसच्या चिन्हावर असेल आणि कुणी गडबड करणार नाही.काँग्रेस आमदारांची संख्यादेखील आम्ही वाढवून दाखवू. त्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच ताकदीने काम करावे.

**इचलकरंजी... तसे हे केवळ एक वस्त्रनगरी म्हणून ओळखले जाणारे औद्योगिक शहर. येथील मानसिकता प्रामुख्याने व्यावसायिक. मात्र, याच मातीत विद्यार्थ्यांना आणि पालकांना उत्तुंग शैक्षणिक गुणवत्तेचे स्वप्न पाहायला लावणारी अन् ती स्वप्ने सत्यात उतरवणारी एक संस्था म्हणजे 'श्रद्धा इन्स्टिट्यूट ऑफ करिअर डेव्हलपमेंट' (SICD). आपल्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर आज या संस्थेने केवळ इचलकरंजीतच नव्हे, तर संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात ध्रुवपद मिळवले आहे.**

## पश्चिम महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षितिजावर तळपणारे नाव

# श्रद्धा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स



**रोपटे झाले वटवृक्ष: चार दशकांचा गौरवशाली प्रवास**

सन १९८४ मध्ये श्री. ए. आर. तांबे यांनी केवळ ३७ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'श्रद्धा क्लासेस' नावाचे एक छोटेसे रोपटे लावले होते. आज ४१ वर्षांनंतर त्याचे रूपांतर 'श्रद्धा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स' या विशाल वटवृक्षात झाले आहे. आजमितीस येथे ८,००० हून अधिक विद्यार्थी ज्ञानाचे धडे गिरवत आहेत. केवळ कोल्हापूरच नव्हे, तर सातारा, सांगली, बेळगाव आणि सिंधुदुर्ग यांसारख्या जिल्ह्यांमधून येणारा विद्यार्थ्यांचा वाढता ओघ, हा या संस्थेच्या उत्कृष्ट कार्यपद्धतीचा आणि पालकांच्या दृढ विश्वासाचा जिवंत पुरावा आहे.

**इंजिनिअरिंग आणि मेडिकलचा खात्रीशीर 'राजमार्ग'**

अकरावी आणि बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी SICD हा यशाचा राजमार्ग ठरला आहे. तांबे सर अभिमानाने सांगतात की, ''गेल्या १६ वर्षांत आमचे २,००० हून अधिक विद्यार्थी IIT, NIT, ICT, COEP आणि VJTI सारख्या नामांकित इंजिनिअरिंग कॉलेजेसमध्ये स्थिरावले आहेत. तसेच, १००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी AIIMS, GS मेडिकल, नायर, बीजे यांसारख्या प्रतिष्ठित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश मिळवून संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे.

**फोर इयर गॅरंटीड प्रोग्रॅम: तणावमुक्त यशाची गुरुकिल्ली**

JEE आणि NEET यांसारख्या राष्ट्रीय परीक्षांचा तणाव कमी करण्यासाठी श्रद्धा इन्स्टिटच्यूटने महाराष्ट्रात एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. इयत्ता नववीपासूनच या परीक्षांची तयारी करून घेणारा '४ इयर्स गॅरंटीड प्रोग्रॅम' संस्थेने सुरू केला. श्रद्धा इन्स्टिटच्यूटच्या या अभिनव उपक्रमाची यशस्वीता यावर्षीच्या निकालातून स्पष्ट झाली आहे. या प्रोग्रामच्या पहिल्याच बॅचमधील अनेक विद्यार्थ्यांनी देशातील नामांकित आयआयटी, एम्स आणि शासकीय मेडिकल कॉलेजेसमध्ये प्रवेश मिळवून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

शंभर टक्के यशाची खात्री आणि तणावमुक्त अभ्यासाचे नियोजन हेच आमच्या संस्थेचे ब्रीद आहे. नववीपासूनच योग्य दिशा मिळाल्यास विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर नक्कीच मोठी मजल मारू शकतात,असा विश्वासही तांबे सरांनी व्यक्त केला.

**कॉमर्स क्षेत्रातील यशाचे प्रवेशद्वार: श्रद्धा ज्युनिअर कॉलेज**

बदलती शासकीय धोरणे, अद्ययावत कर प्रणाली, व्यावसायिक क्षेत्रातील वाढती स्पर्धा आणि जीएसटीची अंमलबजावणी यांसारख्या आर्थिक व कायदेशीर विषयांचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे, या उद्देशाने श्रद्धा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स तर्फे ११ वी व १२ वी कॉमर्स ज्युनिअर कॉलेज सुरू करण्यात आले आहे. येथे १२ वी बोर्ड परीक्षेसोबतच सीए फाउंडेशनची परिपूर्ण तयारी करून घेतली जाते. गुणवत्तेच्या जोरावर दरवर्षी १२ वी बोर्ड परीक्षेत इचलकरंजी शहरात अव्वल येण्याचा बहुमान या कॉलेजने टिकवून ठेवला आहे. केवळ बोर्ड परीक्षाच नव्हे, तर CA Foundation, CUET आणि CLAT यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील



परीक्षांमध्येही संस्थेच्या विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश संपादन करून नामवंत संस्थांमध्ये आपला प्रवेश निश्चित केला आहे.

**स्पर्धा परीक्षेचे वन-स्टॉप डेस्टिनेशन : श्रद्धा इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल सर्व्हिसेस**

मागील वर्षापासून संस्थेने केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगद्वारे घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व श्रद्धा इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल सर्व्हिसेसची स्थापना केली आहे. या उपक्रमाबद्दल बोलताना तांबे सर म्हणतात, ''स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आता इचलकरंजी आणि परिसरातील विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई किंवा दिल्लीसारख्या महानगरांमध्ये जाण्याची गरज नाही. तज्ज्ञ मार्गदर्शक, उत्कृष्ट व्यवस्थापन,डिजिटल क्लासरूम, अद्ययावत अभ्यास साहित्य, टेस्ट सीरिज, सुसज्ज वाचनालय, इंटरनेट सुविधा आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण, तेही अगदी माफक शुल्कात उपलब्ध असल्याने या केंद्राला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.''विद्यार्थी आणि पालकांची वाढती मागणी लक्षात घेऊन संस्थेने या वर्षापासून संयुक्त गट-ब व गट-क, सरळसेवा, बँकिंग आणि पोलीस भरती या परीक्षांचे सखोल मार्गदर्शन सुरू केले आहे. तसेच, विद्यार्थ्यांना सर्व स्पर्धा परीक्षांचे फॉर्म भरण्याची सुविधादेखील आता संस्थेतच उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**श्रद्धा ऑलिंपियाड स्कूल: स्पर्धा परीक्षांच्या तयारीचा श्रीगणेशा**

अकरावी-बारावीत गेल्यावर अचानक जेईई आणि नीट सारख्या परीक्षांचा डोंगर समोर उभा राहतो. या परीक्षांचा ताण विद्यार्थ्यांवर येऊ नये, यासाठी श्रद्धा ऑलिंपियाड स्कूलची स्थापना करण्यात आली आहे.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य सांगताना संस्थापक श्री. ए.आर.तांबे सर म्हणतात,''विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच स्पर्धात्मक परीक्षेची सवय व्हावी, हा आमचा मुख्य उद्देश आहे. येथे इयत्ता पाचवीपासूनच स्टेट बोर्डाच्या अभ्यासक्रमासोबतच डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा NMMS, NTSE आणि MTSE यांसारख्या प्रतिष्ठेच्या परीक्षांची तयारी करून घेतली जाते. यामुळे विद्यार्थ्यांचा पाया इतका भक्कम होतो की, भविष्यात राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये त्यांना हमखास यश प्राप्त होते.''

**रॉयल इंग्लिश मीडियम स्कूल :CBSE) जागतिक दर्जाचे शिक्षण आता आपल्या शहरात**

इचलकरंजीतील पालकांची दीर्घकाळापासूनची मागणी लक्षात घेऊन संस्थेने मागील वर्षापासून रॉयल इंग्लिश मीडियम स्कूल (CBSE) सुरू केले आहे. अभ्यासक्रम हा भारतातील अनेक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांशी थेट जोडलेला आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाच्या (CBSE) अद्ययावत अभ्यासक्रमासोबतच राष्ट्रीय स्तरावरील सर्वच परीक्षांच्या तयारीसाठी लागणारे फाऊंडेशन याचीही तयारी इ. १ ली पासूनच करून घेण्यात येते. यामध्ये विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे सखोल ज्ञान देण्यावर भर दिला जातो. यासोबतच विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकास उत्तमरीत्या घडविण्यासाठी विविध खेळ, उपक्रम, स्पर्धा यांचेही योग्य नियोजन वर्षभरामध्ये करण्यात येते. विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर शिक्षण व करिअर संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने TOEFL आणि IELTS या परीक्षांची तयारी उत्तमरीत्या करून घेण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे संवादकौशल्य, सादरीकरण क्षमता आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. एकाच छताखाली राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करीयरच्या सुवर्णसंधी विद्यार्थ्यांना हस्तगत होण्याच्या दृष्टीने रॉयल इंग्लिश मेडियमचा Schooling Program डिझाईन करण्यात आला आहे.

**शिक्षणासोबतच सामाजिक कृतज्ञतेचे भान; श्रद्धा इन्स्टिट्यूटचा माणुसकीचा वसा**

श्रद्धा इन्स्टिट्यूटने केवळ शैक्षणिक प्रगतीच साधली नाही, तर सामाजिक बांधिलकीच्या बाबतीतही एक आदर्श निर्माण केला आहे. देशाच्या सीमेवर लढणाऱ्या जवानांच्या पाल्यांना मदतीचा हात देण्यापासून ते नैसर्गिक आपत्तीत धावून जाण्यापर्यंत, संस्थेने नेहमीच माणुसकी जपली आहे. संस्थेच्या दर्जेदार शिक्षणामुळे आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी इचलकरंजीकडे वळत आहेत. याचा सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होत असून, या भागातील शेकडो कुटुंबांना उदरनिर्वाहाचे साधन मिळाले आहे. अनेक कुटुंबांच्या संसाराला बळ देण्याचे काम या शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून अप्रत्यक्षपणे होत आहे. देशाच्या रक्षणार्थ आपल्या प्राणांची बाजी लावणाऱ्या वीर जवानांप्रती आदर व्यक्त करत, संस्थेने त्यांच्या पाल्यांसाठी फीमध्ये विशेष सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. सैनिकांच्या कुटुंबांना आधार देणे हे आपले कर्तव्य आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. नैसर्गिक आपत्ती असो वा जागतिक महामारी, श्रद्धा इन्स्टिट्यूट नेहमीच मदतीसाठी तत्पर राहिली आहे. कोरोनासारख्या भीषण महामारीत ज्या विद्यार्थ्यांनी आपले पालक गमावले, अशा अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलून संस्थेने त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवले.

रविवार दि.१९ एप्रिल रोजी अक्षयतृतीयाच्या शुभ मुहूर्तावर आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा असे आवाहन श्रद्धा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटच्यावतीने करण्यात आले आहे.

ए.आर.तांबे सर

---

## कोमनपा प्रभाग समिती पदासाठी आज निवडणूक

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

**महापालिकेच्या चारही प्रभाग समिती सभापतीपदासाठी अनुक्रमे वैभव अविनाश कुंभार,अनुराधा सचिन खेडकर, संजय वसंतराव मोहिते आणि विशाल शिवाजी चव्हाण यांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली.प्रभाग समिती सभापतीपदासाठी आज १७ एप्रिल रोजी उपजिल्हाधिकारी संपत खिलारी यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक होणार आहे.**

महापालिकेच्या चारही प्रभाग समिती सभापतीपदासाठी नामनिर्देशन पत्रे दाखल केलेले उमेदवार, प्रभाग समिती क्र १ गांधी मैदान विभागीय कार्यालय या प्रभाग समितीच्या सभापती पदासाठी वैभव अविनाश कुंभार,प्रभाग समिती क्र.२ छ. शिवाजी मार्केट विभागीय कार्यालय या प्रभाग समितीच्या सभापती पदासाठी अनुराधा सचिन खेडकर, प्रभाग समिती क्र.३ बागल मार्केट विभागीय कार्यालय या प्रभाग समितीच्या सभापती पदासाठी संजय वसंतराव मोहिते, प्रभाग समिती क्र.४ताराराणी मार्केट विभागीय कार्यालय या प्रभाग समितीच्या सभापती पदासाठी विशाल शिवाजी चव्हाण यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत.



डॉ.आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना मान्यवर.

## गोकुळमार्फत डॉ.आंबेडकर जयंती साजरी

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) यांच्या वतीने संघाच्या ताराबाई पार्क येथील विकास कक्ष कार्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

यावेळी गोकुळचे माजी चेअरमन ज्येष्ठ संचालक अरुण डोंगळे, संचालक डॉ. सुजित मिणचेकर, व संचालक मंडळाच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. एम.पी. पाटील यांनी केले, तर आभार डॉ.दयानंद काळे यांनी केले.या कार्यक्रमास प्रकाश पाटील, मुरलीधर जाधव, डॉ. प्रकाश साळुंखे, डॉ. दयावर्धन कामत,दत्तात्रय वागरे, डॉ.एम.पी.पाटील, एस.आर.पाटील, अशोक पुणेकर तसेच संघाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कागवाड-गणेशवाडी रस्त्याची दुरावस्था

कागवाड,ता.१६(वार्ताहर)-

**बेळगांव व कोल्हापूर जिल्ह्याला जोडणाऱ्या कागवाड-गणेशवाडी दरम्यानच्या तीन कि.मी.रस्त्याची दुरावस्था झाली आहे.या खराब,खड्डेमय रस्त्यावरुन प्रवास करतांना वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे.**

संबंधित विभागाने या गंभीर समस्येची दखल घेऊन रस्त्याचे काम हाती घेत मजबूत असा रस्ता बनवावा अशी जोरदार मागणी दोन्ही राज्यातील वाहनधारक, प्रवाशीवर्ग तसेच स्थानिक नागरिकातून होत आहे. कागवाड -गणेशवाडी मार्गे महाराष्ट्र कर्नाटक राज्यातील मोठ्या प्रमाणात वाहनांची ये जा होते.विशेषता नृसिंहवाडी येथील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री.दत्त देवस्थानास याच मार्गावरुन कर्नाटकातील भाविक दर्शनास जातात.तर चिंचलीची मायक्का देवी, मंगसुळीचे खंडोबा देवस्थान, सौंदत्तीच्या यल्लम्मा देवीच्या दर्शनास महाराष्ट्रातील भाविक या जवळच्या मार्गाने जातात.विशेषता या मार्गावरून दोन्ही राज्यातील ऊस वाहतूक,मालवाहतूक मोठ्या प्रमाणात होते. यादृष्टीने संबंधित बांधकाम विभागाने रस्त्याचे काम मजबूत तसेच दर्जात्मक बनवावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

---

## ईएसआयसीसाठी २५ नवीन संलग्न रुग्णालयांना मंजुरी

### पालकमंत्री आबिटकरांच्या हस्ते मंजुरी पत्रे प्रदान

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

**विमाधारक कामगारांना अधिक व्यापक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आज नव्याने पात्र ठरलेल्या २५ रुग्णालयांना मंजुरी पत्रांचे वाटप करण्यात आले.**

वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात यापूर्वी ६२ रुग्णालये संलग्न होती. आता या नवीन २५ रुग्णालयांच्या समावेशामुळे ही संख्या ८७ झाली आहे. कामगार विमा योजनेअंतर्गत उपचार घेणाऱ्या रुग्णांकडून सेवांबाबत चांगल्या प्रतिक्रिया आणि समाधान व्यक्त व्हायला हवे, हेच आमच्या कामकाजाचे यश असेल, असे प्रतिपादन आरोग्यमंत्री व पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे केले. शासकीय विश्रामगृह, कोल्हापूर येथे आयोजित महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी आणि संलग्न रुग्णालयांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीत श्री.आबिटकर यांनी ईएसआयसी योजनेशी संलग्न असलेल्या खाजगी रुग्णालयांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी



रुग्णालयांना मंजुरीपत्र देताना आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर

जाणून घेतल्या. विशेषतः रुग्णांना उपचार देताना उद्भवणारे प्रशासकीय अडथळे, प्रलंबित देयकांचे प्रश्न आणि तांत्रिक प्रक्रियेबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली. हे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन देतानाच, त्यांनी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना यावर त्वरित उपाययोजना करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. बैठकीला कोल्हापूरचे वैद्यकीय प्रशासन अधिकारी डॉ. मिलिंद चौधरी यांनी विभागाच्या कामकाजाचा अहवाल सादर केला. यावेळी संचालक डॉ. अशोक थोरात, प्रशासन अधिकारी डॉ. घोंडगे, बाळासो जाधव यांच्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

## पंचवीस एकराची अर्ध्या तासात मोजणी

### भूमी अभिलेखकडून गगनबावड्यात मोजणीचा सुपरफास्ट फार्स

गगनबावडा,ता.१६(प्रतिनिधी)-

**गगनबावडा तालुक्यातील सांगशी येथे जमिनीच्या मोजणीचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गट क्र. ९९, ची २५ एकर क्षेत्राची मोजणी भूमी अभिलेख विभागाने अवघ्या अर्ध्या तासात उरकल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांनी केला आहे. विशेष म्हणजे, ज्या जमिनीचे मालक खुद्द जिल्हाधिकारी (पुनर्वसन विभाग) आहेत, त्यांनाच कोणतीही नोटीस न देता ही मोजणी करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.**

**नेमका प्रकार काय?**

सांगशी येथील शेतकरी तुकाराम हैबतराव पडवळ यांनी जिल्हाधिकारी आणि भूमी अभिलेख विभागाकडे दिलेल्या तक्रारीनुसार, १० एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ ते १२.३० या वेळेत ही मोजणी झाली. २५ एकर एवढ्या मोठ्या क्षेत्राची मोजणी केवळ ३० मिनिटांत होणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य असतानाही, हा स्टंट कोणाच्या सांगण्यावरून करण्यात आला, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**पुनर्वसनाच्या जमिनीवर भूमाफियांचा डोळा?**

गट क्र. ४१/ब ही जमीन कुंभी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी शासनाने संपादित केलेली आहे. याचे सध्याचे कायदेशीर मालक जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (प्रकल्प पुनर्वसन) हे आहेत. मात्र, लगतच्या जमिनीचे सध्याचे मालक आणि काही खाजगी इसम या जमिनीवर प्लॉट पाडून विक्री करण्याच्या तयारीत असल्याचा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे. शासनाच्या मालकीच्या जमिनीचे अस्तित्व धोक्यात असतानाही प्रशासन ढिम्म का? असा सवाल शेतकरी विचारत आहेत.

> 'ज्या जमिनीचे मालक जिल्हाधिकारी आहेत, त्यांनाच नोटीस नाही! हा मोजणीचा प्रकार म्हणजे प्रशासकीय अनागोंदीचा कळस आहे. आम्ही अन्यायाविरोधात शेवटपर्यंत लढणार आहे.
> -तुकाराम पडवळ,तक्रारदार शेतकरी.

**तक्रारीतील खळबळजनक मुद्दे:**

मोजणीपूर्वीच जेसीबी लावून हद्दीचे दगड (खुणा) उखडून टाकण्यात आले आणि नैसर्गिक झाडेझुडपे नष्ट करण्यात आली. लगतच्या एकाही शेतकऱ्याला किंवा सरकारी प्रतिनिधींना मोजणीची पूर्वसूचना देण्यात आली नाही. १९९२ पासून आजवर अनेकदा मोजणी झाली, मात्र प्रत्येक वेळी वेगवेगळे निष्कर्ष काढून शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण केला जात आहे. गट ९२ मधील वनविभागाच्या हद्दीतील १५ फूट जमिनीवरही अतिक्रमणाचा प्रयत्न झाल्याचे आरोप तक्रारीत करण्यात आले आहेत.

---

# शक्तीपीठच्या नव्या आराखड्याविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार

## दूधगंगा,वेदगंगाकाठच्या गावांमध्ये अस्वस्थता; आठ तालुक्यातून जाणार महामार्ग

गारगोटी,ता.१५(आनंद चव्हाण)

**नागपूर ते गोवा हा बहुचर्चित शक्तीपीठ महामार्ग नवीन रेखांकनामुळे पुन्हा चर्चेत आला आहे. नवीन आराखडा आणि रेखांकनामुळे हा शक्तिपीठ महामार्ग महाराष्ट्रातील जवळपास १३ जिल्ह्यातील ४० तालुक्यातून जाणार आहे. हा महामार्ग कोल्हापूर जिल्ह्यातील पूर्वी सहा तालुक्यातून जाणार होता, आता या नवीन आराखड्यामुळे तो ८ तालुक्यातून जाणार आहे.विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे नवीन आराखड्यात कोल्हापूर जिल्ह्यातील कागल आणि शिरोळ या तालुक्यातून हा महामार्ग जाणार नाही असे दिसत आहे.**

माजी खा. राजू शेट्टी यांच्या प्रखर विरोधामुळे शिरोळ आणि हातकणंगले आणि मंत्री हसन मुश्रीफ यांच्या दबावामुळे कागल तालुक्यातून हा मार्ग आता जाणार नाही असे दिसते.करवीर आणि आजरा तालुक्यात या महामार्गाच्या विरोधात शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून




शक्तीपीठ महामार्गाचा आराखडा

ओळखल्या जाणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्यास शासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे. विदर्भातील वर्धा ते बांदा (सिंधुदुर्ग ) पर्यंतचा हा महामार्ग आहे.

यामध्ये ४० तालुक्यातील शेकडो गावातून हा मार्ग जाणार आहे. तुळजापूर, पंढरपूर, कोल्हापूरची महालक्ष्मी ही शक्तीपीठ जोडण्याचा हा प्रयत्न आहे. ८५६ किलोमीटर लांबीचा हा मार्ग असून हा महाराष्ट्र राज्यातील १३ जिल्ह्यातून जाणार आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वाधिक ७३ गावांचा समावेश आहे. यामुळे हजारो हेक्टर बागायत जमिनीतून हा शक्तिपीठ मार्ग जाणार असल्याने याला कोल्हापूर जिल्ह्यातून प्रखर विरोध झाला. नवीन आराखड्यानुसार कोल्हापूर जिल्ह्यात वारणा नदीच्या काठावरील जुने पारगाव येथून हा शक्तिपीठ महामार्ग कोल्हापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. तर तो हातकणंगले,(दोनच गावे) पन्हाळा,करवीर, राधानगरी, कागल (दोनच गावे ), भुदरगड, आजरा, चंदगड या आठ तालुक्यातून जाणार आहे. चंदगड तालुक्यातील इसापूर गावातून तो पुढे सिंधुदुर्ग जिल्ह्यात जाणार आहे. पूर्वीपासूनच या शक्तिपीठ महामार्गाला मोठा विरोध झाला आहे. शेतकऱ्यांच्या पिकाऊ आणि बागायती जमिनी या मार्गामुळे जाणार असल्याने कोल्हापूर जिल्ह्यात याला जास्त विरोध झाला. माजी खास. राजू शेट्टी आणि आ.सतेज पाटील यांनी या शेतकऱ्यांचे नेतृत्व केले होते. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्याला वगळून हा महामार्ग करणार असल्याचे बोलले जात होते.

**भुदरगड,राधानगरी तालुक्यातून विरोध होणारच**

शक्तीपीठ महामार्गातून कोल्हापूर जिल्ह्याला वगळणार अशी घोषणा झाली होती, पण नवीन आराखड्यानुसार कोल्हापूर जिल्ह्याला वगळले नाही.शिवाय या मार्गामुळे गोर गरीब शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन जाणार आहे. शेतकऱ्यांची रोजी रोटी यामुळे जाणार आहे. आधीच कर्जाने बेजार झालेल्या शेतकऱ्यांनी खायचे काय? हा प्रश्न आहे. त्यामुळे या नको असलेल्या आणि मागणी नसलेल्या मार्गाला आमचा नेहमीच विरोध राहील. आंदोलनाची दिशा ठरवत आहोत.भुदरगड आणि राधानगरी तालुक्यातून उठाव केला जाईल.
**कॉ.सम्राट मोरे समन्वयक,शक्तीपीठ विरोधी कृती समिती कोल्हापूर**

**नवीन आराखड्यानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील समाविष्ट गावे**

**हातकणंगले तालुका** -जुने पारगाव, नवे पारगाव
**पन्हाळा तालुका** --वारणा नगर, बहिरेवाडी, जाखले, पोहाळे
**करवीर तालुका** --केर्ले, पाडळी, निटवडे, शिंदेवाडी, खुपीरे, कोपार्डे, कुडित्रे, वाकरे, कोगे, कसबा बीड, बहिरेश्वर, गणेशवाडी, शिरोली दुमाला, हिरवडे दुमाला, सडोली दुमाला, भाटणवाडी, हसूर दुमाला
**राधानगरी** -राशिवडे बु.,चंद्रे, येळवडे, कोलवडे, वाघवडे, मोहडे, कौलव, पिंपळवाडी, कुराडवाडी, तळाशी, तुरंबे, कपिलेश्वर, मालवे
**कागल तालुका** -बोरवडे, उंदरवाडी
**भुदरगड तालुका** -नाधवडे,कोनवडे,निळपण, दारवाड, म्हसवे,गारगोटी, आकुर्डे, पुष्पनगर, शेणगाव, सोनारवाडी, मडूर, करडवाडी, शेळोली, पडखंबे, सोनुर्ली, मेघोली,
**आजरा तालुका** -हरपवडे,पेरणोली, देवर्डे, वेळवट्टी, खानापूर, पोळगाव, एरंडोल, मसोली, देऊळवाडी
**चंदगड तालुका** -बुजवडे, गवसे, कुरणी,बिजूर, कानूर बुद्रुक, कानूर खुर्द, पिळणी, झांबरे धरण, इसापूर

# राजवाडा चौक ते सांगली नाकापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करावे

## आयुक्तांना निवेदन

इचलकरंजी ता.१६ –

**येथील राजवाडा चौक ते सांगली नाकापर्यंत रस्ता जयसिंगपूर, मिरज, सांगली या मोठ्या शहराशी जोडला जाणारा रस्ता आहे. या रस्त्यावर दिवस रात्र मोठ्या प्रमाणात वर्दळ आहे. या भागात शाळा, कॉलेज, मार्केट आणि नागरी वस्तीचा हा भाग असल्याने या रस्त्यावर नेहमीच लहान मोठे अपघात घडून अनेक लोकांनी आपला जीव गमावला आहे. तसेच कायमचे अपंगत्व त्यांना आलेले आहे. तेव्हा सदर रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करावे अशी मागणी निवेदनाद्वारे आयुक्त पल्लवी पाटील यांना नगरसेवक मारुती पाथरवट नगरसेविका सौ. प्रमिला जावळे,नगरसेवक अविनाश कांबळे यांनी केले आहे.**



आयुक्त पल्लवी पाटील यांना निवेदन देताना नगरसेवक मारुती पाथरवट, अविनाश कांबळे, सौ प्रमिला जावळे

दिलेल्या निवेदनात, गेल्या २० वर्षापासून येथील नागरीकांनी नेहमीच नगरपालिकेकडे रस्ता रुंदीकरण बाबत मागणी केलेली आहे. सदरचा रस्ता हा सध्या ६० फूट आहे. तो ८० फुटापर्यंत वाढवण्यासाठी मागणी केलेली आहे. परंतू याबाबतीत कोणताही ठोस निर्णय आजअखेर घेण्यात आलेला नाही. वाढत्या वाहतुकीच्या तुलनेत सदर रस्त्याची रुंदी अत्यंत अपुरी आहे. त्यामुळे या ठिकाणी वाहतुक कोंडी होत आहे.या अरुंद रस्त्यामुळे वहातुकीचा, अपघाताचा प्रश्न निर्माण झाला आहे. अवजड वाहनांची देखील या रस्त्यावर नेहमी ये जा असते. त्यामुळे हा रस्ता पूर्णपणे खराब झाला आहे. याशिवाय पावसाळयात या मार्गावरील पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसल्याने खड्डयांचे प्रमाण वाढून रस्त्यावरच पाणी साचते. त्यामुळे वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झालेली आहे.तरी या रस्त्याचे रुंदीकरणाकरीता जमीन संपादीत करुन, मोजणी करून रुंदीकरण करुन तात्काळ डांबरीकरण करावे, अशी मागणी केली आहे.

# चोकाक येथे दगडाने ठेचून युवकाचा खून

हातकणंगले,ता.१६(प्रतिनिधी)–



**चोकाक येथील नव्याने काम चालू असलेल्या पुलाखाली अतिग्रे येथील युवकाचा खून झाल्याची घटना गुरुवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. सचिन सर्जेराव मुसळे उर्फ लालु (वय ३४, रा. अतिग्रे) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. हा खून कोणत्या कारणातून कोणी केला याचा शोध पोलीस करत आहेत.**

चोकाक हद्दीत नव्याने सुरू असलेल्या रत्नागिरी–नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील पुलाखाली सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास सचिन सर्जेराव मुसळे हा गंभीर जखमी अवस्थेत काही परप्रांतीय कामगारांना आढळून आला. याची माहिती या कामगारांनी हातकणंगले पोलिसांना दिली. पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

त्यांनी सचिन मुसळे हा गंभीर जखमी असल्याचे पाहून त्याला कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. मात्र, वाटेतच त्याचा मृत्यू झाल्याचा समजते. सचिन हा नेहमी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या मित्रांच्या सोबत वावरत होता. तो व्यसनाधीन असल्याने कोणतेही काम करत नव्हता. तो नेहमी व्यसन करत असल्याचे समजते. सदर घटना व्यसनातूनच झाल्याची चर्चा घटनास्थळावर सुरू होती. घटनास्थळी दारूची बाटली आढळल्याचे समजते.

खुनाची बातमी कळताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल ठाकूर, पोलीस निरीक्षक शरद मेमाणे यांनी भेट देऊन पाहणी केली. मयत सचिनच्या पश्चात आई, पत्नी व तीन मुली असा परिवार आहे.

**नव्याने बांधण्यात आलेले चोकाक येथील पूल हा व्यसनी लोकांचा अड्डा बनला आहे. येथे दररोज अनेक जण दारू, गांजा व अंमली पदार्थ सेवनासाठी येत असल्याचे समजते.या ठिकाणी व्यसनाधीन युवकांचा मोठा वावर असतो. मात्र, याकडे अनेक नागरिक कानाडोळा करून जात असतात. या व्यसनाधीन नागरिकाकडून अनेकांना त्रास ही दिला जातो. मात्र याकडे सर्वजण दुर्लक्ष करत होते. आज हा गंभीर प्रकार या दुर्लक्षाच्या भावनेतूनच घडल्याची चर्चा देखील नागरिकांतून सुरू होती.**

# पुरोगामी वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने कॉ.के.एल.मलाबादे यांना अभिवादन

इचलकरंजी,ता.१६

**येथील पुरोगामी वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने माजी आमदार कॉ. के एल मलाबादे यांचा २८ वा स्मृतिदिन संघटनेचे सचिव अण्णा गुंडे याच्या हस्ते फोटोला पुष्पहार घालून त्यांना संघटनेच्या कार्यालयात अभिवादन करण्यात आले.**



यावेळी बोलताना महाराष्ट्र वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे सदस्य संघटनेचे सचिव अण्णा गुंडे म्हणाले, कॉ.मलाबादे यांचे कार्य आज देखील सर्वांना प्रेरणादायी वाटावे असे होते .त्यांनी आपल्या जीवनात गोरगरीब व कष्टकरी माणसाला न्याय कसा मिळेल याचा नेहमीच विचार केला व आपल्या आमदारकीच्या काळात इचलकरंजी शहरात अनेक पाण्याचे बोअर मारले.याचा आज देखील शहरवासीय आवर्जून उल्लेख करताना दिसतात. तसेच इचलकरंजीच्या मालक व कामगार वर्गात देखील त्यांचे नाव आज देखील आदराने घेतले जाते व त्यांनी आमच्या संघटनेला केलेली मदत कधीच विसरता येणार नाही असे नमूद केले.या कार्यक्रमाला संघटनेचे संचालक अमोल मुसडे, महेश बावळे, भालचंद्र कांबळे, शिवानंद रावळ, विक्रेते दादासो कांबळे, दत्ता चौगुले, नितीन तारदाळे आदी उपस्थित होते.

## दुचाकी ओढ्यात कोसळून तिघे जखमी

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)–

**येथील जुना पी.बी. रोड परिसरातील आशीर्वाद मंगल कार्यालयाजवळ दुचाकी ओढ्यात कोसळून तिघेजण जखमी झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.सदर दुचाकीवरील हे धुळगणवाडीचे रहिवाशी असून मारूती कामगौडा (वय ३२), अमृता कामगौडा (वय १९), सुजाता कामगौडा (वय२०) अशी जखमींची नावे आहेत.**

दुचाकीवरून दोन मुलींसह तिघेजण कामानिमित्त जात होते. यावेळी दुचाकीस्वाराचे अचानक वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनीघटनास्थळी धाव घेतली.जखमींना बाहेर काढून उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले.

# काँग्रेस बळकटीसाठी निष्ठावंतांनाच संधी-पाठक

## जिल्ह्यात १३१ पदांसाठी निवड प्रक्रिया सुरू

हातकणंगले,ता.१६(प्रतिनिधी )

काँग्रेस पक्षात संघटनात्मक फेरबदलावर भर दिला जात आहे. जिल्ह्यात विविध स्तरावर १३१ नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार असून, केवळ कार्यक्षम आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांनाच संधी दिली जाईल, असे मत ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे मुख्य निरीक्षक जयशंकर पाठक यांनी व्यक्त केले.



**काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियान कार्यक्रमात बोलताना जयशंकर पाठक, सचित सावंत ,राजूबाबा आवळे, भगवान जाधव आदी.**

तालुका काँग्रेस कमिटीत पदाधिकारी निवड प्रक्रियेच्या बैठकीत ते म्हणाले,देशात ७०० काँग्रेस कमिट्यांमध्ये संघटनात्मक बदल केले जात आहेत. प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस सचिन सावंत म्हणाले की, सध्याचे शासन देशाची विचारधारा बदलून लोकशाही संपवण्याचे काम करत आहे. भाजपच्या या राजकारणामुळे काँग्रेसमधील कचरा साफ झाला असून आता केवळ निष्ठावंत कार्यकर्ते पक्षात राहिले आहेत. २०२९ मध्ये सत्ता आणण्यासाठी आतापासूनच कामाला लागणे गरजेचे आहे. पक्षात एकूण ७२ संघटना असून १३१ नवीन नियुक्त्यांद्वारे तालुका पातळीवर सक्षम फळी उभारली जाईल.

माजी आम.राजूबाबा आवळे म्हणाले, सामान्य कार्यकर्त्याला बळ देण्यासाठी आणि पक्षात पारदर्शकता आणण्यासाठी ही निवड प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यावेळी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणिस नंदकुमार कुंभार, राहुल गायकवाड, जिल्हा सचिव सचिन चव्हाण, जि. प. सदस्या सोनाली सावंत, बाजीराव सातपुते, उत्तम पाटील, जयसिंग पाटील, विनायक घोरपडे, डॉ. अभिजित इंगवले,शकिल आत्तार, महेश कुंभार,विजयकुमार भोसले, परिक्षित इंगवले, डॉ.विजय गोरड, प्रविण जनगोंडा, दयासागर मोरे , आक्काताई पाटील, अशोक आळतेकर , कपिल पाटील निहाल सनदी, रणजीत पाटील, तानाजी घोडेस्वार, शुभांगी कुंभार , यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. स्वागत तालुकाध्यक्ष भगवानराव जाधव यांनी केले.

# पंचगंगा प्रदूषण प्रश्नी आज कुरुंदवाड बंद

## निषेध रॅली काढणार

कुरुंदवाड,ता.१६(प्रतिनिधी)–

**पंचगंगा नदी प्रदूषण प्रश्नी उद्या शुक्रवारी शिरोळ तालुक्यातील अकरा गावांत बंद पुकारण्यात**

**कुरुंदवाड शहर बंद ठेवून आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन कुरुंदवाडच्या नगराध्यक्ष सौ. मनीषा डांगे, उपनगराध्यक्ष दीपक गायकवाड यांनी केले आहे. या शहरातील सर्व सर्वपक्षीय नेते विविध संघटना कार्यकर्ते गावकरी यांनी एकमुखाने पाठिंबा दिला.**

नगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात गुरूवारी सकाळी पंचगंगा नदी प्रदूषण प्रश्न सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मनीषा डांगे होत्या. याप्रसंगी उपनगराध्यक्ष दीपक गायकवाड, मुख्याधिकारी मनोजकुमार देसाई उपस्थित होते. पंचगंगा नदी प्रदूषणाचा कुरुंदवाड शहराला मोठा फटका बसत आहे. नागरिकांसह शेती, जनावरे यांना देखील या प्रदुषित पाण्याचा फटका बसत आहे. कुरुंदवाड शहराची पंचगंगा नदी ही जीवनदायींनी असून तिच्या प्रदूषणामुळे कुरुंदवाड शहरातील नागरिकांचे आरोग्य मोठे धोक्यात आले आहे. यासाठी कुरुंदवाड शहरातील सर्व जनतेने एक मुखाने या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पंचगंगा नदीकाठच्या गावांना गेल्या अनेक वर्षापासून प्रदूषणात त्रास सहन करावा लागत आहे. प्रदूषणाच्या तीव्रतेमुळे नदीतील जलचर प्राणी लाखोंच्या संख्येने मृत्यूमुखी पडत आहेत. जनावरांनाही फटका बसत आहे. शेती पिकांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यापासून सुटका करून घेण्यासाठी आणि याकडे शासनाचे लक्ष जावे, यासाठी हे आंदोलन टाकवडे येथील काळाओढा येथे होणार आहे. यामध्ये ११ गावातील मोठ्या संख्येने लोक सहभागी होणार आहेत.

या सभेत माजी नगरसेवक उदय डांगे, उपनगराध्यक्ष दीपक गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते चंदू जोग, बाबासाहेब सावगावे, शाहीर आवळे, रमेश भुजुगडे, दीपक पाटील, दयानंद मालवेकर, अक्षय. आलासे जय कडाळे उमेश करणाळे, रणजीत डांगे आदीची भाषणे झाली. नगरपालिका चौकातून निघणाऱ्या निषेध रॅलीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन

# चंदुकाका सराफ ज्वेलर्सच्या निपाणी सुवर्णदालनाचा उद्या शुभारंभ



निपाणी,ता.१६ –

**दागिन्यांच्या क्षेत्रात दोनशे वर्षांची समृध्द परंपरा जपणारे चंदुकाका सराफ ज्वेल्स आता आपली २०वी शाखा निपाणीमध्ये नव्या शोरूमसह सुरू करत असून, याचा भव्य शुभारंभ सोहळा शनिवारी १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे.**

परंपरा, विश्वास आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा अनोखा संगम असलेले चंदुकाका सराफ ज्वेल्स हे नाव पिढ्यानपिढ्या ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतीक राहिले आहे. आता निपाणीकरांसाठी सोने, चांदी आणि हिऱ्यांच्या आकर्षक, पारंपरिक तसेच आधुनिक डिझाइन्सचा विशेष सुवर्णसंग्रह एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे. या शुभारंभानिमित्त निपाणीकरां साठी ऑफर्स घेऊन आले आहेत. सोन्याच्या वाढत्या भावामुळे प्रति १० ग्रॅम ३००० रू.ची थेट बचत ग्राहकांना मिळणार आहे. सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर फ्लॅट २० टक्के सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर १००टक्के पर्यंत सूट देण्यात येणार आहे. या ऑफर्स २६ एप्रिल २०२६ पर्यंत लागू राहणार आहेत. नवीन शोरूम श्री संत बाबा महाराज कॉम्प्लेक्स, हनुमान मंदिर शेजारी, निपाणी येथे सुरू आहे.

# दोन राज्यात घरफोड्या करणारा जेरबंद

## १५ लाखांचा मुद्देमाल जप्त ‖ २० गुन्ह्यांची उकल। कराड पोलिसांची कारवाई

कराड,ता.१६(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यात घरफोड्यांची मालिका रचून पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला कराड शहर पोलिसांनी अखेर जेरबंद केले. या कारवाईत तब्बल १५ लाख २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, अनेक प्रलंबित गुन्ह्यांची उकल झाली आहे.**

**दोन राज्यांत गुन्ह्यांची मालिका**

अटक करण्यात आलेला आरोपी हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर सातारा, सांगली, कोल्हापूर आणि कर्नाटकातील बेळगाव या चार जिल्ह्यांत मिळून सुमारे २० घरफोडीचे गुन्हे दाखल असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. त्याच्या गुन्हेगारी जाळ्याचा विस्तार मोठा असल्याने आणखी साथीदारांचा शोध घेणे, गुन्ह्यांची पद्धत व चोरीच्या ऐवजाची विल्हेवाट याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

याबाबतची माहिती अशी की, एप्रिल २०२६ च्या सुरुवातीला कराड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मलकापूर व सैदापूर परिसरात सलग घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक तुषार दोषी, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर आणि उपविभागीय पोलिस अधिकारी राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला वेग देण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांनी विशेष पथक स्थापन करून सहायक पोलीस निरीक्षक विजय गोडसे यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेला तपासाची जबाबदारी सोपवली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक निखील मगदूम व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली. तपासादरम्यान लोकेश रावसाहेब सुतार (रा.लिंगनूर, ता.मिरज) याला ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशीतून त्याने विविध ठिकाणी घरफोड्या केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिने तसेच घरफोडीसाठी वापरलेली चारचाकी गाडी असा मोठा मुद्देमाल जप्त केला.

# सहाय्यक निबंधक कदमांची तडकाफडकी बदली

कोल्हापूर, ता.१६ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) राजकारणात सध्या प्राथमिक दूध संस्थांच्या पात्रतेवरून पेच निर्माण झाला असतानाच दुग्ध विभागाचे सहाय्यक निबंधक सुजय कदम यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी आता शाहूवाडीचे सहाय्यक निबंधक कृष्णा सखाराम ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

कोल्हापूर जिल्ह्यात सध्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात गोकुळच्या संस्थांच्या पात्रतेवरून शह-काटशहाचे राजकारण रंगले आहे. कदम हे मंत्री हसन मुश्रीफ यांच्या समर्थकांचे नातेवाईक असून ते दबावाखाली काम करत असल्याचा आरोप दोन दिवसांपूर्वी आम. शिवाजी पाटील यांनी केला होता. याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. या राजकीय आरोप-प्रत्यारोपांनंतर प्रशासनाने तातडीने हालचाली करत कदम यांची बदली केली.आम. पाटील यांनी तक्रार केल्यानंतर सुजय कदम यांना तातडीने मंत्रालयात पाचारण करण्यात आले होते. गुरुवारी दुपारी ते मुंबईहून कोल्हापुरातील कार्यालयात परतले, मात्र तोपर्यंत त्यांच्या बदलीचे आदेश जारी झाले होते. नूतन सहाय्यक निबंधक कृष्णा ठाकरे हे सध्या शाहूवाडी येथे कार्यरत असून त्यांच्याकडे कार्यभार सोपवण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

शहरातील सर्व अतिक्रमण धारक यांना याव्दारे सूचित करण्यात येते की, शहरातील सार्वजनिक रस्ते, फूटपाथ, नाले, म.न.पा मालकीची जागा इत्यादी ठिकाणी काही व्यक्तींनी अनधिकृतरित्या अतिक्रमण केलेले आढळून आले आहे. त्यामुळे सर्व संबंधित अतिक्रमणधारकांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांच्या आत स्वतःहून अतिक्रमण काढून घ्यावे. अन्यथा, २१/०४/२०२६ पासून व्यापक अतिक्रमण निर्मूलनाची मोहीम राबवण्यात येणार असून या अंतर्गत संबंधित अतिक्रमण निष्कासित करणेत येईल.

सही /–
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

## ग्रामपंचायत वेसर्डे, ता. भुदरगड

## लिलाव जाहीर नोटीस

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व लाकूड ठेकेदारांना कळवणेत येते की, ग्रामपंचायत वेसर्डे, ता. भुदरगडकडील गायरान गट नं. १६९ मधील अकेशिया झाडे खालीलप्रमाणे जाहीर लिलावाने विक्री करणेची आहेत.

| अ.नं | गावाचे नाव | गायरान गट नं. | एकूण झाडे |
| --- | --- | --- | --- |
| १ | वेसर्डे | १६९ | ५९४ |

वरील वर्णनाची झाडे मा परिक्षेत्र वन अधिकारी कडगाव यांचेकडील जा. क्र. मालकी /मूल्यांकन / २०२५-२६-२३२१ दि. ३/२/२०२६ अनुसरून ग्रामपंचायतीने घालून दिलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून विक्री करणेची आहेत. सदर लिलावाच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय वेसर्डे, ता. भुदरगड येथे कामकाजाच्या वेळेत पहावयास मिळतील.

लिलावाची दि. व वेळ–२७/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता.
लिलावाचे ठिकाण – ग्रामपंचायत कार्यालय वेसर्डे

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत वेसर्डे, ता. भुदरगड

## कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.,इचलकरंजी (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

## जाहीर नोटीस स्थावर मिळकत विक्री / हस्तांतराबाबत

बँकेने दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्सीअल असेटस् ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ प्रमाणे नॉन बॅकींग असेटस् म्हणुन खरेदी केलेल्या स्थावर मिळकती आहेत. सदर मिळकती या ज्या परिस्थितीमध्ये जशी आहे तशी विक्री अगर हस्तांतर बँक करणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मिळकतधारकाचे नांव | स्थावर मिळकतीचे वर्णन व ठिकाण |
| --- | --- | --- |
| १) | कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक) ता.हातकणंगले, जि. कोल्हापुर | मौजे-खोतवाडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर येथील गट नं. २३, मधील अंदाजे क्षेत्र १३३.०८ चौ. मी. ची जागा व त्यावर बांधणेत आलेल्या इमारतीसह सर्व.<br>पुर्वेस : श्री. माळगे यांची मिळकत<br>पश्चिम : इचलकरंजी सांगली रोड<br>दक्षिण : श्री प्रल्हाद आणि दत्तात्रय कांबळे याची मिळकत<br>उत्तरेस : १.५ मिटर रस्ता व ओपन स्पेस |
| | | राखीव किंमत रु.१८,६७,०००/- |

टीप–

१) संचालक मंडळ ठरावान्वये मंजुर ठराव नं. २९ दि. १५/०२/२०१७ बँकेने खरेदी केलेली स्थावर मिळकत (नॉन बॅकींग असेटस्) जाहीर नोटीसव्दारे विक्रीकरीता. २) उपरोक्त नमुद मिळकत बँकेने खरेदी केलेले असुन ती बँकेच्या ताब्या आहे. बँकेच्या माहितीप्रमाणे सरकारी, निमसरकारी बोजा नाही. तरीदेखील खरेदीदाराने त्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. ३) मिळकत जशी आहे जेथे आहे आणि तेथे जे आहे या तत्वावर विकण्यात येईल. यशस्वी प्रस्तावकास विक्री व्यवहार पूर्ण होण्यासाठी आवश्यक आकार /मुल्य जसे की, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी, इ. कायद्यानुसार देय देणी द्यावी लागतील. बँक या संदर्भात कोणतीही आकार, बोजा, मिळकतीचा कर किंवा सरकारी किंवा अन्य कोणासही मिळकतीच्या संदर्भात असलेले देणे देण्यास बांधील नाही.

अटी व नियम –

१) विक्री अगर हस्तांतर या जाहिरातीच्या तसेच, बँकेकडे भरुन द्यावयाच्या नमुन्यातील अर्जाप्रमाणे राहील. उपरोक्त स्थावर मिळकतीची माहिती तसेच टेंडर फॉर्म बँकेच्या हेड ऑफिस जनता बँक भवन, मेन रोड, इचलकरंजी - ४१६ ११५ यांचेकडे रक्कम रु.१०००/- प्रमाणे उपलब्ध असतील. मिळकत दि. १७.०४.२०२६ ते दि. ३०.०४.२०२६ पर्यत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या ऑफिस वेळेत (सुट्टीव्यतिरिक्त) पूर्व परवानगीने पाहता येईल. २) सिलबंद टेंडर विहीत नमुन्यातील अर्जाप्रमाणे रक्कम रु.१,८६,७००/- चा डिपॉझिट म्हणुन शेड्युल्ड बँकेच्या अथवा सहकारी बँकेच्या डिमांड ड्राफ्ट अगर पे- ऑर्डरने कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी, या नावे बँकेचे सिक्युरिटी ऑफिसर हेड ऑफिस जनता बँक भवन, मेन रोड, इचलकरंजी ४१६ ११५ यांचे केबीनमध्ये ठेवलेल्या टेंडर बॉक्समध्ये दि.२.०५.२०२६ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करावीत. टेंडर दि. ४.०५.२०२६ इ. रोजी दुपारी १२.०० वाजता समक्ष उघडले जातील. ३) टेंडररर्स यांनी जरूर वाटलेस त्यांच्या किमती जास्तीतजास्त देणेचे करावे. परंतु त्याकरीता वर कलम ०२ मधील अटी पूर्तता करणे आवश्यक आहे. ४) टेंडररर्स किंवा त्याचे अधिकृत इसम टेंडर उघडणेच्या वेळी हजर राहु शकतात. तसेच टेंडरमध्ये भरले रक्कमेपेक्षा जास्त रक्कम ते वाढवू शकतात. तरी त्यांना सुचीत करणेत येते की, त्यांनी स्वतः किंवा त्यांचेतर्फे अधिकृत इसमांना हजर ठेवावे. ५) टेंडर मंजुर झालेनंतर टेंडररर्स किंवा त्याचे अधिकृत इसम यांनी मंजुर रक्कमेच्या २५% इतकी रक्कम पुढील दोन दिवसात भरणेची असुन उर्वरीत रक्कम १५ दिवसांचे आत भरणेची आहे. ६) टेंडर / लिलाव मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राहील. संपर्क : हेड ऑफिस, इचलकरंजी (मोबाईल नं. ९६६५०४१७६८)

दि. १७.०४.२०२६

सही / –
मुख्य कार्यकारी अधिकारी
कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी
(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक) ता. हातकणगंले, जि. कोल्हापुर
फोन नं. ०२३०/२४२९३००, २४३३५०५



## चेन्नई सुपर किंग्जला मोठा धक्का

# खलील अहमद आयपीएलमधून बाहेर

मुंबई,ता.१६–

**ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला आयपीएल २०२६ स्पर्धेतील सुरुवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. पण त्यानंतर पुढील दोन्ही सामने जिंकून चेन्नई सुपर किंग्ज संघाची गाडी रुळावर परतली आहे. सर्वकाही सुरळीत सुरु असताना चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी टेन्शन वाढवणारी बातमी समोर येत आहे. संघातील प्रमुख वेगवान गोलंदाज खलील अहमद दुखापतीमुळे संपूर्ण हंगामातून बाहेर पडला आहे.**



चेन्नई सुपर किंग्ज संघाला स्पर्धा सुरु होताच दोन मोठे धक्के बसले होते. स्पर्धा सुरु होण्याआधीच एमएस धोनी दुखापतग्रस्त झाला होता. तो अजूनही संघात परतलेला नाही. तर डेवाल्ड ब्रेव्हिसही दुखापतीमुळे संघाबाहेर होता. त्याने नुकताच पुनरागमन केले आहे. आता चेन्नईचा संघ ज्या गोलंदाजावर अवलंबून होता, तो गोलंदाज स्पर्धेतून बाहेर पडला आहे. २८ वर्षीय खलील अहमद हॅमस्ट्रींगच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला आहे. हा चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी सर्वात मोठा धक्का आहे. पण चेन्नई सुपर किंग्ज आणि आयपीएलकडून याबाबत कुठलीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

**खलील अहमदला आयपीएल स्पर्धेत आतापर्यंत ७६ सामने खेळण्याची संधी मिळाली आहे.२०१८ पासून ते आतापर्यंत त्याने एकूण ९१ गडी बाद केले आहेत.आतापर्यंत त्याला दिल्ली डेअरडेव्हिल ,सनरायझर्स हैदराबाद, दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळण्याची संधी मिळाली आहे.**

चेन्नई सुपर किंग्ज विरूध्द कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात झालेल्या सामन्यादरम्यान शेवटचे षटक टाकताना खलीलला हॅमस्ट्रींगचा त्रास झाला होता. वृत्तानुसार, त्याची दुखापत गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. आयपीएल स्पर्धेत त्याला फार विकेट्स घेता आलेल्या नाहीत. पण तो सुरुवातीच्या षटकांमध्ये फलंदाजांवर दबाव टाकण्याचे काम करत आहे. या हंगामात गोलंदाजी करताना त्याने ५ सामन्यांमध्ये २ गडी बाद केले आहेत. यादरम्यान त्याने १०१ चेंडूंमध्ये १४६ धावा खर्च केल्या आहेत. ८.६७ च्या इकोनॉमिने धावा खर्च करताना २४ धावा देऊन १ गडी बाद ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे.

# वानखेडेवर ‘पंजाब’ ठरला किंग

## मुंबईचा सलग चौथा पराभव

मुंबई,ता.१६–

**मुंबई इंडियन्सला स्पर्धेतील सलग चौथा सामना गमावावा लागला आहे. पंजाब किंग्जने मुंबईचा त्यांच्या घरच्याच मैदानावर ७ विकेट्स आणि २१ चेंडू राखून एकतर्फी पराभवाची धूळ चारली. मुंबई इंडियन्सचे गोलंदाज सातत्याने अपयशी ठरल्याने संघाची धूळदाण झाल्याचे पाहावयास मिळाले. तर पंजाब किंग्जने पुन्हा एकदा सांघिक कामगिरीच्या बळावर आपली विजयी घौडदौड कायम ठेवली.**

मुंबई इंडियन्सने दिलेल्या १९६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना १६.३ षटकांत पंजाब किंग्जने एकतर्फी सामना जिंकला. प्रियांश आर्या १५ धावा करत झेलबाद झाला. प्रभसिमरन सिंगने ३९ चेंडूत ११ चौकार व २ षटकारांसह ८० धावांची वादळी खेळी केली. याशिवाय कर्णधार श्रेयस अय्यरने ३५ चेंडूत ५ चौकार व ४ षटकारांसह ६६ धावांची खेळी केली. श्रेयस अय्यरने फिल्डिंगमध्ये हार्दिक पंड्याला झेलबाद करण्यासाठी बार्टलेटच्या जोडीने कमालीचा रिले कॅच पकडला.

श्रेयस अय्यरशिवाय कुपर कॉनोलीने १७ धावांचे आणि मार्कस स्टॉयनिसने १० धावांचे योगदान दिले. श्रेयस अय्यर आणि प्रभसिमरन सिंग यांनी १३९ धावांची मॅचविनिंग भागीदारी रचली आणि मुंबईने तिथेच सामना गमावला. मुंबईकडून



श्रेयस अय्यर
३५ चेंडूत ६६ धावा

अल्लाह गझनफरने २ विकेट्स आणि शार्दुल ठाकूरने १ विकेट घेतली.पंजाबने नाणेफेक जिंकत मुंबईला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. मुंबईची सुरूवात पुन्हा एकदा खराब झाली. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत क्विंटन डीकॉकला संधी मिळाली. रायन रिकल्टन व डीकॉकची जोडी सलामीला उतरली. रिकल्टन २ धावा तर पुढच्याच चेंडूवर सूर्या गोल्डन डकवर बाद झाला. यानंतर क्विंटन डीकॉक व नमन धीर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ६८ चेंडूत १२२ धावांची भागीदारी रचली. नमन धीर ३१ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह अर्धशतक करत बाद झाला.



प्रभसिमरन सिंग
३९ चेंडूत ८० धावा

क्विंटनने पहिल्याच सामन्यात ६० चेंडूत ८ चौकार व ७ षटकारांसह ११२ धावांची खेळी केली. हार्दिक पंड्याने १४ धावांचे तर तिलक वर्माने ८ धावांचे योगदान दिले. यासह मुंबईने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १९५ धावांची खेळी केली. पंजाबकडून अर्शदीपने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या, तर मार्को यान्सन व शशांक सिंग यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

### डीकॉकचा शतकी धमाका

मुंबईकडून रोहित शर्मा नव्हता. त्यामुळे डावाची सुरुवात करण्याची संधी डावखुऱ्या क्विंटन डीकॉकला देण्यात आली. गेल्या ४ सामन्यात त्याला खेळण्याची संधी मिळाली नव्हती. पहिल्याच सामन्यात संधीचे सोने करून दमदार शतक झळकावत मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला. डीकॉक २०२० नंतर पहिल्यांदाच मुंबई इंडियन्स संघासाठी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात उतरला. डीकॉकने ५३ चेंडूत शतक पूर्ण केले. यासह ६० चेंडूमध्ये ८ चौकार आणि ७ चौकारांच्या साहाय्याने नाबाद ११२ धावांची खेळी केली. तो आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्साठी दुसरी सर्वात मोठी खेळी करणारा फलंदाज ठरला.

# मांगलेचा पांडूरंग सीसी संघ अरिहंत चषकाचा मानकरी

निपाणी,ता.१६ (प्रतिनिधी)–

**सहकाररत्न कै.रावसाहेब पाटील यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त श्रीअरिहंत उद्योग समूह व फ्रेंड्स सर्कल, छत्रपती शिवाजी नगर(निपाणी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री अरिहंत ट्रॉफी २०२६ डे–नाईट फुल पिच टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात मांगले (ता. सांगली) येथील पांडुरंग सी सी संघ विराज स्पोर्टस क्लब (कोल्हापूर) वर ८ धावांनी विजय मिळवत अरिहंत चषकाचा मानकरी ठरला. विजेत्या संघास २ लाख रूपये रोख व अरिहंत चषक देवून निपाणीचे माजी आमदार सुभाष जोशी,अरिहंत बँकेचे चेअरमन अभिनंदन पाटील, युवा नेते उत्तम पाटील, माजी जि.पं. सदस्य शशिकांत खोत यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.**



**पांडूरंग सीसी संघास अरिहंत चषक प्रदान करताना उत्तम पाटील, अभिनंदन पाटील, सुभाष जोशी, शशिकांत खोत आदी.**

अंतिम सामन्यात पांडूरंग सीसी मांगले संघाने आक्रमक सुरूवात केली. पहिल्याच षटकात १५ धावा जमविल्या. असिफ शेखने ३९ धावा केल्या. त्यामुळे ६ षटकात ७८ धावा करण्यात मांगले संघाला यश आले. त्यानंतर प्रत्यूतरादाखल खेळताना विराज संघाला चांगली सुरूवात मिळूनही ७० धावापर्यतच मजल मारता आली.

तत्पूर्वी हिंडलगा संघ (बेळगांव) व विराज (कोल्हापूर ) यांच्यात उपांत्य सामना होवून विराज संघ अतिम सामन्यात पोहचला तर मागले संघ विरोधात नारायणवाडी संघ यांच्यातील उपांत्य सामना मांगले संघाने जिंकून अंतिम फेरीत धडक मारली.

उपविजेत्या विराज स्पोर्टसला रोख १ लाख रूपये व चषक तर तृतीय क्रमांक नारायणवाडी व हिंडलगा संघाना रोख ५० हजाराचे बक्षिस देण्यात आले. पंच म्हणून गणेश ठोंबरें, रमेश शिंदे, महेद्र सुर्यवंशी यांनी काम पाहिले.उत्तम पाटील म्हणाले, निपाणीतील युवकांचा क्रिक्रेटमध्ये उत्साह वाढवा आणि चांगले खेळाडू घडावेत याकरीता अरिहंत चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. अरिहंत उद्योग समुह संपूर्ण मतदार संघात विविध स्पर्धांच्या माध्यमातून युवकांच्या खेळाला प्राधान्य देत असतो. सलग तिसऱ्या वर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी डॉ.सी.बी.कुरबट्टी,रवींद्र शिंदे, प्रसन्नकुमार गुजर, दिलीप पठाडे, दत्ता नाईक, शौकत मणियर, निरंजन पाटील, अँड. संजय शिंत्रे, शेरू बडेघर, इरफान महात, प्रा.बागवान, सुरेश कांबळे, रघुनाथ चौगुले, संतोष चौगुले,दिपक वडे, इम्रान मकानदार, शिरीष कमते, बबलू मांगोरे, बंटी कांबळे, रवी लोहार, प्रथमेश लोहार, विजय कांबळे, राजू देवल, सोनू लोहार, राहुल निंबाळकर, संतोष कांबळे, अरविंद पारळे, चेतन पांगिरे, अभिजीत सांडुगडे यांच्यासह कार्यकर्ते व क्रिकेट प्रेमी उपस्थित होते. आभार चंद्रकांत मोरे यांनी मानले.

# चंदुकाका सराफ ज्वेल्सतर्फे अक्षय तृतीयेनिमित्त विशेष ऑफर्स

कोल्हापूर,ता.१६ –

**दागिन्यांच्या क्षेत्रात विश्वासार्ह नाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चंदुकाका सराफ ज्वेल्सतर्फे अक्षय तृतीयेच्या निमित्ताने ग्राहकांसाठी विशेष आणि सर्वात मोठ्या ऑफर्स घेऊन आल्या आहेत. साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा मुहूर्त मानल्या जाणाऱ्या अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर या ऑफर्स सादर करण्यात आल्या आहेत.**



अक्षय तृतीया हा सुवर्ण खरेदीसाठी अत्यंत शुभ दिवस मानला जातो. याच अनुषंगाने चंदुकाका सराफ ज्वेल्सने ग्राहकांसाठी खास ऑफर्स जाहीर केल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर फ्लॅट ५०% सूट देण्यात येत असून, हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर फ्लॅट १००% सूट दिली जाणार आहे. ही ऑफर २६ एप्रिल २०२६ पर्यंत चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या महाराष्ट्र व कर्नाटक मधील सर्व शाखांमध्ये लागू राहणार आहे.

सोबतच, चंदुकाका सराफ ज्वेल्स तर्फे अक्षय तृतीया तसेच येणाऱ्या गुरुपुष्यामृताच्या शुभ मुहूर्तानिमित्त शुद्ध सोन्याच्या वेढणीवर शुन्य टक्के मजुरीचा विशेष लाभ ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. परंपरा, विश्वास आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा वारसा जपणारे चंदुकाका सराफ ज्वेल्स हे नाव अनेक वर्षांपासून ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे. पारंपरिक तसेच आधुनिक डिझाइन्सचा उत्कृष्ट संगम, आकर्षक कलेक्शन आणि दर्जेदार सेवा यामुळे ग्राहकांना येथे वेगळा आणि समाधानकारक खरेदीचा अनुभव मिळतो.अक्षय तृतीयेच्या या शुभमुहूर्तावर चंदुकाका सराफ ज्वेल्सतर्फे ग्राहकांना दर्जेदार दागिन्यांसह आकर्षक सवलतींचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पुनरागमनासाठी पॅट कमिन्स सज्ज

नवी दिल्ली,ता.१६–

इशान किशन सध्या सनरायझर्स हैदराबादचे कर्णधारपद भूषवत आहे, पण काही सामन्यांनंतर त्याचे कर्णधारपद जाणार आहे.एसआरएचचा कर्णधार पॅट कमिन्स संघात परतणार आहे.

वृत्तानुसार, कमिन्स गोलंदाजीसाठी पूर्णपणे सज्ज आहे. तो १७ एप्रिल रोजी भारतात दाखल होऊन संघात सामील होईल. सनरायझर्स हैदराबादचा पुढचा सामना १८ एप्रिल रोजी हैदराबादमध्ये सीएसकेविरुद्ध होणार आहे. त्यानंतर संघ २१ एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध पुन्हा मैदानात उतरेल. पॅट कमिन्स या दोन सामन्यांमध्ये खेळणार नाही असे मानले जात आहे. तो २५ एप्रिल रोजी होणाऱ्या राजस्थान रॉयल्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद सामन्यासाठी संघात परतण्याची शक्यता आहे.कमिन्सच्या संघात परतण्यामुळे कर्णधारपद पुन्हा त्याच्याकडे येण्याची शक्यता आहे.संघ सध्या दोन विजयांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे.कमिन्सचे पुनरागमन हे स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आणि संभाव्य प्लेऑफमध्ये सहभागी होण्याच्या त्याच्या योजनेनुसारच आहे.

# इराण फिफा वर्ल्डकपमध्ये खेळण्याची शक्यता

## स्पर्धेतून ११ अब्ज डॉलर्स महसूल मिळण्याचा अंदाज

वॉशिंग्टन डीसी,ता.१६–

**फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा थरार अमेरिकेत रंगणार आहे. इराणचा संघ या स्पर्धेसाठी पात्र ठरणाऱ्या संघांपैकी एक होता. मुख्य बाब म्हणजे, केवळ संघांच्या सहभागाच्या बाबतीतच नव्हे, तर व्यावसायिकदृष्ट्याही आतापर्यंतची सर्वात मोठी स्पर्धा ठरू शकते. या स्पर्धेतून ११ अब्ज डॉलर्सहून अधिक महसूल मिळण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.**

अमेरिका- इराणच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, इराणचा संघ फिफा वर्ल्डकप खेळण्यासाठी येणार की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. इराणच्या क्रीडा मंत्र्यांनी म्हटले होते की, या (अमेरिका) भ्रष्ट राजवटीने आमच्या नेत्याची हत्या केली आहे, हे लक्षात घेता आम्ही कोणत्याही परिस्थितीत विश्वचषकात सहभागी होऊ शकत नाही.

फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी सांगितले आहे की, इराणचा संघ नक्कीच येणार आहे. वॉशिंग्टन डीसी येथील सीएनबीसीच्या एका इन्व्हेस्ट इन अमेरिका फोरममध्ये ते म्हणाले, आम्हाला आशा आहे की, तोपर्यंत परिस्थिती शांतपूर्ण असेल. ज्यामुळे निश्चितच मदत होईल. इराणला यावेच लागेल, ते त्यांच्या लोकांचे प्रतिनिधित्व करतात. ते या स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. खेळाडूंनाही खेळायचे आहे. इराणचा संघ फिफा वर्ल्डकप खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. पण इराणकडून याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. इराणच्या क्रीडा मंत्र्यांनी इराणचा संघ फिफा वर्ल्डकपमध्ये सहभाग घेणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. या भूमिकेवर ते ठाम राहणार, की आपला निर्णय बदलणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**इराणचा संघ फिफा वर्ल्डकप स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. इराणचे गट फेरीतील तिन्ही सामने अमेरिकेत खेळवले जाणार आहेत. इराणचा संघ १५ जूनला लॉस एंजेलिसमध्ये न्यूझीलंडचा सामना करणार आहे. तर २१ जून रोजी बेल्जियम संघाचा सामना करणार आहे. हा सामना देखील लॉस एंजेलिसमध्ये खेळवला जाणार आहे. तर साखळी फेरीतील तिसरा सामना २६ जून रोजी सिएटलमध्ये इजिप्तविरूद्ध खेळवला जाणार आहे. जर गट फेरीतील सामने जिंकून इराणचा संघ पुढील फेरीसाठी पात्र ठरला, तर पुढचे सामने देखील अमेरिकेत खेळवले जाऊ शकतात.**

